# भारतातील महिला उद्योजकतेसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजना : एक अभ्यास

**रोशनी सु. तट्टे, डॉ. प्रशांत एस. वैराळकर**
जगदंबा महाविद्यालय, अचलपूर सिटी

---

**सारांश**

*भारताची अर्थव्यवस्था ही अनेक घटकांवर अवलंबून आहे. या घटकामध्ये प्रमुख घटक हा देशाची अर्थव्यवस्था हा असतो. देशाच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्वाचा स्त्रोत आहे. आजच्या आधुनिक युगात शाश्वत आर्थिक, सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकाची महत्वाची भुमिका राहणार आहे. भारतात 57% टक्क्याहून अधिक महिला स्वतंत्र एकटीने उद्योग उभा करतात असे आकडेवारी सांगते, असे असले तरी आज मोठ्या प्रमाणात स्त्रियांना उद्योगविश्वात पाऊल ठेवणे गरजेचे आहे. हा अभ्यास भारतातील महिला उद्योजगकतेसाठी राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांची माहिती मिळविण्याचा एक प्रयत्न आहे. संशोधनासाठी दुय्यम सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. त्यासाठी विविध संकेतस्थळे, संशोधन अहवाल, वृत्तपत्रे अभ्यासण्यात आले. अभ्यासाचा परिणाम असे दर्शवितो की, आज देशामध्ये जास्तीत जास्त महिला उद्योजक घडाव्यात आणि जास्तीत जास्त महिलांनी व्यवसायाकडे वळावे यासाठी भारत सरकारकडून महिला उद्योजकतेला चालना देण्यासाठी अनेक योजना व कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या योजनांची माहिती प्रत्येक ग्रामीण व शहरी महिलेपर्यंत पोहचणे आवश्यक आहे. आणि या योजनांच्या अंमलबजावनीकरीता अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे.*

---

## प्रस्तावना

भारताची अर्थव्यवस्था ही अनेक घटकावर आधारीत आहे. या घटकामध्ये प्रमुख घटक देशाचा आर्थिक विकास हा असतो. उद्योजकीय योग्यता प्रत्येक देश व समाजामध्ये विद्यमान असते. आज आवश्यकता आहे ती उद्योजकीय क्षमता असणाऱ्या व्यक्तिची ओळख करून त्यांच्या क्षमतांना विकसित करण्याची भारता संदर्भात मान्य केले जाते की, देशात बऱ्याच उद्योजकीय संभाव्यता विद्यमान आहेत. या संभांव्यतांना विकसित केल्या गेले तर निश्चितपण देशाची योग्य प्रकारे आर्थिक, सामाजिक प्रगती केल्या जाऊ शकते. देशाच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकता महत्वाचा स्त्रोत मानली गेली आहे. महिला उद्योजक समाजामध्ये व्यवस्थापन संघटन व्यवसायाशी संबंधीत बाबींमध्ये निरनिराळे आयाम प्रस्तुत करीत आहेत. आजच्या आधुनिक गतीमान युगात शाश्वत आर्थिक, सामाजिक विकासाच्या जागतिक वाटचालीमध्ये महिला उद्योजकाची महत्वाची भुमिका राहणार आहे.

भारताच्या एकुण लोकसंख्येत जवळपास 50% इतके प्रमाण महिलांचे आहे. म्हणून केवळ पुरूषांनी उद्योजकतेवर ताबा मिळवून आर्थिक विकास होवू शकणार नाही तर महिलांनी सुद्धा उद्योजकीय विकास घडवून आर्थिक विकासात सहभागी होणे आवश्यक आहे. भारताचा विचार केला तर 8 मिलीयनहून अधिक महिला उद्योगात सक्रीय आहेत. भारतात 57% टक्क्याहून अधिक महिला स्वतंत्र एकटीने उद्योग उभा करतात असे आकडेवारी सांगते. असे असले तरी आजही खुप मोठ्या प्रमाणात स्त्रियांनी उद्योगविश्वात पाऊल ठेवणे गरजेचे आहे. अलिकडच्या काळात महिला सक्षमीकरणांचे वारे वेगाने वाहत आहे. स्त्रिया देखील घराच्याबाहेर पडून स्वत:ला सिद्ध करून यशाचे एकेक शिखर गाठत आहे. प्रत्येक आव्हानांवर मात करण्यासाठी स्वत:ला सक्षम बनविण्याकडे त्यांचा जास्त कल दिसुन येतो. आता महिलांच्या या प्रगतीच्या वाटचालीत महिलांना उद्योग विश्वात अधिक सशक्त करण्यासाठी भारत सरकारने अनेक पाऊले उचलली आहेत. महिलांना डोळ्यासमोर ठेवून महिलांसाठी खास योजना आखल्या आहेत. त्यामुळे महिलांना आपली ओळख निर्माण करण्यासाठी मोलाची मदत झाली आहे.

## उद्दिष्ट्ये :-

1) उद्योजकता म्हणजे काय ?
2) भारतातील महिला उद्योजकतेची स्थिती जाणून घेणे.
3) महिला उद्योजकतेकरिता भारत सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या विविध योजनांचा अभ्यास करणे.

## गृहितके :-

1) महिला उद्योजकतेला भारत सरकार प्रोत्साहन देत आहे.

**संशोधन पद्धती :-**
प्रस्तुत संशोधनासाठी दुय्यम सामग्रीचा उपयोग करण्यात आला आहे. त्यात विविध पुस्तके, मासिके, वर्तमानपत्रे, वेबसाईट चा उपयोग करण्यात आला आहे. आणि त्यानुसार निष्कर्ष मांडण्यात आले आहे.

**उद्योजकता म्हणजे काय :-**
उद्योजकता म्हणजे एखादी व्यक्ती जोखीम घेवून आणि तंत्रज्ञानाचा वापर करून स्पर्धात्मक जागतिक वातावरण सक्षम करून नविन व्यवसाय उद्योग सुरू करण्याची ईच्छा होय.

**व्याख्या :-**
"उद्योजक म्हणजे अशी व्यक्ती आहे जी व्यवसाय किंवा व्यवसाय संस्था संघटीत करते आणि चालवते तसेच तो व्यवसाय करण्यासाठी आर्थिक जोखीम पत्करते." - ऑक्सफर्ड इंग्रजी शब्दकोषानुसार

**भारतातील महिला उद्योजकतेची स्थिती :-**
आज उद्योजकता हे क्षेत्र दिवसेंदिवस विस्तारत असल्याचे हे अनेक अहवालावरून आढळून येते. आज भारतीय महिला उद्योग क्षेत्रात प्रवेश करत आहे. महिलांच्या उद्योग क्षेत्रातील सहभागामुळे अर्थव्यवस्थेला मोठी चालना मिळेल. भारतात उत्पादन आणि कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांची टक्केवारी पुरूषांच्या तुलनेत जास्त आहे. भारतात 45% स्टार्टअप महिला चालवतात. त्यापैकी 50,000 पेक्षा जास्त सरकार मान्य आहे. नॅशनल ऑफ सॉफ्टवेअर अॅण्ड रिलिस कंपनी (नॅसकॉम) ने प्रकाशित केलेल्या अहवालानुसार भारतातील 18% स्टार्टअप्सचे अधिकारी, एक महिला संस्थापक किंवा सह-संस्थापक करतात. तसेच 2019 ते 2022 दरम्यान भारतातील 17% गुंतवणुकीत स्टार्टअप्सनी महिला सदस्यांसह केले आहेत.
भारत सरकार कडून महिलांना उद्योग क्षेत्रात प्रोत्साहन देण्यासाठी विविध योजना राबविल्या जात आहे. या योजनेचा निश्चितच लाभ महिला उद्योजकतेला होत आहे.

**महिला उद्योजकतेसाठी भारत सरकारकडून राबविण्यात येत असलेल्या विविध योजना:-**
महिला उद्योजकतेसाठी भारत सरकारकडून राबविल्या जाणाऱ्या काही योजनांची माहिती पुढीलप्रमाणे :-

**1) अन्नपुर्णा योजना :-**
या योजनेअंतर्गत अन्न आणि कॅटरिंग उद्योगातील महिला उद्योजकांना लघु उद्योग स्थापन करण्यासाठी हे कर्ज दिले जाते. या योजनेअंतर्गत कर्जाची मर्यादा 50,000 रू. आहे.

**2) मुद्रा योजना :-**
लहान उद्योगाची सुरूवात करणाऱ्या महिलांसाठी ही सामान्य सरकारी योजना आहे. या योजनेअंतर्गत महिला एकत्रीतपणे व्यवसायाला प्रारंभ देखील करू शकतात, या योजनेअंतर्गत 50,000 रूपयांपासुन 50 लाख रूपयापर्यंत कर्ज मंजुर केले जाते.

**3) ट्रेड योजना :-**
या योजनेअंतर्गत स्त्रियांनी चालवलेल्या व्यवसायाला प्रोत्साहन देणे, विशिष्ट प्रशिक्षण देणे व सल्ला देणे आणि व्यवसाया संबंधित गरजा पूर्ण केल्या जातात. या योजनेअंतर्गत महिलांना एकूण प्रकल्प खर्चाच्या 30% रक्कम सरकारकडून अनुदान म्हणून दिली जाते. आणि 70% रक्कम वित्तपुरवठा संस्थेकडून केला जातो.

**4) भारतीय महिला व्यवसाय बँक कर्ज योजना :-**
या योजनेअंतर्गत महिला व्यावसायीक मालकांसाठी 20 कोटी रूपयापर्यंत कर्ज मंजुर केले जाते. या योजनेची अंमलबजावणी भारतीय महिला बँकेने केली होती. नंतर 2017 मध्ये ही बँक स्टेट बँक ऑफ इंडियामध्ये विलिन झाली. या योजनेमध्ये महिलांना 0.25% सुट मिळते.

**5) उद्योगीनी योजना :-**
18 ते 45 वयोगटातील महिला उद्योजकांना लघु उद्योगांकरिता 1,00,000 रूपयांपर्यंत कर्ज मंजुर केले जाते. अनुसुचित जाती, जमातीमधील अपंग, निराधार, विधवा महिलांना 30% अनुदान दिले जाते.

**6) स्त्री शक्ती पॅकेज योजना :-**
ही एस.बी.आय. ची खास योजना आहे. या योजनेअंतर्गत ज्या महिलांचे एखाद्या व्यवसायात 50% पेक्षा अधिक शेअर्स असतात. त्यांनाच हे कर्ज दिले जाते.

**7) स्टॅन्ड-अप-इंडिया :-**
हि अनुसुचित जाती, जमाती आणि महिला उद्योजकांना वित्त पुरवठा करणारी योजना आहे. या योजनेअंतर्गत ग्रीन फील्ड एन्टरप्राइझची उभारणी करण्यासाठी बँकेच्या प्रत्येक शाखेमधुन कमीत कमी एक अनुसुचित जाती, जमाती आणि एक महिला

कर्जदाराला 10 लाख रूपयांपासून 1 कोटी पर्यंत कर्ज मंजुर केले जाते.

**8) प्रधानमंत्री रोजगार युवा योजना :-**

ही योजना PMRY म्हणूनही ओळखली जाते. या योजनेअंतर्गत महिला उद्योजकांच्या माध्यमातुन कौशल्य आधारित स्वयंरोजगार निर्माण करणे आणि आर्थिक स्वातंत्र्यासाठी त्यांना स्वावलंबी करणे ही योजना उद्योग, व्यापार, सेवा क्षेत्रातील सर्व प्रकारच्या उपक्रमांना लागु आहे. या योजनेअंतर्गत व्यवसायासाठी 2 लाख रुपये आणि सेवा आणि उद्योगासाठी 5 लाख रुपये पर्यंत कर्ज मंजुर केले जाते.

अशा विविध योजना आज महिला उद्योजकतेकरिता आणि महिलांना त्यांच्या प्रगतीच्या वाटचालीत अधिक सशक्त बनविण्याकरिता भारत सरकारकडून राबविल्या जात आहे आणि महिला सक्षमीकरणात मोलाचा वाटा उचलत आहे.

**निष्कर्ष आणि शिफारशी :-**

प्रस्तुत संशोधनावरून असे लक्षात येते की, आज देशामध्ये जास्तीत जास्त महिला उद्योजक घडाव्यात आणि जास्तीत जास्त महिलांनी व्यवसायाकडे वळावे यासाठी भारत सरकारकडून अनेक योजना आणि कार्यक्रम राबविले जात आहेत. मात्र या योजनांची योग्य पद्धतीने अंमलबजावनी होणे आवश्यक आहे. या योजनांची माहिती प्रत्येक ग्रामीण आणि शहरी महिलेपर्यंत पोहोचण्यासाठी अधिक प्रयत्न करण्याची गरज आहे. या योजनांची अंमलबजावनी जेवढ्या अधिक चांगल्याप्रकारे होईल. आणि महिलांच्या मनातील उद्योगासंबंधी असलेले अनेक प्रश्न आणि भीती दूर केली जाईल. तेव्हा अधिका-अधिक महिला या व्यवसायाकडे वळतील आणि भारतात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.

**संदर्भ ग्रंथ सुची :-**


1. अंशिका शर्मा आणि अवनी अरोरा, 2022, विकसनशील देशामीधल महिला उद्योजकता.
2. देशपांडे अनुजा, 2021, महिला उद्योजकांसाठी महाराष्ट्र राज्य आणि केन्द्र शासनाच्या विविध योजना, sampda.com
3. डॉ. जोशी जयंत, उद्योजकता विकास, पिंपळापुरे पब्लिशर्स, नागपूर.
4. डॉ. गोंगले रेकचंद, 2022, महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासात महिला उद्योजकांचा सहभाग, Review of Research, 2249-894X
5. श्री. प्रधान जी. मदन, महाराष्ट्रातील उद्योजकतेचा विकास कार्यक्रम व महिला उद्योजक, Navjyot, 2277-8063
6. संकेत स्थळे
7. www.vikaspedia.in
8. www.majhapepar.com
9. www.inmarathi.com
10. www.udyam.sakhi.com
11. www.mcciapunesampda.com
12. www.hindustantimes.com

# महिलांच्या सक्षमीकरणात स्वयंसहायता गटाचे योगदान व त्याची परिणामकारिता

**प्रो. अमृता रं. बेंद्रे**
अकोला लॉ कॉलेज, अकोला

**प्रस्तावना**

स्वयं मदत गट (SHGs) ही लोकांची अनोपचारिक संघटना आहे. जी त्यांच्या राहणीमानात सुधारणा करण्याचे मार्ग शोधण्यासाठी एकत्र येतात. बचत गट हे गरीब लोकांचे छोटे गट आहेत ते एकमेकांना मदत करून समस्या सोडवितात बचत गट त्यांच्या सदस्यांमध्ये लहान बचतीला प्रोत्साहन देतात. बचत ही बँकेकडे ठेवली जाते. बचत गटाच्या नावावर असलेला हा कॉमन फंड आहे.(SHGs) त्यांच्या सामान्य निधीतून लहान कर्ज देते. बचत गट निर्मितीत 10 ते 20 व्यक्ती एकत्र येऊन अशा बचत गटाची निर्मिती करतात. समान सामाजिक-आर्थिक पार्श्वभूमी असलेल्या आणि एकत्रितपणे सामान्य उद्देश्य पूर्ण करण्याची इच्छा असलेल्या लोकांचा स्वशासित समवयस्क नियंत्रित माहिती गट म्हणून त्याची व्याख्या केली जाऊ शकते. स्वयंरोजगार आणि दारिद्र्य निर्मूलनाला प्रोत्साहन देण्यासाठी (SHGs) स्वयं मदत च्या कल्पनेवर अवलंबून आहे. अधिकाधिक महिलांना स्वयंसहायता गट तयार करण्यासाठी आणि त्यांना त्यांच्या सक्षमीकरणात त्यांचे महत्त्व पटवून देण्यास (SHGs) मोठी भूमिका बजावते. हे महिलांना सामूहिक निर्णय घेण्यास आणि महिलांच्या आत्मविश्वास आणि क्षमता वाढवण्यास मदत करते. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी सहभागात्मक दृष्टिकोन अंगीकारण्यासाठी (SHGs) हे सर्वात महत्त्वाचे साधन मानले जाते.

**बचत गटाची उद्दिष्टे :–**

१) सभासदांमध्ये बचत आणि बँकिंगच्या सवयी लावणे.

२) त्यांना आर्थिक तांत्रिक आणि नैतिक शक्ती पासून सुरक्षित करणे.

३) उत्पादक हेतूसाठी कर्जाचा लाभ घेण्यास सक्षम करणे.

४) लक्ष क्षेत्रातील महिलांना (SHGs)ची गरज आणि त्यांच्या सशक्तिकरणातील त्यांची प्रासंगिकता यासाठी संवेदनशील करणे.

५) महिलांमध्ये समूह भावना निर्माण करणे.

६) महिलांचा आत्मविश्वास व क्षमता वाढविणे.

७) महिलांमध्ये सामूहिक निर्णय क्षमता निर्माण करणे.

८) महिलांमध्ये बचत करण्याच्या सवयीला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या स्वतःच्या भांडवलाचा स्त्रोत जमा करण्यास सुलभ करणे.

९) विशेष महिला विकासाशी संबंधित सामाजिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यासाठी महिलांना प्रेरित करणे.

१०) सदस्या मध्ये साक्षरता आणि सामान्य जागरूकता वाढवणे व संघटनात्मक शक्ती प्रदान करणे.

**बचत गटाची उत्पत्ती :–**

- 1972 मध्ये स्वयंरोजगार महिला संघटना (SEWA) च्या स्थापनेपासून भारतातील (SHGs) चे मूळ शोधले जाते.
- याआधीही स्वयसंघटनाचे छोटे छोटे प्रयत्न झाले. उदाहरणार्थ १९५४ मध्ये अहमदाबादच्या टेक्स्टाईल लेबर असोसिएशन (TLA) ने गिरणी कामगारांच्या कुटुंबातील महिलांना शिवणकाम, विणकाम इत्यादी कौशल्याचे प्रशिक्षण देण्यासाठी त्यांची महिला शाखा स्थापन केली.
- इला भट्ट यांनी (SEWA) ची स्थापना केली, त्यांच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या उद्देशाने विणकर, कुंभार, फेरीवाले आणि इतर अशा गरीब आणि स्वयंरोजगार महिला कामगारांना असंघटित क्षेत्रातून संघटित केले.
- नाबार्डने 1992 मध्ये SHG बँक लिंकेज प्रकल्पाची स्थापना केली. जो आज जगातील सर्वात मोठा मायक्रो फायनान्स प्रकल्प आहे.
- 1993 पासून नाबार्डने भारतीय रिझर्व बँकेसह बचत गटांना बँकांमध्ये बचत बँक खाते उघडण्याची परवानगी दिली.
- स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना GOI ने 1999 मध्ये ग्रामीण भागात अशा गटांच्या निर्मिती आणि कौशल्याद्वारे स्वयंरोजगाराला चालना देण्याच्या उद्देशाने सुरू केला होता. स्वयंरोजगार कार्यक्रमाचे स्वरूप बदलून 1 एप्रिल 1999 पासून केंद्र शासनाने दारिद्र्य निर्मूलनासाठी "स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना पथकर्ज

आणि अर्थसहाय" असा नवीन कार्यक्रम सुरू करण्यात आला.

- त्यानंतर 3 जून 2011 रोजी स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे उद्दिष्टे कायम ठेवून या योजनेचे "राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान"(NRLM – National Rural Livehioods Mission) मध्ये रूपांतर करण्याचा निर्णय घेतला आहे.
- राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत एकात्मिक प्रयत्न करण्यात येतात. स्वयंसहायता गटाद्वारे, बचतगटाद्वारे स्त्रियांचे संघटन करून त्यांच्यातील उद्योग व्यवसायाला चालना देण्यात येते.

**S G H अंतर्गत येणाऱ्या योजना :–**

१) पंडित दीनदयाल उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (ग्रामीण भागातील बेरोजगार युवक/ युवती यांना तांत्रिक प्रशिक्षण देणे व रोजगार उपलब्ध करून देणे)

२) महिला विकास सशक्तिकरण योजना ('उमेद' अभियानातील अल्पभूधारक महिला शेतकरी)

३) सुमतीबाई सुकळीकर योजना (०% व्याजदराने कर्ज उपलब्ध)

४) समूह समुदाय विकासासाठी विविध अनुदान (फिरता निधी, समुदाय गुंतवणूक निधी, जोखीम प्रवंतानिधी, ग्रामसंघ व्यवस्थापन निधी)

५) अस्मिता योजना (किशोरवयीन मुली व महिला यांना सॅनेटरी पॅड बद्दल योजना)

६) प्रधानमंत्री आदर्श ग्राम योजना.

७) प्रधानमंत्री खनिज क्षेत्र कल्याण योजना.

८) राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियान..

९) ग्रामीण विकास मंत्रालय योजना.

१०) महिला बचत गट समृद्धी कर्ज योजना ( 2023)( महिलांना रोजगार सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य करणे)

११) नव तेजस्विनी योजना 2023 (ग्रामीण महिला सशक्तिकरण योजना)

**बचत गटाच्या उत्क्रांतीचे टप्पे**

प्रत्येक स्वयं मदत गट सहसा उत्क्रांतीच्या टप्प्यातून जातो.

१) गटाची निर्मिती.

२) निधी किंवा भांडवलाची निर्मिती.

३) गटासाठी उत्पन्न वाढविण्यासाठी आवश्यक कौशल्य विकसित करणे.

बचत गटाची गुणवत्ता कायम ठेवण्यासाठी तसेच त्यात वाढ करण्यासाठी दशसूत्री संकल्पनेचा स्वीकार करण्यात येतो. समुदाय संस्थांमध्ये वित्तीय शिस्तीबरोबर सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणे हा या दशसूत्रीचा मुख्य उद्देश्य आहे. ही दशसूत्री राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियाना अंतर्गत (NRLM) बचत गटाला लागू करण्यात आली आहे.

**दशसूत्री :–**

१) नियमित बैठक.

२) नियमित बचत.

३) नियमित अंतर्गत कर्ज व्यवहार.

४) कर्जाची नियमित परतफेड.

५) गटाचे लेख अद्ययावत ठेवणे.

६) आरोग्य व स्वच्छता.

७) शिक्षण.

८) पंचायत राज संस्थांमध्ये स्त्रियांचा सहभाग.

९) शासकीय योजनेमध्ये सहभाग.

१०) शाश्वत उपजीविका.

**महिलांचे सक्षमीकरण व परिणामकारिता :–**

सबल करणे म्हणजे सबलीकरण यामध्ये स्वतःची जडणघडण स्वतःला हवी तशी स्वतः केली पाहिजे म्हणजे स्वावलंबनातून कोणत्या बाबींना महत्त्व द्यायचे आहे ते ठरवून स्वतःची क्षमता वाढविणे म्हणजे स्व शक्ती वाढविणे. स्वतःमध्ये असलेल्या वेगवेगळ्या कौशल्याच्या, कलांचा, क्षमतांचा विकास करता येणे, परिवारामध्ये घेण्यात येणाऱ्या विविध निर्णयांमध्ये सहभागीता आणि घेतलेल्या निर्णयावर विचारपूर्वक प्रतिक्रिया, स्वयंरोजगार इत्यादी बाबींचा समावेश सशक्ति करण्यात होतो. स्त्री सक्षमीकरण हे १) मानसिक सक्षमीकरण २) आर्थिक सक्षमीकरण ३) सामाजिक सक्षमीकरण ४) राजकीय सक्षमीकरण अशा टप्प्यांच्या प्रक्रियेवर आधारित आहे. अशा उद्देश्य प्राप्तीसाठी मोठ्या प्रमाणावर बचत गटांना वित्तपुरवठा करण्यात येतो. यामध्ये रॉक क्रेडिट आणि मुदत कर्ज ही सुविधा पुरण्यात येते बचत गटांनी तयार केलेल्या मायक्रो क्रेडिट प्लॅन (MCP) च्या आधारे कर्जाची रक्कम सदस्यामध्ये वितरित केली जाते यामध्ये दोन लाखापेक्षा जास्त कर्जापैकी किमान 50 टक्के कर्ज आणि चार लाखापेक्षा जास्त कर्जापैकी 75 टक्के कर्ज प्रामुख्याने उत्पन्न उत्पादक उद्देशासाठी वापरली जावी शाखांनी प्रत्येक पात्र बचत गटांना पाच वर्षाच्या कालावधीसाठी वार्षिक ड्रॉइंग पॉवर

म्हणजे डीपी सह किमान रुपये पाच लाखाचे कर्ज मंजूर होते हा लिंकेज प्रोग्राम बँकेसोबत एसएससी च्या यशस्वी समाधानकारक ऑपरेशनच्या शून्य सहा महिन्यानंतर क्रेडिट लिंकेच केल्या जातो. यामध्ये कर्जाची व्याप्ती बचत गटाच्या समाधानकारक व्यवहारावर असते. त्यामध्ये पहिल्या टप्प्यात किमान रुपये एक लाख प्रति गट, दुसऱ्या टप्प्यात प्रतिगट रुपये पाच लाख तसेच तिसऱ्या टप्प्यात प्रतिगट रुपये दहा लाख असे कर्जाचे वाटप होते.DAY-NRLM अंतर्गत महिला बचत गटासाठी एसएसजी रुपये दहा लाखापेक्षा जास्त कर्जासाठी दहा टक्के आणि वीस लाखापर्यंत एकसमान मार्जिन आहे. तसेच अनेक योजना पैकी DAY-NRLM अंतर्गत 5.20 लाख कोटी बँक क्रेडिट मिळवले आहे.2022-2023 मधील सध्या परिस्थितीत योजनांचा विचार करता महिला बचत गट समृद्धी कर्ज योजना 2023 या योजनेअंतर्गत महिलांना स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी 5 लाख ते 20 लाखापर्यंत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. तसेच हे कर्ज 95% राष्ट्रीय महामंडळाकडून व 5%राज्य महामंडळाकडून उपलब्ध करून दिल्या जाते तसेच अल्पसंख्यांक महिलांकरिता स्वयंसहायता बचत गट योजना 2022-23 या वर्षाकरिता रुपये 6.00 कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे.

स्वयंसहायता बचत गटातील विविध योजनांना मिळालेल्या कर्जाची महिला सक्षमीकरणाच्या परिणामकार्तेत मोठी भूमिका आपल्याला दिसून येते. बहुतांश महिला शिक्षित आहेत व रोजगाराच्या शोधात असतात त्यांना त्यांच्या शिक्षणा प्रमाणे रोजगार उपलब्ध होत नाही. ते स्वतःचा उद्योग सुरू करण्यास इच्छुक असतात अशा महिलांना स्वतःचा उद्योग सुरू करण्यासाठी व त्यांना प्रोत्साहन मिळण्यासाठी तसेच स्वतःचा आर्थिक विकास घडवून सक्षम बनवण्यासाठी अशा कर्जाचा उपयोग होतो. महिला बचत गट ही केवळ योजना नसून महिला सबलीकरण, सक्षमीकरण आणि सशक्ति करण्याची एक सुप्त क्रांतिकारी चळवळ बनली आहे. यासाठी राज्य सरकारने 1994 मध्ये महिला सबलीकरण व सक्षमीकरण धोरण जाहीर केले. बचत गटाच्या माध्यमातून एकत्रित आलेल्या महिलांना गांडूळ खत, शेती व शेतीपूरक उद्योग, कुटीर उद्योग, सामूहिक शेती, कुक्कुटपाल,शेर्डी व म्हैस पालन, मळणी यंत्र, शेती यांत्रिकीकरण, उपकरणे, गारमेंट्स पार्लर, नर्सरी, कॉम्प्युटर लाभ, घरगुती पदार्थ आधी अनेक प्रकारच्या व्यवसायासाठी अर्थ पुरवठा करून त्यांना स्वयंपूर्ण बनवण्यात आले आहे. असा बचत गटाच्या माध्यमातून लघु उद्योगाबरोबर अनेक महिलांना घरबसल्या रोजगार निर्माण झाला आहे. प्रत्येक बचत गटाचा 10 ते 20 महिलांचा समावेश असल्याने सध्या स्थितीला लाखो महिला बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक सक्षम झाल्या आहेत. यामध्ये ग्रामीण आणि शहरी महिलांचा समावेश असून अनेक महिला बचत गटाची उत्पादने राष्ट्रीय स्तरावर पोहोचली आहेत. तालुका स्तरापासून राज्यस्तरापर्यंत भरवण्यात येणाऱ्या बचत गट वस्तूच्या प्रदर्शनामुळे महिलांना आर्थिक सुबत्ता प्राप्त होऊन आत्मनिर्भर बनल्या आहेत. आर्थिक विकास महिला मंडळ, महाराष्ट्रात ग्रामीण विकास विभागाच्या राज्य ग्रामीण उपजीविका अभियाना अंतर्गत उमेद अभियान आणि तेजस्विनी सारख्या सरकारी योजना महिला सक्षमीकरणासाठी महिला उद्योजकतेच्या विकासात फायदेशीर ठरल्या आहेत. त्याच प्रकारे सद्यस्थितीचा विचार करता महिलांना कौशल्य विकास प्रशिक्षण देऊन सहा महिन्यात स्वावलंबी बनवण्यावर भर दिला जात आहे. यातून महिला सक्षमीकरणाला चालना मिळत आहे.

**संदर्भ:-**


1. महिला सक्षमीकरण : स्वरूप आणि विकास, पांडुरंग मठ्ठे.
2. चौधरी प्रतिमा बी.( २०१० ):यवतमाळ स्वर्ण जयंती ग्राम स्वयं रोजगार योजनेचे आर्थिक विश्लेषण.
3. चक्रवर्ती एस. झा. ए. आरोग्य सेवा आणि महिला सक्षमीकरण: बचत गटाची भूमिका: एचसीएस,२०१२;२(१).
4. महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय, क्रमांक: एनआरएलएम योजना-३ मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक १८जुलै, २०१२.
5. https://vikaspedid.in/social-welfare
6. https://meld.maharashtra.gov.in
7. https://mrtba.org/mahilabachatg
8. https://shodhganga.inflibet.ac.in/simple-search?query=nrlm&go=
9. https://mrtba.org

# भारतातील राजकारण व महिलांची स्थिती – एक दृष्टीक्षेप

**अमोल भाऊरावजी बंड**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख, आदर्श महाविद्यालय धामणगाव रेल्वे

**सारांश**

*भारतामध्ये महिलांचा राजकीय सहभाग हा जगातील इतर राष्ट्रांच्या तुलनेत कमी असला तरी दिवसेंदिवस वाढत आहे. कारण भारताला तसा इतिहास लाभलेला आहे. भारतात प्राचीन काळापासून आधुनिक काळापर्यंत अनेक स्थित्यंतरे घडली व आज ग्रामीण स्वराज्य संस्थेपासून तर संसदेच्या निवडणुकीपर्यंत महिलांचा सहभाग वाढत आहे व तो वाढायलाही पाहिजे कारण त्यामुळे महिलांशी संबंधित असलेल्या समस्या जसे कि महिला असुरक्षितता, लिंगनिदान करून स्त्रीभ्रूणहत्या, स्त्री-पुरुष भेदभाव, बलात्कार, लैंगिक समानतेचा अभाव, स्त्री विषयक वाईट रूढी परंपरा या बाबींवर चर्चा, विचार विनिमय होऊन त्या मानिसकतेवर वचक निर्माण करणारे कायदे व्हायला पाहिजेत. त्याचप्रकारे समाजव्यवस्थेच्या निर्णय प्रक्रियेमध्ये महिला सुद्धा सहभागी असायला पाहिजेत. तेव्हाच कोठे निकोप समाज व निरोगी समाजव्यवस्था अस्तित्वात येईल.*

**प्रस्तावना :**

संपूर्ण समाजव्यवस्था हि स्त्री व पुरुष या दोन घटकांमिळून अस्तित्वात आलेली आहे. तसेच दोन्ही घटकांना अधिकार सुद्धा मिळालेले आहेत. परंतु भारतामध्ये पितृसत्ताक कुटुंबपद्धती असल्यामुळे त्यांचे रुपांत्तर पुरुषप्रधान कुटुंबपद्धतीमध्ये झाले आहे आणि त्यामुळे समाजव्यवस्थेमध्ये पुरुषाचे स्थान हे स्त्रीयांपेक्षा वरचढ झालेले आहे. तसेच समाजव्यवस्थेमध्ये स्त्रियांवर अनेक सामाजिक बंधने लादण्यात आली. स्त्रीचे स्थान हे चूल व मुल पर्यंत सीमित ठेवण्यात आले. तसेच तिला अनेक अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. स्त्रियांना शैक्षणिक, सामाजिक, राजकीय अधिकारांपासून वंचित ठेवण्यात आले. संपूर्ण कौटुंबिक जबाबदारी हि स्त्रियांवर टाकण्यात आली. समाजातील स्त्रियांवर होत असलेल्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी अनेक थोर समाजसुधारक राजाराम मोहनरॉय, महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी धोंडो केशव कर्वे, सावित्रीबाई फुले यांनी लढा दिला व अनेक समाजसुधारक व घटनातज्ञांनी त्याला कायद्याचे स्वरूप सुद्धा प्राप्त करून दिले.

**भारतीय इतिहासातील स्त्रियांचे स्थान :**

भारताच्या इतिहासाचा आढावा जर आपण घेतला तर आपल्याला असे लक्षात येईल की भारतातील राज्यकारभाराची सूत्रे हि महिलांच्या हातात होती व त्यांनी निर्णय प्रक्रियेमध्ये महत्वपूर्ण भूमिका पार पाडली. वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी शूर लढवय्यी रजियाने मानाचे स्थान प्राप्त केले. तसेच १५२४ ते १५६४ गोंडवाना संस्थानची महाराणी दुर्गावती हिचे नाव इतिहासात अजरामर झाले. सोळाव्या शतकात चांदबीबी, सतराव्या शतकातील राजकारनाला एक नवीन वळण देणारी राजमाता जिजाबाई शहाजी भोसले १७६६ ते १७९५ या काळामध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे कार्य महान असे राहिलेले आहे.

अशापद्धतीने भारताचा इतिहास हा स्त्रियांच्या तेजस्वी परंपरेने झळकतो आहे. तसेच भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनामध्ये सुद्धा स्त्रिया ह्या माघे नव्हत्या त्यामध्ये बेगम हजरत महाल, भिकाजी कामा, कित्तूर राणी चेन्नमा, अरुणा असफअलि, सुचेता कृपलानी, सरोजिनी नायडू अशा अनेक स्त्रियांनी भारताच्या स्वातंत्र्य आंदोलनामध्ये व निर्णय प्रक्रियेमध्ये स्वत: महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

**स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्त्रियांचे स्थान :**

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर स्त्रियांचे स्थान हे पुरुषा समान निर्माण करण्याचे काम समाजसुधारक व भारतीय घटनानिर्मात्यांनी केल्याचे दिसून येते. समाजव्यवस्थेमध्ये पुरुषांप्रमानेच महिलांना सुद्धा अधिकार प्राप्त व्हावे यासाठी मुलभूत अधिकार व मार्गदर्शक तत्वे दिलेली आहेत तसेच विभिन्न प्रकारचे कायदे करून स्त्री सबलीकरण करण्याचे प्रयत्न चालूच आहेत. परंतु, आपण जेव्हा महिलांचा राजकीय सहभाग असे म्हणतो तेव्हा फक्त महिलांचा मतदानाशी संबंध जोडल्या जातो. परंतु महिलांचा राजकीय सहभागाचा ऐवढा संकुचित अर्थ घेऊन चालणार नाही तर महिलांचा राजकीय सहभाग म्हणजे महिलांचा निर्णय प्रक्रियेमध्ये व राजकीय सामाजिक चेतना निर्माण करण्यामध्ये महिलांचे भरीव योगदान राहिले आहे. समाजाला नवीन दिशा देण्याचे काम अनेक महिला राजकीय नेत्यांनी केले आहे. स्वातंत्र्य मिळाल्यापासून राजकीय क्षेत्रामध्ये स्त्रियांचे प्रमाण हे

तीन ते चार टक्के होते. आज ते दहा ते बारा टक्क्यांपर्यंत पोहचले आहे. परंतु त्या प्रमाणामध्ये आणखीन मोठ्या प्रमाणात वाढ व्हायला पाहिजे.

जगभरातील पार्लमेंटची स्थिती जर बघितली तर त्या तुलनेत भारताची स्तिथी कमजोर आहे कारण विदेशामध्ये महिला खासदारांचे प्रमाण हे बावीस टक्यापेक्षा अधिक आहे. उत्तर युरोपमधील स्केंडेनेव्हीयन देशात ४० टक्क्यांपेक्षा अधिक महिला खासदार आहेत. बोलिव्हिया व दक्षिण आफ्रिका देशात महिला खासदाराचे प्रमाण ४० टक्क्यांच्या वर आहे. भारत ही जगातील सर्वात मोठी लोकशाही म्हणून स्त्रीयाचे प्रमाण सुद्धा त्या तुलनेमध्ये वाढायला पाहिजे.

**स्त्रियांच्या राजकीय सहभागामध्ये येणाऱ्या अडचणी :**

**१) निरक्षरता :**

स्त्रियांमध्ये साक्षरतेचे प्रमाण कमी असलेले दिसून येते त्यामुळे समाजातील ब-याच स्त्रियांना अधीकाराविषयी माहितीच नसते, त्या अधिकाराविषयी जागरूक नसतात. तसेच अन्याय सहन करण्याची त्यांची मानसिकता होवून जाते. तसेच राजकारण हे आपले क्षेत्र नाही असे त्यांचे मत बनल्यामुळे त्या राजकारणात सहभागी होतच नाहीत.

**२) रोजगार व आर्थिक स्वावलंबन :**

समाजातील स्त्रिया ह्या आजही पूर्णपणे अधिकाराच्या बाबतीत स्वतंत्र नाहीत. स्त्रियांवर आजही मोठ्या प्रमाणात बंधने लादलेली आहेत. त्यामुळे त्या आजही परावलंबी आहेत. समाजामध्ये कोणत्या क्षेत्रामध्ये आपण जायचे, रोजगार कोणता करावा या संदर्भात सुद्धा ते सर्वस्वी परिवारावर किंवा पुरुषांवर अवलंबून असतात. जोपर्यंत स्त्रिया ह्या रोजगार व आर्थिक बाबतीत स्वावलंबी होणार नाहीत तोपर्यंत त्यांचा राजकीय सहभाग वाढणार नाही.

**३) प्रशासकीय पदे :**

प्रशासनातील ब-याच पदांवर आजही पुरुषांचीच आकडेवारी आपल्याला दिसून येते न्यायविभागामध्ये जर आपण पहिले तर फार कमी प्रमाणात आपल्याला महिला नायाधीश दिसून येतील. त्यामुळे प्रशासनामध्ये महिलांचा सहभाग वाढला तर पर्यायाने राजकारणात सुद्धा महिलांचा सहभाग वाढेल.

**४) समाजामध्ये बाहेर मिसळन्याबाबत बंधने :**

समाजातील कोठेही कार्यक्रमामध्ये स्त्रियांना जाण्याकरिता कुटुंब प्रमुखाची पूर्वानुमती घेतल्याशिवाय बाहेर जाता येत नाही त्यामुळे एक प्रकारचे बंधन आहे, कि ज्यामुळे स्त्रियांना राजकीय सहभाग घेता येत नाही.

**स्त्रियांच्या राजकीय सहभागामध्ये वाढ होण्याकरिता उपाय :**

स्त्रियांचे राजकीय सबलीकरण करण्याकरिता मोठ्या प्रमाणात उपाययोजना करण्यात येत आहे. त्या खालीलप्रमाणे आपल्याला स्पष्ट करता येतील.

**१) पंचायत राज आणि ७३ व ७४ वी घटना दुरुस्ती :**

स्थानिक काळभार हा पंचायतीद्वारे चालविणे हि भारताची ऐतिहासिक परंपरा आहे. परंतु इंग्रजांच्या काळामध्ये या पंचायतीचे अस्तित्व फक्त कागदावर राहिले त्यामुळे खेड्यामध्ये एक अव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे भारत सरकारने १९५२-५७ या काळामध्ये पहिली पंचवार्षिक योजना पूर्ण केली. तेव्हा जनतेच्या सहभागाचे विकास कार्यात प्रमाण कसे कमी आहेत हे लक्षात आले. त्याचा अभ्यास करण्यासाठी बळवंतराव मेहता समिती नेमण्यात आली व समितीच्या शिफारशीच्या आधारावर संपूर्ण देशामध्ये राज्य सरकारांनी पंचायत राज व्यवस्था सुरु केली. त्याआधारे स्थानिक जनतेला राजकारणात सहभागी होण्याचे व स्थानिक समस्या सोडविण्याचा अधिकार प्राप्त झाला.

**७३ व ७४ वी घटना दुरुस्ती :**

१९६० नंतर संपूर्ण देशामध्ये पंचायत राजव्यवस्था राबविण्यात आलेली होती. परंतु त्यामध्ये अनेक उणीवा दिसून आल्या त्या उणीवांचा अभ्यास करण्यासाठी विभिन्न प्रकारच्या समित्या नेमण्यात आल्या त्या समित्यांनी पंचायत राज व्यवस्थेतील उणीवा म्हणजे राज्य सरकार स्थानिक सरकारांना पुरेशे अधिकार देत नाहीत, स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नियमित निवडणुका होत नाहीत व स्थानिक स्वराज्य संस्था ह्या विशिष्ट जातीच्याच हाती केंद्रित झालेल्या होत्या. अशा प्रकारच्या उणीवा होत्या. त्यामुळे १९९२ मध्ये ७३ व ७४ वी घटनादुरुस्ती घडून आली. त्यानुसार ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थाना कायदेशीर अधिकार प्राप्त होऊन त्यांना घटनात्मक दर्जा सुद्धा प्राप्त झाला. तसेच ग्रामीण व शहरी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये स्त्रियांकरिता ३३ टक्के जागा राखीव ठेवण्यात आल्या काही घटक राज्यांमध्ये ५० टक्क्यांपर्यंत आरक्षण वाढविण्यात आले.

**निष्कर्ष :**

अश्याप्रकारे राजकारणामध्ये किंवा राजकीय प्रक्रियेमध्ये स्त्रियांचा सहभाग वाढणे आवश्यक आहे. कारण त्यामुळे स्त्रियांसंदर्भात असलेल्या समस्यांचे निराकरण मोठ्या प्रमाणात होईल ब्राझीलमध्ये महिला महापौर असल्यामुळे तेथे बालमृत्यूचे प्रमाण कमी आहे. तसेच बलात्कार, अपहरण, हुंडाबळी, लैंगिक छळवणूक, वैश्या व्यवसाय अशा विभिन्न समस्येसंदर्भात चर्चा विचारविनिमय मोठ्या प्रमाणात होऊन जेणेकरून कठोर कायदे निर्माण करता येतील तसेच मंत्रीमंडळामध्ये सुद्धा विभिन्न जबाबदारीचे खाते स्त्रियांना मिळायला पाहिजेत. आपण व्यवहारामध्ये पाहतो कि बालकल्याण विभागाचे मंत्रिपद स्त्रियांना दिल्या जाते. तसेच गृह, अर्थ हि खाती सुद्धा महिलांना द्यायला पाहिजेत व महिलांचा आत्मविश्वास वाढविण्यात प्रयत्न करायला पाहिजेत. अशापद्धतीने भविष्यामध्ये महिलासुद्धा प्रभावी राजकारण, समाजकारण व अर्थकारण करू शकतील. हेच यामधून सिद्ध होते.

**संदर्भ :**

१. भारतातील घटनात्मक तरतुदी आणि स्थानिक स्वशासन – रा. ज. लोटे, पिंपळापुरे प्रकाशन.
२. महिलांचा निवडणुकीतील सहभाग – लक्ष्मी अय्यर योजना विकास समर्पित, मासिक, नवी मुंबई.
३. भारतीय लोकशाहीत महिलांचे स्थान नगण्यच लोकसत्ता, योगेंद्र यादव. ९ मार्च २०१७.
४. राजकारणात महिला आजही उपेक्षित, अंबर कुमार घोष, १६ सप्टेंबर २०२२. (Observe Research Foundation)

# भारतीय स्त्री: गृहजीवनातील स्थान

प्रा. ज्योत्स्ना श्री. जोशी (पाटील)
सहयोगी प्राध्यापक, रा. आ. महाविद्यालय, वाशीम.

प्रकृती-पुरुष, माया ब्रह्म यांच्या संयोगाने सृष्टीची निर्मिती झाल्याचे सर्वमान्य आहे. त्याप्रमाणे या निर्मिती विश्वालाटिकवून त्यात सातत्य राखण्यासाठी प्रजोत्पादन आवश्यक ठरते. स्त्री आणि पुरुष या घटकांमुळे वंश सातत्याचे महत्त्वही येथेच अधोरेखित होते. मानवाच्या प्राथमिक अवस्थेत रानावनात राहणारी मानव जात स्वतंत्र राहात असे. कालांतराने माणूस समूह करून राहू लागला. अनेक समाजशास्त्रज्ञांच्या मते, गटागटाने म्हणजेच टोळी करून राहणाऱ्या मानव समूहात स्त्री-पुरुष एकमेकांशी शरीरसंबंध ठेवीत. त्यामुळे प्रत्येक स्त्रीची संतती ही सर्व गटाची संतती मानली जाई. अनिर्बंध लैंगिक संबंध मानवी समाजाच्या प्रथमावस्थेत प्रचलित होते असे दिसून येते. म्हणजेच पती-पत्नी, त्यांचे कुटुंब ही कल्पना अस्तित्वात आली नव्हती.

मानवी समाजाचा हळूहळू विकास होत गेला. जुन्या ऋग्वेद संहितेत भारतीय समाजाच्या व त्यातील स्त्री-पुरुष संबंधाच्या कौटुंबिक जीवनासंबधीचे उल्लेख सर्वप्रथम दिसून येतात. तत्कालिन समाजात विवाहसंस्था रूढ झाली होती. आदर्श वैवाहिक जीवनाच्या सर्व कल्पना समाजात रूढ झाल्या. त्या सर्वमान्य होत्या. वधुपित्याने वराकडे जाऊन मागणी करणे, विवाह वधु पित्याकडे साजरा होणे. त्या प्रसंगी वराने माझ्या सर्व सुखाची भागीदारीनम्हणून माझ्या घरात पत्नी या नात्याने तू प्रवेश करावा व माझ्या प्रेमाचा स्वीकार करावा' असे सर्वसमक्ष मान्य करित असे. तसेच पतीगृही प्रवेश करताना "तुच या घराची स्वामिनी आहेस"असे म्हणून तिला सर्व हक्क देत असे.

इथेच कुटुंब व्यवस्थेचा जन्म झाला. पती-पत्नी, त्यांची मुले, बहिण भाऊ, आई वडील असे एकत्रित नांदू लागले. सुधारलेल्या समाजाचा पायाच पती-पत्नी हा आहे. गृहजीवनाचा हा पाया आहे. एका स्त्रीने एकाच पुरुषाशी एकनिष्ठ राहणे येथे अभिप्रेत आहे. वेदपूर्व काळात रूढ असलेली विवाहविषयक कल्पना स्पष्ट होते. सहजीवनाबद्दल प्राचीनांच्या मनात निष्ठा होती. विवाह संस्थेमुळे पत्नीही पतीच्या सुखदुःखातील वाटेकरी, गृहाची स्वामिनी, सहचारिणी मानली गेली. सासरी विवाहित मुलीचे स्वागतही भाग्याचे ठरले. ती त्या घरची लक्ष्मी मानली गेली. त्या काळात भारतीय समाजाने संस्कृतीचा उच्च टप्पा गाठला होता.

स्त्रियांना देण्यात येणाऱ्या या श्रेष्ठ स्थानाचे मूळ शिक्षणपद्धतीत दिसून येते. त्याकाळानुसार आठव्या वर्षी मुलांप्रमाणे मौजीबंधन होऊन स्त्रियांनी वेदाध्ययन करणे मान्य होते. भारतीयांत असणारी बहुपत्नीकत्वाची पद्धत, स्त्रियांच्या पावित्र्याच्या कल्पना अन्यायकारक असल्याचेही दिसून येते. स्त्रियांच्या पावित्र्यापेक्षा तेव्हा त्याकाळात वंश संरक्षण वसंवर्धनास अधिक महत्त्व दिल्याचे दिसून येते.

वैधव्याबद्दलही ऋग्वेदकालीन समाजाचा दृष्टिकोण उदारमतवादी होता. पतीचा भाऊ पत्नी म्हणून तिचास्विकार करीत असे. विधवेला पुनर्विवाहास मान्यता होती हे यावरून दिसून येते.

कुटुंबसंस्थेची प्रमुख स्त्री ठरली आणि त्याचबरोबर कुटुंबसंस्था भरभक्कम झाली. विवाह हा पाया व त्यावर उभारलेले मंदिर म्हणजे घर ठरले. राष्ट्रसंतांनी तर विवाहाला समाज मंदिराचा पाया संबोधले आहे.

विवाहाचा जो संस्कार। त्याचे महत्त्व सर्वात थोर।

त्या पायावरीच समाज मंदिर ।म्हणोनी सुंदर करा यासी ।।१०२

ग्रामगीता अध्याय २१

कुटुंबाचा विकास, समाजाचा विकास पर्यायाने देशाच्या विकासात फार मोठा हातभार या गृहस्वामिनीचा आहेनिर्विवाद मान्य करावे लागते. स्त्री एकाच वेळी आई, बहिण, सून, सासू, पत्नी, वहिनी, आत्या, मावशी, काकू, आजी ही कौटुंबिक नाती निभावते. या नातेसंबंधातून तिच्यातील ऋजुता, विनय, आज्ञाधारकपणा, सोशिकता, कुटुंब जोडून घेण्याची क्षमता, आतिथ्यशीलता, सणसमारंभातून दिसणारी तिची धार्मिकता दिसून येते. एका घराचा उंबरठाचा त्याग करून दुसराउंबरठा ओलांडते ते घर, ती माणसे आपलीशी करावी. तिचे अस्तित्व ती उभे करते. माहेर सोडून सासरी येते. ती तिथे माहेर निर्माण

करण्यासाठी. म्हणून कवयित्री बहिणाबाई म्हणतात,"लेकीच्या माहेरासाठी माय सासरी नांदते."

आजची स्त्री तर घराबाहेर पडली आहे. शैक्षणिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक, संशोधन, खेळ, कला, संरक्षण, अवकाश क्षेत्र सर्वत्र तिचा प्रवेश झाला आहे. नवीन नवीन क्षेत्रात स्त्रियांच्या सहभागाचा आलेख वाढताच आहे. असे असले तरी 'गृहस्वामिनी'चे पद मात्र अबाधित आहे. स्त्रियांनी प्रगती केली. पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून स्त्रिया काम करतात. हे सगळे मान्य करूनही एक स्त्री म्हणून तिची जबाबदारी, कर्तव्य स्त्रिया बजावताना दिसतात. कुटुंब प्रमुखाचे स्थान केवळ पुरुषाचे हा विचार आता मोडीत निघाला आहे. कुटुंबाचीही जबाबदारी घेण्यास स्त्रिया सक्षम आहेत. शिकलेल्या स्त्रियाही घराला, कुटुंबाला प्रथम प्राधान्य देतात. 'आई'च्या भूमिकेत स्त्री जेव्हा येते तेव्हा तिचे सगळे विश्व बदलून जाते. आई म्हणून सुजाण समजूतदारपणाने तिचे विश्व त्यापुढे जाते. अपत्यांचे संगोपन, संस्कार, व्यक्तिमत्व विकास, शिक्षण त्यातून स्त्री स्वतःला वेगळे करीत नाही.

विवाहानंतर नवीन कुटुंबात समरसून जाणे, ते आपले घर म्हणून त्याचा स्विकार करणे, त्या घरातील माणसांना आपले समजणे, रीतीभाती, पद्धती या सर्वांशी जुळवून घेणे. येथे नवीन भूमिकेत वावरणारी 'स्त्री' त्या कुटुंबाची 'गृहस्वामिनी' ठरते. कार्यकर्तृत्व, पद, कुठलेही असो पण घर हे तिचे कार्यक्षेत्र तिच्यासाठी महत्त्वाचे आहेच.

घरातील सण, समारंभ, रीतीभाती, पद्धती सांभाळणे, त्या टिकवून ठेवणे. कुटुंबातील सर्व नाती गोती सांभाळणेकोणत्या स्त्रीने नाकातले बरं. याला तडा देणारे दोन-चार उदाहरणे सापडतीलही पण ती सार्वत्रिक परिस्थीती समाजात दिसत नाही. कुटुंबाला एकत्र ठेवून त्यात सामंजस्य, सलोखा निर्माण करणे हे स्त्रीचे फार मोठे कार्य ठरते. हे मान्य करावेच लागते. घराला घरपण देण्याचे काम स्त्रियांचेचआहे. आजची शिकलेली स्त्री येथे कमी ठरत नाही. असेच चित्र समाजात दिसून येते. नौकरी व कुटुंब याचा तोल सांभाळत ती जीवनात आनंद निर्माण करते. शिकलेली स्त्री घराबाहेर पडली, अर्थार्जन करू लागली व प्रपंचाला आर्थिकदृष्ट्याही तिने हातभार लावला. तेच काम कष्टकरी वर्गातील स्त्रिया तर फार पूर्वीपासून करीत आहेत. पां. श्रा. गोरे यांच्या 'पाठराखीण' कवितेत शेतकऱ्याच्या बरोबरीने काम करणारी ही सखीच आहे. गवत शेतकरी कापतो तर पेंडी ही त्याची सखी बांधते आणि त्याच्यासाठी रांधुन डोईवर शिदोरीही तिच आणते. गृहस्वामिनीचे सुंदर चित्र या कवितेत रेखाटले आहे.

खांद्याला खांदा लावून कुटुंबासाठी कष्ट करणारी स्त्री देशाचे सर्वोच्च पदावर विराजमान स्त्रीही कुटुंबाचा आधार ठरते. जात्यातील दाणे खुंट्याला घट्ट धरून ठेवतात. तसे 'स्त्री' कुटुंबाला धरून ठेवते. म्हणून स्त्रियांचे 'गृहस्वामिनी'चे पद अबाधित आहे.

**संदर्भ**

१. भारतातील थोर स्त्रिया संपा.रां.वा. दांडेकर

२. वेदकालीन स्त्रिया मधुकर आष्टीकर

३. ग्रामगीता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

# महिला आणि मानवाधिकार

**प्रा डॉ केशव सिताराम गोरे**
सह.प्राध्यापक, श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी अकोला
keshavgore101@gmail.com

**प्रस्तावना**

प्रत्येक व्यक्ती हा जन्मत:च स्वतंत्र आहे. मानवाला स्वतंत्रपणे जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. स्वतःचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी मानवाधिकार ही संकल्पना विकसित झाली. मानवी हक्क नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक मानले जातात. सर्वप्रथम ही संकल्पना ग्रीक व रोमन विचारवंत आणि ख्रिस्ती तत्त्वज्ञानातून विकसित झाली. मानवी विकासाची मुळे ही इतिहासात पार पुरातन रुजलेली दिसतात. ही संकल्पना आधुनिक नसल्याची कल्पना अभ्यासावरून लक्षात येते. विविध अभ्यासकांच्या मते, मानवी हक्क स्थल व काल सापेक्षरित्या प्रत्यक्षात आली आहेत. प्रचलित विचार परंपरेनुसार मानवी हक्क ही संकल्पना स्वभाव सिद्ध हक्क म्हणून पूर्वापार ओळखल्या जाणाऱ्या नैसर्गिक हक्कांच्या संकल्पनेवर आधारित आहे.

महिलांना कोणत्याही दबावाशिवाय आपले स्वतःचे निर्णय घेण्यास सक्षम बनविणे आणि त्यांना पुरुषांच्या बरोबरीने वागविणे हे देशाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यावश्यक आहे. आजचे भारतीय संविधान सर्व नागरिकांना भेदभाव न करता समानतेच्या अधिकाराची हमी देते. त्यानुसाररंग, धर्म, लिंग, प्रदेश, भाषा इत्यादींच्या आधारे कोणत्याही नागरिकांशी असमान वागणे निषीद्ध आहे, असे असूनही भारतात लैंगिक भेदभाव दिसून येतो. म्हणून प्रस्तुत शोध निबधाद्वारे महिला आणि मानवाधिकार या माध्यमातून भारतीय महिलाना संविधानाद्वारे प्राप्त झालेल्या मानवी अधिकारावर प्रकाश टाकण्यात आला आहे.

**महिला आणि मानवाधिकार**

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारतीय राज्यघटनेनुसार महिलांना पुरुषांच्या बरोबरीने हक्क व अधिकार प्राप्त झाले असले, तरी समाजात तसे स्थान निर्माण करता आले नाही. आपल्याला देशाची प्रगती करायची असेल तर महिलांची प्रगती करणे आवश्यक आहे. त्यांना पुरुषांच्या बरोबरीने समान दर्जा व अधिकार बहाल करावी लागतील. स्त्री व पुरुषाची समानता आपल्याला साधता आली नाही, तर त्यांच्या ज्ञानाचा व बळाचा वापर करता येणार नाही.त्यांच्या जवळील बुद्धिमत्ता, कला तसेच कौशल्याचा वापर केला नाही, तर ती नारीशक्ती विनाकारण निकामी जाईल. यासाठी त्यांचा विकास व सन्मान आपणास करावा लागेल. एकूण देशाजवळील बलापैकी 50% बल हे महिलांजवळ आहे. याचा आपणास विचार करणे क्रम प्राप्त आहे.

कारण कायदे करून चालत नाही. प्रत्यक्ष पुरावा मागितला जातो. समस्याचे निराकरण कसे होईल ही जनजागृती होत नाही. भारतातील सर्व पक्ष, संघटना, प्रबोधनकार समाजसुधारकयांनी जागृती घडवून आणणे आवश्यक ठरते. अनेक महिलांनी आवाज उठवून उद्बोधन केले, पण समाजात परिवर्तन झाल्याशिवाय आणि कठोर पावले उचलल्याशिवाय हे शक्य दिसत नाही. पक्ष, स्वयंसेवी संघटना आज महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य करीत आहेत. 'समस्या सोडवीन' च्या 'स्त्रीवादी चळवळी' सुरू झाल्या आहेत. त्यामधून अनेक कुप्रथा, वाईट प्रथा भारतीय समाजातून हद्दपार होत आहेत. स्त्री जागृती घडवून आणण्यासाठी प्रत्येक स्तरावर प्रयत्न घडत असताना दिसतात. परंतु गतिमानता कार्यक्षमता दिसत नाही. सर्व क्षेत्रात अनेक महिला पुरुष वर्गाला स्पर्धक आहेत. महीलांनी एकत्रित बचत खाते उघडून रोजगार निर्मिती सुरू केली आहे. महिला सक्षमीकरण काळाची गरज आहे. मानवाधिकारांच्या कार्यातून महिलांच्या समस्या प्रकाशात आणल्या जात आहेत. स्त्री-पुरुष, समाज, सरकार यांच्या प्रयत्नातून स्त्री सक्षमीकरण होत आहे. भारत सरकारने 24 एप्रिल 1993 रोजी 72 वी घटनादुरुस्ती करून पंचायत राज कायद्यानुसार महिलांना आरक्षण लागू केले आहे. संपत्तीच्या अधिकारांमध्ये वाढ करून मुलाप्रमाणे मुलीच्या संपत्ती विषयक अधिकाराला मान्यता देण्यात आली आहे. प्रसार माध्यमे, महिला संघटना चळवळीच्या स्वरूपात कार्य करीत आहेत.

केंद्रीय समाज कल्याण बोर्ड, महिला आणि बालविकास कल्याण मंत्रालय, आरोग्य कुटुंब कल्याण मंत्रालय, ग्रामीण विकास मंत्रालय उपयुक्त कार्यक्रम राबवून, तसेच महिला वर्गाला सहभागी करून महिलांमध्ये जागृती निर्माण करीत आहेत. हेच मानवाधिकाराचे कार्य आहे. या सर्व धोरणामुळे बऱ्याच प्रमाणात महिलांचे अधिकार सुरक्षित झाले आहेत. परिस्थितीत बदल होत आहेत.2001 हे वर्ष महिला सक्षमीकरण वर्ष म्हणून घोषित करण्यात आले आहे. स्वातंत्र्याच्या पाच दशकांनंतर असे वर्ष घोषित करणे व विशेष संधी मिळवून देण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे यावरून व्यवस्थेमध्ये असणारा लिंगभेद लक्षात येतो.

महिलासक्षमीकरणाची प्रक्रिया ही सामायिक स्वरूपाची आहे व यासाठी समाज घटकाचे योगदान व प्रयत्न अत्यंत महत्त्वाचे मानले जातात. विविध उपक्रम व वेगवेगळे प्रकल्प, योजना यामध्ये जास्तीत जास्त महिलांना सहभागी करून घेणे व गुणवत्ता वाढवण्याचे दृष्टिकोनातून प्रयत्न करणे गरजेचे आहे. तसेच समाजाच्या सुख-समृद्धीसाठी महिलांचे सक्षमीकरण होणे आवश्यक आहे. यावर लक्ष केंद्रित करण्याची गरज आहे.

महिलांच्या सामाजिक राजकीय स्थानाबाबत आणि खऱ्याखुऱ्या प्रतिनिधीत्वा बाबत आपल्याकडे चित्र वेगळेच आहे. अद्यापही प्रतिकात्मक गोष्टीवरच आपला भर असतो. अद्यापही महिलांचे मानवाधिकार विस्तारण्यासाठी झगडावे लागत आहे. महिला प्रतिनिधीला उमेदवारी दिली जाते. काही निवडून येतात आणि जबाबदारीचे पद मिळवतात. पण व्यापक दृष्टीने पाहता सामाजिक पातळीवर मात्र राजकीय सत्ता पुरुषी वर्चस्वाखाली दिसते. पक्षाच्या अंतर्गत पदाधिकाऱ्यांच्या उतरंडीपासून अनेकदा महिला दूरच राहिलेल्या दिसतात. मात्र विविध राजकीय पक्षाची निगडित असलेल्या महिलांच्या गटाचा उपयोग सामाजिक उपक्रम आणि मोहिमांसाठी केला जातो.

भारतीय समाज व्यवस्थेला विषमतेची किनार आहे. भारतीय संविधानाने ही विषमतेची किनार काढली असली तरी येथील काही प्रतिगामी शक्ती विभेदाचे कार्य करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे स्पष्ट केले की, एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप मी त्या समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरून करणे, यावरून हे आपल्या लक्षात येईल की, महीलांच्या उत्थानाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये किती महत्त्वाची भूमिका बजावली असेल. भारतीय समाज व्यवस्थेतील असणारे अनेक विषमतामुलक घटक मानवी हक्कांना पायदळी तुडवीत होते. भारतीय संस्कृतीमध्ये आपणाला स्त्रियांविषयी विरोधाभासाची भूमिका आढळून येते. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित वर्णन केलेले आढळून येते व दुसऱ्या बाजूला समाजामध्ये प्रत्यक्षात दुय्यम स्थान आढळून येते. काही रुढी व परंपरा यांच्याद्वारे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विषमता, विभक्तीकरण झाल्याचे दिसून येते. काही स्त्रियांना सार्वजनिक जीवनामध्ये दुय्यम स्थान देण्यात आले देण्यात आले. त्यामुळे स्त्रियांच्या न्याय व हक्काकरिता काही चळवळी आवाज बुलंद करीत आहेत. भारतीय संविधानाने स्त्रियांना विविध क्षेत्रात अधिकार देऊन त्यांना सशक्त केले आहे.

महिलांच्या अधिकाराला खऱ्या अर्थाने कोणी बळकट केले असेल तरते म्हणजे भारतीय संविधानाने. स्त्रियांना वेगवेगळया प्रकारचे अधिकार देऊन तिला पुरुषाप्रमाणे समान अधिकार बहाल केले. प्राचीन भेदभावाच्या संकल्पनांना मूठ माती देऊन आधुनिक प्रगत व पुरोगामी विचारसरणीनुसार समाज व्यवस्थेची बांधणी करणे, स्त्रियांना पुरुषांप्रमाने समानाधिकार देऊन, स्त्री पुरुष समानता नष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल निर्माण केले.डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड बिल नऊ भागात 139 कलमांमध्ये आणि सात परिशिष्टात विभागले आहे.

**निष्कर्ष**

वरील शोधनिबंधाच्या आधारे असे आढळून आले की, भारतीय महिलांच्या उत्थानाकरिता संविधानाने योग्य प्रकारची भूमिका निभावली आहे. भारतीय संविधानाने महिलांना पुरुषासारखेअधिकार दिले आहेत. एकेकाळीमहिलांना अबला समजण्यात येत होते. परंतु आज काही प्रमाणात महिलांना जो आत्मसन्मान व स्वाभिमान प्राप्त झाला आहे, तो म्हणजे भारतीय संविधानामुळेच. भारतीय संविधानाने महीलांच्या विविध प्रश्नांना सोडवण्याकरता वेगळ्या प्रकारचे कायदे निर्माण केले. त्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग मोकळा करून दिला.

भारतआज सर्व क्षेत्रात प्रगती करत आहे. महिला वर्ग सर्व क्षेत्रात भरारी मारत आहेत. पंचायतराज कायद्यापासून संपत्ती अधिकार पर्यंत महिला वर्गाची

वाटचाल पूर्ण झाली. त्यामध्ये मानवाधिकारांचे महत्त्व दिसते. महिलावर्ग हक्क, अधिकाराची भाषा बोलत आहेत. भारतात साक्षरता वाढविणे आवश्यक आहे. महिलांच्या प्रश्नासाठी मानवाधिकाराचे महत्व विसरता येत नाही. महिला विकासाची लढाई हेच मानवाधिकाराच्या महत्त्वाचे फलीत आहे.

**संदर्भ ग्रंथ**


१. देशमुख अलका, विविधांगी आयामातून स्त्री, श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर 2011.
२. मेहेत्रे स्मिता, भारतीय स्त्री व मानवाधिकार, श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ,नागपूर.
३. भारंबे नंदकुमार,मानवी हक्क व समाज, निराली प्रकाशन, पुणे 2010.
४. पवार दीपक, महिलांचे राजकीय सक्षमीकरण, श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ, नागपूर 2013.

# महिलाओं के स्वास्थ्यगत समस्याओं में महिला परंपरागत चिकित्सकों की भूमिका (दुमका जिले के विशेष संदर्भ में)

**डॉ. नम्रता गौरव**
असिस्टेंट प्रोफेसर समाजशास्त्र विभाग संताल परगना महिला महाविद्यालय, एसकेएमयू, दुमका
namratahm81@ gmail.com

**शोध सार**

*वर्तमान युग महिला सशक्तिकरण का युग है। महिलाओं के द्वारा किए गए कार्य आज पूरे विश्व में यह सिद्ध कर रहे हैं कि वर्तमान समय में ऐसा कोई भी क्षेत्र नहीं है जहाँ महिलायें अपना परचम नहीं लहरा सकती हैं। परंतु, प्रस्तुत शोध–आलेख ग्रामीण महिलाओं के सशक्तिकरण का अध्ययन करते हुए यह भी स्पष्ट करता है कि सशक्तिकरण की राह में कहीं न कहीं आज भी अनेक अड़चने हैं। महिला चिकित्सकों के द्वारा पारंपरिक लोक ज्ञान लोक चिकित्सा का संरक्षण व उन्हें बढ़ावा देना सचमुच प्रशंसनीय है, परंतु इसका संरक्षण व इसे अत्यधिक जनोपयोगी बनाना और अन्य महिलाओं को सिखाना दुष्कर प्रतीत हो रहा है। इसका कारण यह है कि वर्तमान परिदृश्य के लोलुपवादी विचारधारा में ये संताल समुदाय आज भी प्रकृति के सरक्षण में स्वयं को ज्यादा सुरक्षित महसूस करते हैं और अपने ज्ञान को किसी अन्य के साथ न बांटकर अपने समुदाय अथवा परिवार तक ही संरक्षित करना अपना धर्म समझते हैं। इसलिए आज के परिदृश्य में एक पारंपरिक लोकचिकित्सक माँ द्वारा न तो अपनी बहु पर विश्वास के साथ ज्ञान को बांटा जा रहा है और ना ही दूसरे घर जाने वाली बेटी को वह ज्ञान सिखाया जा रहा है, बल्कि अपने उस बेटे को सिखाया जा रहा जो उनका सबसे भरोसेमंद हो। अतः महिला सशक्तिकरण के संदर्भ में महिला परंपरागत चिकित्सकों की वर्तमान स्थिति में यह एक महत्वपूर्ण चुनौती है कि एक महिला के द्वारा एक अन्य महिला को भी वही ज्ञान कैसे प्राप्त हो जिसे उसने अपनी मेहनत से अर्जित किया है।*

**मुख्य बिंदु** – महिला, स्वास्थ्य, समस्या, परंपरागत चिकित्सा, जड़ी–बूटियाँ, दैवीय शक्ति, महिला सशक्तिकरण।

## परिचय

विश्व के किसी भी समाज में अच्छे स्वास्थ्य की परिभाषा केवल बीमारी का न होना ही नहीं है, बल्कि यह अच्छे शारीरिक, मानसिक और सामाजिक खुशहाली से भी संबंधित होता है। जबकि, इसके विपरीत अक्सर शहर हो या गाँव इनके सामाजिक संबोध में स्वास्थ्यगत् समस्याओं को बीमारी, डाक्टर और दवाओं के साथ जोड़ दिया जाता है। ऐसे में जनसाधारण के रूढ़िगत विचारों के प्रभाव से स्वास्थ्यगत छोटी तकलीफें भी खर्चीली समझ लेने के कारण बहुत बड़ी नजर आती है और इस मानसिकता के कारण बीमार व्यक्ति अपने बीमारी के साथ–साथ मानसिक तनाव का भी शिकार होता है।

महिलाओं की स्वास्थ्यगत समस्यायें भी ऐसी ही हैं। यदि उन्हें बुखार भी आ जाये तो घर–परिवार के लोग यहाँ तक कि परिवार की अन्य महिला सदस्य भी तंज कसती हैं कि काम ना करना पड़े इसलिए बीमार हो गई है। ऐसी परिस्थिति में ना तो उन्हें डॉक्टर दिखलाया जाता है और ना ही दवाईयाँ ही दी जाती हैं। अपने मानसिक संबंल से महिलाएँ कार्य करने के लिए जबर्जस्ती खुद को बीमारी से मुक्त मान लेती हैं लेकिन कुछ समय के लिए दबा दी जानेवाली बीमारियाँ अक्सर बड़ा रूप धारण कर लेती हैं। बड़ी बीमारियों के जोखिम से बचने के लिए शहरों में अनेक सुविधाएँ उपलब्ध हैं, लेकिन ग्रामीण इलाकों में ये सुविधाएँ आज भी न के बराबर है।

ग्रामीण इलाकों में अधिकांश जनसंख्या आज भी परंरपरागत चिकित्सकों पर ही निर्भर रहती हैं। इन परंपरागत चिकित्सकों को स्थान विशेष के आधार पर कहीं 'ओझा, कहीं गुनी, कहीं 'वैद्य', कहीं बैगा इत्यादि के नाम से संबोधित किया जाता है।

यह संबोधन अधिकांशतः पुरूषवादी मान लिया जाता है लेकिन वर्तमान समय में जब महिला सशक्तिकरण का एक नया दौर चल रहा है, ऐसे में इसका एक पक्ष यह भी है कि ऐसे परंपरागत चिकित्सकों में महिला चिकित्सकों की उपस्थिति भी गाँवों में पाई जाने लगी हैं, जिनपर अनुसंधान का प्रकाश ज्यादातर नहीं पड़ा है।

### अध्ययन का उद्देश्य–

प्रस्तुत शोध–आलेख में अध्ययन के उद्देश्य को तीन मुख्य बिंदुओं मै वर्गीकृत किया गया है–

1. दुमका जिले के महिलाओं में स्वास्थ्यगत समस्याओं का अध्ययन।
2. दुमका जिले के महिला परंपरागत चिकित्सकों का परिचयात्मक अध्ययन।
3. महिला सशक्तिकरण के संदर्भ में महिला परंपरागत चिकित्सकों की वर्तमान स्थिति का अध्ययन।

**संबंधित साहित्य की समीक्षा–**

निःसंदेह महिला अस्वास्थ्यकर होती है, तो इसका प्रभाव उसके स्वच्छता एवं परिवार पर पड़ता है। महिला अस्वास्थ्यकरता अक्सर अज्ञानता, जागरूकता की कमी और गैर–सुविधा की कमी में होती है। घोषित महिला समाज और परिवार की आधार मानी जाती है। यदि महिलाएँ ही अस्वास्थ्यकर हैं, तो एक उज्जवल और निरोगी समाज की कल्पना ही नहीं की जा सकती है। इसलिए महिला विकास हेतु स्वास्थ्य महत्वपूर्ण है।[1] (सोनाकर, 2014)

गत आठ वर्षों में मितानिनों की सक्रियता से स्वास्थ्य की स्थिति में बहुत से सुधार संभव हो पाये हैं। ग्रामीण शिशु मृत्यु दर में एक बड़ी गिरावट दर्ज की गई है। स्वास्थ्य की स्थिति निश्चित रूप से पहले से मजबूत हुई है, किन्तु इसमें और भी सुधार की गुंजाइश है। ........मितानिन पूर्ण रूप से स्वयं सेवी है एवं उसका उत्तरदायित्व केवल उसके पारा के जन समुदाय के प्रति है। (देवे, यादव, 2020)

अच्छा स्वास्थ्य एक ऐसी व्यक्तिगत व सामाजिक अनुभूति है जिसमें महिला अपने आप को सक्रिय, सृजनशील, समझदार तथा योग्य महसूस करती है : जिसमें उसके शरीर के जख्मों को भरने की क्षमता बरकरार रहती है : जिसमें उनकी विभिन्न क्षमताओं व योग्यताओं को यथा–योग्य सम्मान मिलता है : जिसमें वह चयन करने का अधिकार रखती है तथा निर्भीक रूप से अपने आप को अभिव्यक्त कर सकती है और जहाँ चाहे वहाँ आ जा सकती है।[3] (विकासपीडिया, 2020)

**अध्ययन–क्षेत्र–**

दुमका शब्द की उत्पत्ति दामिन–ई–कोह (अर्थात्, पहाड़ का आंचल) शब्द से माना जाता है। भारत के झारखंड राज्य में अवस्थित दुमका उपराजधानी है। यह सन्थाल परगना प्रमंडल का मुख्यालय भी है। दुमका में दस प्रखंड हैं जो निम्नलिखित हैं–दुमका, गोपीकांदर, जामा, जरमुंडी, काठीकुंड, मसलिया, रामगढ़, रानेश्वर, शिकारीपाड़ा और सरैयाहाट। यहां के आदिवासियों में मुख्यतः संताल आदिवासीयों की संख्या ज्यादा है। संथालों की बहुलता के कारण ही इस प्रमंडल का नाम संताल परगना रखा गया। 1855 में संथाल विद्रोह के बाद भागलपुर से काटकर इसे अलग जिला बनाया गया। समय के साथ प्राचीन दुमका जिला से कटकर 5 और जिले बने हैं–गोड्डा, देवघर, साहेबगंज, पाकुड़ और जामताड़ा।[4] दुमका जिले का क्षेत्रफल 4,404 वर्ग किलोमीटर है, और 2011 की जनगणना के अनुसार दुमका की जनसंख्या 1,321,096 और जनसंख्या घनत्व 300 प्रति वर्ग किलोमीटर है। दुमका की साक्षरता दर 62.54 प्रतिशत है। महिला पुरूष अनुपात यहाँ पर प्रति 1000 पुरूषों में 974 महिलायें हैं।[5]

**अध्ययन की विधियाँ** : स्वास्थ्य से संबंधित तथ्यों की जानकारी एकत्रित करने एवं महिला पारंपरिक चिकित्सकों से जनसम्पर्क के वक्त निम्न विधियाँ प्रयोग की गई–

(क) क्षेत्र–भ्रमण
(ख) समूह–वार्तालाप / साक्षात्कार
(ग) नियंत्रित अवलोकन
(घ) असंरचित साक्षात्कार तकनीक
(च) केस स्टडी

महिलाओं की स्वास्थ्य संबंधी जानकारी के लिए समूह में वार्तालाप संताली, बंगला एवं हिन्दी भाषा में की गई।

**तथ्य संकलन संबंधी सहायक सामग्री–**

डायरी, नोट पैड, पेन, मोबाइल–कैमरा का प्रयोग सहायक सामग्री के रूप में किया गया। तथ्यों की सम्पूर्ण जानकारी लिखित रूप में एवं कैमरे के माध्यम से छायाचित्र संकलित किये गये।

**अध्ययन का विश्लेषण–**

**1. दुमका जिले के महिलाओं में स्वास्थ्यगत समस्याओं का अध्ययन :**

दुमका जिले के महिलाओं में स्वास्थ्यगत समस्याओं का अध्ययन से पूर्व यह स्पष्ट करना आवश्यक है कि महिला स्वास्थ्य को लेकर इस क्षेत्र में एक जटिल अवधारणा का विकास हो चुका है जिसमें महिलाओं की बीमारी का मतलब गर्भावस्था तथा प्रसव की समस्यायें हैं। अर्थात् संतानोत्पत्ति के कार्य को छोड़ दिया जाय तो महिलाओं के अन्य स्वास्थ्य संबंधी समस्याओं को समस्याओं की गिनती में रखा ही नहीं जाता है। जबकि, दुमका जिला में महिलाओं के चिहिन्त स्वास्थ्यगत समस्याओं में एनीमिया सबसे प्रमुख बीमारी है। यहां एनीमिक महिलाओं का प्रतिशत अत्यधिक उच्च है। सदर अस्पताल दुमका से प्राप्त सूचना के आधार पर महिलाओं में एनीमिया होने का असर अन्य स्वास्थ्यगत् समस्यायें प्रसव के दौरान मृत्यु, कुपोषण, मानसिक और शारीरिक स्वास्थ्य की स्थिति में गिरावट महत्वपूर्ण है। महिलाओं में बॉडी मास इंडेक्स के हिसाब से या तो वे अत्यंत दुबली हैं या अत्यधिक वजन वाली हैं। इसी तरह अनेक महिलाएँ सामान्य कद से ऊँचाई में कम हैं। नयी तरह की बीमारियाँ–पीसीओडी, पीसीओएस, इन्फर्टिलिटी इत्यादि के केस भी दुमका जिले की महिलाओं में पनप रही हैं।

यूँ तो शरीर में कब और कौन सा रोग लग जाए–कहना कठिन है, फिर भी कुछ बीमारियाँ ऐसी

हैं जो महिलाओं को आम तौर पर पीड़ित करती हैं, किंतु वे कुछ तो पारंपरिक सामाजिक व्यवस्था और कुछ स्वाभाविक शर्म व घबराहट के कारण किसी से कहती नहीं बल्कि अपने भीतर दर्द सहती रहती है और घुटती रहती है।[6] दुमका जिले की महिलाओं का अध्ययन करने तथा साक्षात्कार के माध्यम से स्पष्ट हुआ कि अनेक ऐसी बीमारियाँ जिनका नाम वे स्वयं नहीं जानती लेकिन वैसी बीमारियों की वे शिकार होती रहती हैं। जैसे— बच्चे को दूध पिलाते वक्त निप्पल का रंग सुर्ख काला पड़ जाना, फूल जाना व छूने पर भयंकर दर्द करना। सफेद पानी का स्राव, पैर की मांसपेशियों का उलट जाना, पैर की नसों में दर्द होना, नाभि का खिसक जाना, गला बैठ जाना, हाथ—पैर कंपकपाना, शरीर झिनझिनाना इत्यादि अनेक ऐसी बीमारियाँ हैं जिनके नाम से नहीं बल्कि लक्षणों के आधार पर ही उनके ईलाज की व्यवस्था की जाती है। इन समस्याओं को महिलाएँ, पुरूषों को भी नहीं बता पाती हैं। इसका मुख्य कारण मात्र इतना है कि इन बीमारियों को बड़ी बीमारी नहीं माना जाता, जबकि सुबह सूर्योदय से पहले और रात के अंधेरे तक खटने वाली महिलाएँ बीमारी के ऐसे लक्षणों से ही अत्यधिक कष्ट झेलती हैं और गाँव की जानकार महिला तथा परंपरागत चिकित्सक जिसे सरल शब्दों में महिला वैद्य भी कहा जा सकता है, से इलाज के लिए तत्पर रहती हैं।

## 2. दुमका जिले के महिला परंपरागत चिकित्सकों का परिचयात्मक अध्ययन :

परंपरागत चिकित्सा विधि एक तरह की वैसी लोकचिकित्सा विधि है जो कई मानव पीढ़ीयों द्वारा विकसित ज्ञान प्रणालियों की तरह होती हैं, जिनके प्रयोग से आधुनिक चिकित्सा प्रणाली के विपरीत अलग तरीके से शारीरिक व मानसिक रोगों की पहचान, रोकथाम, निवारण और इलाज किया जाता है। दुमका जिले के मसलिया, नवाडीह, बाराटांड़, धर्मपुर, चिरिकमारा, टीकापहाड़ी, कुरूमपहाड़ी, मुर्गाथली, जैसे गाँवों में इस चिकित्सा पद्धति को जानने वाले लोग मौजूद हैं। इन गाँवों में ही ऐसी अनेक महिलाएँ भी हैं जो इन परंपरागत चिकित्सा पद्धति में निपुण हैं।

दुमका जिले के महिला परंपरागत चिकित्सक सभी संताल आदिवासी समुदाय से आते हैं। इनकी संपर्क भाषा संताली तथा बंगला है। इनमें से कुछेक हिंदी भी समझ लेती हैं तथा बातचीत कर लेती हैं। जिन्हें हिंदी नहीं आती वे हिंदी भाषी रोगियों के साथ अपने घर के वैसे सदस्य के जरिये संपर्क स्थापित करती हैं जिन्हें हिंदी आती है। इन महिलाओं की उम्र तीस से ऊपर तथा साठ के लगभग पायी गयी। इस प्रश्न पर कि इन्हें इस पारंपरिक चिकित्सा का ज्ञान कैसे प्राप्त हुआ ? इनमें से कुछेक ने अपने पिता, पति तथा माता एवं सास का नाम लिया जबकि कुरूमपहाड़ी में निवासरत् मुखी मरांडी के अनुसार उन्हें रात में स्वप्न आया और सपने में उन्हें अपने एक पड़ोसी की बीमारी का दवा पता चला । जब सुबह उन्होंने उस जड़ी से रोगी का इलाज किया तो वह ठीक हो गयी। सफेद धात से परेशान अनिता मरांडी नामक महिला रोगी अनेक वर्षों से परेशान थी और उसने अनेक जगहों पर इसका इलाज कराया था और इस रोग के कलकता के स्पेशलिस्ट को दिखाने के लिए अपनी दुधारू गाय तक बेच दी थी। एलोपैथी दवा खाने पर दो महीने के लिए उन्हें आराम मिला लेकिन फिर बीमारी धीरे—धीरे बढ़ती ही चली गई। इस बीमारी से अनेक वर्षों से पीड़ित महिला को वजन घटना, सिर चकराना, कमजोरी, जी मिचलाना, उल्टी होना जैसे लक्षण के साथ पूरे शरीर में ऐंठन के साथ दर्द रहता था। इसकी जानकारी उन्होंने अपनी पड़ोसन मुखी मरांडी को दिया था। रात में स्वप्न आने तथा इलाज करने की सहमति मिलने पर इलाज करने के बाद महीने में सात—सात दिन का तीन बार खुराक खिलाने पर ही उनका यह रोग जड़ से मिट गया और वह पूर्ण रूपेण स्वस्थ हो गई। धीरे—धीरे मुखी मरांडी को अन्य बीमारियों का इलाज भी स्वप्न के माध्यम से प्राप्त हुआ और लगातार 25 वर्षों से वे लोगों का सफल इलाज कर रही हैं। अर्थात् इन परंपरागत चिकित्सकों की चिकित्सा पद्धति पूरी तरह दैवीय शक्तियों के विश्वास, धार्मिक अनुष्ठान, जड़ी—बूटियों तथा आहार—पथ्य पर निर्भर करता है।

## 3. महिला सशक्तिकरण के संदर्भ में महिला परंपरागत चिकित्सकों की वर्तमान स्थिति :

दुमका जिले की ऐसी सभी महिला परंपरागत चिकित्सक जिस संताल आदिवासी समुदाय से आती हैं वहाँ इन्हें स्त्री—पुरूष समता का अधिकार प्राप्त है। हांलाकि, पारंपरिक मान्यताओं पर अपनी पूर्ण आस्था रखने वाली इन महिलाओं का समाज नारी प्रधान है लेकिन समाज की अन्य महिलाओं की तरह दैवीय शक्तियों से लिप्त इन महिला चिकित्सकों को भी इनके पूजा स्थल 'मांझीथान' और 'जाहेरथान' में पूजा करने तथा इसका प्रसाद खाने की अनुमति प्राप्त नहीं हैं। इनके देवता 'मरांग बुरू' तथा देवी 'जाहेर एरा' के दैविय शक्ति पर आस्था से यदि चिकित्सा के वक्त किसी के द्वारा मन्नत रखी जाती है तो मन्नत पूर्ण होने पर यह पूजा घर के पुरूषों द्वारा ही संपन्न किया जाता है। वर्तमान समय में इन स्थानों पर अपनी आस्था प्रकट कर पाने की इच्छा से पढ़ी—लिखी संथाली महिलाओं ने आवाज उठानी शुरू कर दी है। संभव है वह दिन भी अवश्य आएगा

जब उनके आस्था का पूर्ण प्राकाट्य वे अपने पूजास्थलों में कर सकेंगी।

इनके समाज में महिलाओं को प्रताड़ित करने जैसे दहेज प्रथा अथवा अन्य कुरीतियाँ नहीं हैं। यही कारण है कि अपनी पारंपरिक कलाओं तथा ज्ञान को हस्तांतरित करने तथा पाने की ये भी अधिकारीणी मानी गई हैं। साथ ही इन चिकित्सकों की कोई फिक्स फिस नहीं होती, इलाज कराने वाला अपनी मरजी से जो दे दे ये कुछ नहीं बोलती हैं। इन्हें एक मरीज के इलाज के लिए सारा काम छोड़कर पहाड़ से जड़ी–बूटी लानी पड़ती है। जड़ी–बूटी लाने और इलाज में इनका पूरा दिन निकल जाता है। और ऐसे में, कम रकम और ज्यादा परिश्रम के कारण ये अपनी बेशकीमती ज्ञान से अपनी बहू–बेटियों को महरूम रखती हैं। कुछ औषधियों का प्रभाव मंत्रों के द्वारा सिद्ध किया जाता है, लेकिन ये मंत्र मानसिक जाप हैं, इनका कोई लिखित रिकॉर्ड नहीं है।

भले ही इन्हें कम रकम प्राप्त होती हो लेकिन ऐसी महिला चिकित्सकों से प्रायः महिला संबंधी अनेक बीमारियों का इलाज कराने के लिए कलकता, बिहार, बंगाल तथा झारखंड के अन्य सुदूरवर्ती इलाकों से लोग आते हैं। इन्हें परिवार में भी उतनी ही इज्जत दी जाती है जितनी की इन्हें बाहर के लोगों से मिलती है, जो अपना बीमारी ठीक कराने आते हैं।

## निष्कर्ष–

महिला चिकित्सकों के द्वारा पारंपरिक लोक ज्ञान लोक चिकित्सा का संरक्षण व उन्हें बढ़ावा देना सचमुच प्रशंसनीय है, परंतु इसका संरक्षण व इसे अत्यधिक जनोपयोगी बनाना और अन्य महिलाओं को सिखाना दुष्कर प्रतीत हो रहा है। इसका कारण यह है कि वर्तमान परिदृश्य के लोलुपवादी विचारधारा में ये संताल समुदाय आज भी प्रकृति के सरक्षण में स्वयं को ज्यादा सुरक्षित महसूस करते हैं और अपने ज्ञान को किसी अन्य के साथ न बांटकर अपने समुदाय अथवा परिवार तक ही संरक्षित करना अपना धर्म समझते हैं। इसलिए आज के परिदृश्य में एक पारंपरिक लोकचिकित्सक माँ द्वारा न तो अपनी बहु पर विश्वास के साथ ज्ञान को बांटा जा रहा है और ना ही दूसरे घर जाने वाली बेटी को वह ज्ञान सिखाया जा रहा है, बल्कि अपने उस बेटे को सिखाया जा रहा जो उनका सबसे भरोसेमंद हो। अतः महिला सशक्तिकरण के संदर्भ में महिला परंपरागत चिकित्सकों की वर्तमान स्थिति में यह एक महत्वपूर्ण चुनौती है कि एक महिला के द्वारा एक अन्य महिला को भी वही ज्ञान कैसे प्राप्त हो जिसे उसने अपनी मेहनत से अर्जित किया है।

## सुझाव–

महिला सशक्तिकरण के दौर में ये महिलाएँ अपने ज्ञान से किसी से भी कम नहीं है, और ना ही सुदूर गाँवों और पहाड़ों में इनका रहना इनके पिछड़ेपन का द्योतक माना जा सकता है।

जरूरत मात्र इतना है कि महिलाओं को सशक्तिकरण की ओर अग्रसर होने हेतु इस ज्ञान को प्राप्त करने के लिए पारिवारिक या वंशवाद के बाहर भी लिखित और संरक्षण के अन्य रूपों में काम करने की नितांत आवश्यकता है।

## संदर्भ


1. सोनाकर, बी.एल. (2014). महिलाओं की स्वास्थ्य स्थिति का एक संबंधित अध्ययन, इंटरनेशनल जर्नल ऑफ रिव्यूज एंड रिसर्च इन सोशल साइंसेज 2 (2), 124–127,
2. देवे, हरीश कुमार., यादव, ऋचा. (2020). ग्रामीण स्वास्थ्य सेवाओं में मितानिन की भूमिका का अध्ययन. इंटरनेशनल जर्नल ऑफ रिव्यूज एंड रिसर्च इन सोशल साइंसेज 8 (3). 197–208.
3. विकासपीडिया–2020.
4. दुमका : झारखंड की उपराजधानी . https: //hi.m.wikipedia.org.wiki
5. दुमका झारखंड https://www.districtsinindia.com posted on June 23, 2016 by Districts in India
6. गुप्ता, प्रवीण जे. (2016). महिलाओं की स्वास्थ्य समस्याएँ. विश्व बुक्स प्राइवेट लिमिटेड : नई दिल्ली.

# भारतातील स्त्रियांची वर्तमान स्थिती, स्त्रियांचे प्रश्न आणि कायद्याची भूमिका

डॉ. संजय बबनराव चौधरी
सहायक प्राध्यापक तथा समाजशास्त्र विभाग प्रमुख, सावित्रीबाई फुले महिला महाविद्यालय, वाशिम.
choudharisanjay03@gmail.com

**प्रस्तावना :-**

स्त्री ही जगाची निर्माती आहे. प्रत्येक देशाच्या उभारणीमध्ये पुरूषांइतकाच स्त्रीचा वाटा महत्त्वाचा आहे. इतिहासाकडे बघितले असता अनेक कर्तुत्वान स्त्रियांचे दाखले आपल्याला सापडतील. भारतीय स्त्री ही प्राचीन काळापासून दुय्यम स्थानी होती. हा समज रूढ आहे, वास्तविक पाहता इतिहासातील एक कालखंड निश्चितच स्त्रियांना मानाचे स्थान देणारा होता, तो म्हणजे आदिवासी समुदायामधला मातृसत्ताक कालखंड होय. मानवी अपत्य निर्मितीमधील प्राथमिक टप्प्यावर स्त्रियांची भूमिका महत्त्वपूर्ण होती. कारण अपत्य निर्मितीमधील पुरूषाचा सहभाग पुरूषाला माहित नव्हता. नवनिर्मितीची क्षमता फक्त पृथ्वी आणि स्त्री यांच्यातच आहे, अशी पुरूषांची भावना होती. त्यामुळेच या कालखंडातील देवता स्त्री प्रतिमेद्वारे चित्रीत करण्यात आलेल्या दिसतात. मात्र काळाच्या ओघात नांगराच्या शेतीच्या उदयानंतर तसेच अपत्य निर्मितीमधील पुरूषाचे स्थान स्पष्ट झाल्यानंतर स्त्रियांचे स्थान गौण ठरविण्यात आले. त्यानंतर वेगवेगळया कालखंडात स्त्रियांच्या शोषणाचे अनेक पुरावे सापडतात. एकोणिसाव्या शतकापर्यंत स्त्रियांचा दर्जा प्रचंड खालावलेला होता. भारतात स्त्रीयांच्या बाबतीत पुर्वीपासून दुय्यमतेची वर्तणूक ठेवण्यात आली आहे.

आपल्या देशात सुधारकांचीही एक महान परंपरा निर्माण झाली, आगरकर, फुले, रानडे, कर्वे, आंबेडकर यांनी स्त्री सक्षमीकरनासाठी मोलाची भुमीका बजावली. पुरुषांच्या बरोबरीने स्त्रीला समान दर्जा मिळाला पाहीजे असा आग्रह गोपाळ गणेश आगरकरांनी धरला. तसेच ज्योतीबा फुल्यांसारखे महान समाज सुधारक आपल्या आचार विचार उच्चाराने स्त्रीमुक्तीचे आद्य प्रवर्तक ठरले. त्यांनी आपल्या पत्नीला सावित्रिबाईंना आधी शिक्षीत केले व मग स्त्री शिक्षणाचा पाया रोवला. तर डॉ. बाबासाहेबांनी महात्मा फुल्यांना आपले गुरु मानून स्त्रीमुक्तीचा विचार आपल्या जीवात अखेरचा श्वास असेपर्यंत या देशातील तमाम स्त्रियांचे जीवन सुखमय व्हावे यासाठी लढा दिला. मात्र हे शतक स्त्रियांच्या जीवनात नवी पहाट घेऊन उगवले. स्त्रियांची स्थिती बदलणारी परिस्थिती निर्माण झाली व स्त्री सक्षमीकरणासाठी विविध कायद्यांची निर्मिती करण्यात आली आहे, ज्यामुळे आजची स्त्री सक्षम झाली आहे.

**पार्श्वभूमी :-**

अमेरिकेमध्ये १९व्या शतकात Women's studies ची सुरूवात झाली. १९७५ नंतर या अध्ययनाला जोरदार चालना मिळाली. जगभरातील स्त्रिया या नात्याने जवळ आल्या व त्यातूनच अनेक देशात स्त्री चळवळी उदयास आल्या. भारतामध्ये देखिल स्त्रियांच्या उध्दारासाठी अनेक समाजसुधारकांनी पुढाकार घेतला. भारतामध्ये स्त्रियांच्या विविध समस्या होत्या. ज्यामध्ये कुटुंबातील निम्न दर्जा, जातीव्यवस्थेची बंधने, सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह बंदी, स्त्रीभृण हत्या, केशवपण, हिंसाचार, शोषण, हुंड्यासाठी मारणे इत्यादी विविध समस्यांच्या जाळयात भारतीय स्त्री गुरफटलेली होती. चुल आणि मूल हेच स्त्रीचे कार्यक्षेत्र होते. स्त्री म्हणजे एक भोगवस्तू हा सामाजिक दृष्टीकोन रूढ झाला होता. पुरूषप्रधान संस्कृतीने स्त्रीला पूर्णतः परावलंबी बनवले होते. लहानपणी वडीलांच्या, लग्न झाल्यावर पतीच्या तर वृध्दापकाळात स्त्रीने मुलाच्या आधारे जीवन व्यतीत करावे ही मानसिकता समाजामध्ये दिसून येत होती. त्याचप्रमाणे व्रतवैकल्ये, नवस, पोषाख, अलंकार, सौंदर्य प्रसाधने यासर्वांनी स्त्रीला बंदिस्त करण्यात आले होते.

भारताच्या इतिहासाच्या कुठल्याही वळणावर नजर टाकली असता आपल्याला

सामर्थ्यवान, धैर्यशिल व बुध्दीमान स्त्रियांची उदाहरणे दिसतात. उदा. वैदिक काळात द्रोपदी, सीता, गार्गी, मैत्रयी, लीलावती मध्ययुगातील संत मीरा, जनाबाई, महदंबा, झुंझार लढवय्या व कुशल राज्यकर्त्या अहिल्याबाई होळकर, राणी लक्ष्मीबाई, सावित्रीबाई इ. परंतू तरीदेखील प्रत्येक काळात स्त्रियांना निम्न वागणूक देण्यात आली आहे. त्यामुळे स्त्रियांचे अनेक प्रश्न सामाजिक समस्यांच्या स्वरुपात जन्माला आले आहेत. सतीप्रथा, विधवा विवाह बंदी, बालविवाह, केशवपन, स्त्रीभृणहत्या, बलात्कार, छेडछाड, विनयभंग, हुंडाबळी, कौटूंबिक हिंसाचार, शारीरीक, मानसिक पिळवणूक यासारख्या समस्या निर्माण झाल्या आहेत. म्हणूनच स्त्रियांवर होणाऱ्या, अन्याय, अत्याचाराला आळा घालण्यासाठी कायद्याची भुमिका महत्वाची असल्याचे दिसून येते.

**संशोधन विषयाचे महत्त्व :-**

प्रस्तुत अध्ययनामध्ये आधुनिक काळातील महिलांच्या बदलत्या दर्जाचे अध्ययन करताना स्त्रियांचा कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, व शैक्षणिक दर्जा कशा पद्धतीने परिवर्तित झाला आहे, यावर विशेष भर देण्यात आला आहे. आधुनिकीकरणाच्या प्रवाहात स्त्री जीवनामध्ये अनेक बदल घडून आले आहेत त्यामधील काही सकारात्मक तर काही नकारात्मक बदल आहेत. या बदलांमध्ये आजच्या समाजातील स्त्रियांचा दर्जा परिवर्तित झाल्याचे दिसून येते, सदर संशोधनाच्या माध्यमातून सदर स्त्रियांचे प्रश्न, स्त्रियांसाठीचे कायदे व आजच्या काळातील स्त्रियांच्या स्थिती अभ्यासण्याचा प्रयत्न केला आहे

**संशोधनाची उद्दीष्टे :-**

भारतातील स्त्रियांच्या समस्यांचे अध्ययन करणे.
वर्तमान काळात स्त्रियांच्या परिस्थितीचे अध्ययन करणे

३. भारतीय संविधानातील स्त्रियांसाठी करण्यात आलेल्या तरतुदी अभ्यासणे. .

४. स्त्री सक्षमीकरणासाठी कायद्याची भूमिका लक्षात घेणे.

**भारतीय स्त्रीचा समाजातील दर्जा :-**

एखाद्या देशातील स्त्रीचा दर्जा बघून त्या देशाचा दर्जा लक्षात येतो. पूर्व प्रधानमंत्री पंडीत नेहरु म्हणाले होते 'आई सर्वात जास्त आपल्या मुलांवर प्रेम करते. ती कितीही गरीब, शोषीत, पिडीत, कमजोर असली तरी ती आपल्या मुलांवर अपरंपार प्रेम करते. भारतीय स्त्री जी पर्यावरणासाठी लढते ती पीडीत व्यक्तीसारखी बोलत नाही तर ती स्वातंत्र्य व तिच्या परिस्थितीच्या बदलाबाबत बोलते. ती पितृसत्ताक कुटूंबपध्दतीमुळे खुंटलेल्या विकासाबाबत बोलते. परमिता शास्त्रीने १९९८ मध्ये आऊटलुकच्या एक्झीक्युटीव्ह समरी मध्ये म्हटले आहे, 'भारतात कित्येक वर्षापासून भूक आणि गरीबीची समस्या दृढतेने वसली आहे. ज्यामुळे साऱ्या जगात स्त्रीचे दमन होत आहे. भारतात स्त्रियांच्या बाबतीत पुर्वीपासून दुय्यमतेची वर्तणूक ठेवण्यात आली आहे. स्त्री कुटूंब चालविण्यासाठी दिवसरात्र मेहनत करते परंतू स्वतः मात्र अन्याय, अत्याचार सहन करते. स्त्रियांच्या बाबतीत खालील अन्याय केले जातात.

**कुपोषण :-** संपूर्ण जगात भारतच एक असा देश आहे ज्यात सर्वात जास्त कुपोषित मुले आढळतात. याचे कारण स्त्रियांना गर्भावस्थेत योग्य प्रमाणात पौष्टीक आहार मिळत नाही, त्यामुळे ती कुपोषीत बालकांना जन्म देते.

**खालावलेले आरोग्य :-** स्त्रियांना आरोग्याच्या सुविधा पुरुषांच्या तुलनेत कमी व येत नाही. स्वतःहून ती डॉक्टरकडे जावू शकत नाही. त्यामुळे देशात स्त्रीयांच्या आरोग्यविषयक समस्या आढळतात.

**शिक्षणाचा अभाव :-** पुर्वीपासून स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. त्यामुळे अशिक्षीतपणामुळे अनेक वेळा स्त्रीयांचे शोषण केले जाते. शिकून तीला नवऱ्याच्याच घरी जायचे आहे त्यामुळे तिचे शिक्षण आपल्या उपयोगाचे नाही असाही विचार केला जातो.

**कामाचे ओझे :-** स्त्री ही पुरुषापेक्षा जास्त तास काम करते. परंतू तिचे कामाचे मुल्यांकन मात्र होत नाही. घरात स्वयंपाक, कपडे धुणे, भांडी घासणे, स्वच्छता करणे, मुलांची, पतीची सेवा करणे इ. कामे रोज करावीच लागतात.

**दुर्व्यवहार :-** स्त्रियांवर होणारे अत्याचार दिवसेंदिवस वाढतच आहेत. ज्यात बलात्कार, मोठ्या प्रमाणात घडत आहेत. ज्यामुळे सामाजिक दर्जा घसरतो.

**भुक :-** भारतात दररोज हजारो स्त्रीया व मुले भुकेचे बळी ठरतात. परंपरागत स्त्री कुटुंबाची भुक भागविण्यासाठी स्वतः मात्र भुकेला बळी पडते. हे चक्र सातत्याने सुरु आहे.

**शक्तिहिनता :-** भारतीय संविधानाने स्त्री पुरुषांना समान अधिकार प्रदान केले आहेत. पण कायद्याच्या संरक्षणाचे परंपरागत पितृसत्ताक कुटुंब पध्दतीवर काहीच परिणाम होत नाही. स्त्रीयांना समाजव्यवस्थेने शक्तिहिन बनवले आहे.

**घटस्फोट :-** भारतात विवाह एक पवित्र संस्कार मानला जातो. पती-पत्नी यांना समाजमान्य पध्दतीने विवाहसंबंध समाप्त करण्यासाठी घटस्फोट या संज्ञेचा वापर केला जातो. १९५५ च्या हिंदू विवाह कायद्यात घटस्फोटाच्या तरतुदी नमूद केल्या आहेत. घटस्फोटामुळे स्त्रीयांना अनेक समस्यांना सामोर जावे लागते

थोडक्यात भारतीय स्त्रीच्या सामाजीक दर्जाचा विचार केला असता तो पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये निम्न ठरविण्यात आला आहे. स्त्री-पुरुषांमध्ये मोठ्या प्रमाणात विषमता असून त्यामधून स्त्रीयांचे शोषणच होतांना दिसते व त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते.

**स्त्रियांच्या समस्यांचे विवेचन :-**

एकोणिसाव्या शतकात स्त्री विषयक अध्ययनाची गरज अभ्यासकांना वाटू लागली. भारताच्या इतिहासात प्रथम प्रयत्न झाला तो, महंमद तुघलकाकडून, परंतु त्याच्या प्रयत्नांमुळे त्याला ढोंगी शास्त्री पंडितांनी वेडा ठरविले. त्यानंतर ब्रिटीशांनी काही सुधारणा घडवून आणल्या. तसेच आगरकर, रानडे, राजाराम मोहनरॉय, महर्षी कर्वे, महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्त्री विषयक सुधारणांचा पुरस्कार केला. सतीप्रथा, बालविवाह, विधवा पुनर्विवाह, घटस्फोट यासारख्या स्त्रियांच्या समस्यांना वाचा फोडण्याचे काम या समाजसुधारकांनी केले. त्यांच्या कार्याचा आढावा घेण्यासाठी स्त्रियांच्या समस्यांचे अध्ययन करणे आवश्यक ठरते.

**१. आदिवासी स्त्रियांच्या समस्या :-**

आदिवासी स्त्री अशिक्षित असली तरी ती धर्मभोळी, अंधश्रध्दा, रुढी, परंपरा आदींना चिकटलेली नाही. ती इतर स्त्रियांपेक्षा मुक्त आहे. मातृसत्ताक कुटुंबामध्ये स्त्री ही पुरूषांपेक्षा श्रेष्ठ आहे. तसेच मुलीला हुंडा देण्याची गरज नाही, तर उलट मुलगाच हुंडा देतो असे असले तरी आदिवासी स्त्रियांमध्ये देखिल अनेक समस्या जाणवल्या, ज्यामध्ये त्यांच्या सामाजिक, सांस्कृतिक, आरोग्यविषयक समस्यांचा समावेश आहे.

**२. दलित ग्रामीण स्त्रियांच्या समस्या :-**

ग्रामीण स्त्री हे जातीव्यवस्थेच्या बंधनात बांधल्या गेलेली आहे. जातीव्यवस्थेने निर्माण केलेली अस्पृश्यता ही आपल्या समाजाला लागलेली किड आहे. यामध्ये मुले, स्त्रिया हे सर्वच घटक भरडले जातात. दारिद्र्य, अज्ञान, जातिव्यवस्था सामाजिक रूढींचा पगडा या सर्वांमुळे दलित स्त्रियांना विविध समस्यांना सामोरे जावे लागते. सफाई कामगार, रोजगार, मजूर, तंबाखु, विड्या कामगार स्त्रियांचे आर्थिक व शारीरिक शोषण केले जाते. बऱ्याचदा त्यांना अनेक अधिकारांपासून वंचित ठेवण्यात येते.

**३. शहरी स्त्रियांच्या समस्या :-**

आदिवासी व ग्रामीण समुदायाच्या तुलनेत नागरी समुदायांमध्ये स्त्रियांचे प्रश्न अधिक गंभीर आहेत. बलात्कार, विनयभंग, वेश्याव्यवसाय कौटुंबिक व कुटुंबाबाहेरील हिंसाचार, कामाच्या ठिकाणी लैंगिक शोषण यासारख्या अनेक प्रसंगांना स्त्रियांना सामोरे जावे लागते. तसेच नव्या विचारांच्या पिढीमध्ये स्त्रियांच्या अश्लिलतेचे चित्रण अधिक प्रमाणात समाजात दिसून येते.

**भारतीय स्त्रियांची वर्तमान स्थिती :-**

आज समाज बदलतो आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, औद्योगिकीकरण, खासगीकरण, पाश्चिमात्यकरण, इत्यादी मधून महिलांसाठी अनेक प्रकारच्या संधी, नवनवीन क्षेत्रे निर्माण होत आहेत. स्त्री आज सामाजिक, राजकीय, आर्थिक, शैक्षणिक अशा सर्वच क्षेत्रामध्ये

पुरूषांच्या बरोबरीने काम करते आहे. त्यासाठी स्त्रियांना सुरक्षित घर सोडून रात्री-अपरात्री कामाच्या ठिकाणी जावे लागते. कामाच्या ठिकाणी सुरक्षीत वातावरण असलेच असे नाही पुरूषप्रधान संस्कृतीचा प्रभाव जागोजागी स्त्रियांना कमी लेखण्याचा प्रयत्न करतो. एकीकडे देवी म्हणून तिची पुजा करायची तर, दुसरीकडे तिच्यावर अन्याय, अत्याचार करून मुस्कटदाबीही करायची हीच पुरूष मानसिकता आहे. भारतीय समाजात अनेक समाज सुधारकांनी स्त्रियांच्या प्रश्नांना वाचा फोडण्याचे प्रयत्न केले. तरी समाजाची मानसिकता पाहिजे त्या प्रमाणात बदलेली दिसत नाही. परंतु तरी देखील आजच्या काळात स्त्रिया प्रत्येक क्षेत्रात यशस्वी सहभाग घेत आहेत. उदा. संरक्षण दल, विमानसेवा, रेल्वे सेवा, पोलीस दल, गिर्यारोहन, संशोधन, अवकाश यात्रा यासारख्या अनेक पुरूषी क्षेत्र म्हणून मानल्या जाणाऱ्या क्षेत्रात स्त्रियां काम करीत आहेत.

आज २१ व्या शतकात विज्ञान तंत्रज्ञान, माहिती तंत्रज्ञान, उद्योग, व्यवसाय, आर्थिक व्यवस्थापन अशा नव्या क्षेत्रात स्त्रिया आत्मविश्वासाने काम करीत आहेत. एकढेच नव्हे तर शिक्षण क्षेत्राचा विचार केला तर दरवर्षी १० वी १२ वीच्या निकालात गुणवत्तेमध्ये मुलांपेक्षा मुलीचे प्रमाण जास्त दिसते. राजकीय क्षेत्राचा विचार केला तर, राजकारणात कर्तुत्वान स्त्रियांची मोठी यादी आज आपणासमोर मांडता येईल. उदा. प्रतिभाताई पाटील, सोनिया गांधी, जयललीता, सुषमा स्वराज, स्मृती इराणी, ह्यांनी आपल्या कर्तुत्वाने स्त्री गौरव वाढविला आहे. तसेच आय.ए.एस. किंवा त्यासारख्या शासकीय सेवेत स्त्रिया अधिकारपदाच्या जबाबदाऱ्या मोठ्या संख्येने पार पाडताना दिसतात. मनीषा म्हैसकर, किरण बेदी, मीरा बोरवणकर, स्वाती साठे, निला सत्यनारायण अशा कर्तुत्वान नावांना जागा पुरणार नाही. आज स्त्री अध्ययनाचे अनेक प्रयत्न सर्वच स्तरातून होत आहेत ही उल्लेखनिय बाब आहे. वेगवेगळया चर्चासत्र, परिसंवाद, स्त्रीवादावर मंथन करीत आहेत. तसेच साहित्य क्षेत्रामध्ये स्त्री संरक्षण किंवा स्त्री सुधारणा यासारख्या मुद्यांवर लेखन होताना दिसते. ही स्त्री स्वातंत्र्याची नांदिच म्हणावी लागेल.

**भारतीय स्त्रियांसाठीचे कायदे :-**

स्वातंत्र्य, समता व बंधूता यावर आधारीत भारतीय राज्यघटना स्त्रियांच्या हक्कासाठी महत्त्वाची ठरली. भारतीय संविधानामध्ये स्त्रियांच्या संरक्षणासाठी अनेक तरतुदी केल्या आहेत. तसेच विविध कायद्यांची निर्मिती सुध्दा करण्यात आली आहे.

**१. हिंदू विवाह कायदा :-**

सन १९५५ चा हिंदू विवाह कायदा स्त्रियांच्या वैवाहिक दर्जात परिवर्तन घडवून आणणारा ठरला. हिंदू, बौध्द, जैन, शिख, लिंगायत, ब्राम्होसमाज, प्रार्थना समाज, आर्यसमाज अशा सर्वच धर्मातील स्त्रियांना या कायद्याचा लाभ झाला. या कायद्याअंतर्गत प्रथम पत्नीशी कायदेशिररित्या घटस्फोट घेतल्याशिवाय पुरूषाने दुसरा विवाह करणे बेकायदेशीर मानले गेले. त्यामुळे स्त्रियांचा कौटुंबिक दर्जा सुधारण्यात मदत झाली.

**३) वारसा हक्क कायदा :-**

आर्थिक स्वावलंबन हे स्त्रियांच्या सक्षमीकरणासाठी आवश्यक बाब आहे. १९५६ च्या वारसाहक्क कायद्याने मात्र पत्नी, कन्या, माता अशा नात्याने तिला वारसा हक्क प्रदान करण्यात आला. स्त्रीला संपत्तीत वाटा मिळाल्यामुळे तिचा आर्थिक दर्जा सुधारण्यास मदत झाली. या कायद्या प्रमाणेच १९५६ मध्ये दत्तक कायदा व पोटगीचा कायदा अशा कायद्यांच्या माध्यमातून स्त्री स्वातंत्र्याची सुरूवात झाल्याचे दिसते.

**४) गर्भपात कायदा :-**

१ एप्रिल १९७२ पासून झालेल्या गर्भपाताच्या कायद्यानुसार विशिष्ट परिस्थितीत गर्भपात घेण्याचा अधिकार प्राप्त झाला. या कायद्यामुळे स्त्रियांवर जबरदस्ती मातृत्व लागदण्याचे प्रमाण कमी होण्यास मदत झाली.

**५. हुंडा प्रतिबंधक कायदा :-**

हुंड्यासाठी सामाजिक कुप्रथेला आळा घालण्यासाठी हा कायदा पास करण्यात आला. कायद्याने हुंडा देणे आणि घेणे दोन्ही गुन्हा मानण्यात आले आहे. परंतु या कायद्याची अयशस्वीता म्हणजे आज सर्वत्र सुरू असलेली हुंड्याचे चलन होय.

**६. सतीबंदी कायदा :-**

१६ डिसेंबर १९८७ रोजी सतीप्रथा निवारण कायदा सरकारने संमत केला. त्यानुसार सती जाण्यास भाग पाडणे, प्रोत्साहन देणे, जबरदस्ती करणे, सतीचे गौरवीकरण करणे, सतीचे स्मारक तयार करणे अशा कृती गुन्हा मानून त्यास कठोर शिक्षेची तरतूद करण्यात आली आहे.

**७. कौटुंबिक हिंसाचार कायदा :-**

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षक करण्यासाठी २६ ऑक्टोंबर २००६ पासून या कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाली. या कायद्यामुळे स्त्रीला पत्नी, विधवा, बहिण, माता, भावजय, मुलगी, मैत्रीण, सहकारी अशा विविध रूपात संरक्षण प्राप्त झालो या कायद्याने प्रत्येक महिलेस शारीरिक, मानसिक, भावनिक, आर्थिक व सामाजिक अशा सर्वच दृष्टीने कुटुंबातच संरक्षण प्राप्त झाले. याशिवाय महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे निर्माण करण्यात आली आहे.

**समारोप :**

आज एकविसाव्या शतकात भारतातील स्त्रियांच्या स्थितीमध्ये आमुलाग्र परिवर्तन झाल्याचे दिसून येते. हे परिवर्तन सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही दिशांनी झाल्याचे आढळते. स्त्री स्वातंत्र्याचा विचार आणि स्त्री पुरुष समानतेचे तत्व समाजात रुजतांना दिसत आहे. तर दुसरीकडे बलात्कार, स्त्रीहिंसाचार, हुंडाबळी, घटस्फोट इत्यादीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच आहे. आज स्त्रियांचा शिक्षणात व रोजगार क्षेत्रात सहभाग वाढतांना दिसत आहे. परंतू त्याचबरोबरीने कुटूंबाच्या बाहेर घडणाऱ्या हिंसाचाराचे स्वरुप भिषण होत आहे. स्त्रीवर होणाऱ्या बलात्कार, अत्याचार, अवहेलना, अपमान या साऱ्यांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. ते संपूर्णपणे निर्मूलन होईल, थांबेल अशी आशा बाळगणे भाबडेपणाचे ठरेल. शासनातर्फे वेळोवेळी होणारे प्रतिबंधक कायदे, पुरुषांचे सातत्याने प्रबोधन, प्रसारमाध्यमांचा दबाव व वातावरणनिर्मिती ह्या सर्वांचा सामुहीक परिणाम म्हणजे त्या प्रमाणात होणारी घट ह्या सर्व अत्याचारापासून मुक्त असा समाज निर्माण करणे हे अंतिम ध्येय आहे. त्यासाठी समता, स्वातंत्र्य आणि बंधूतेची मुल्ये रुजविणे आवश्यक आहे. फुले आंबेडकर आणि स्त्रीमुक्ती चळवळीचा विचार करताना आजची स्त्री खरेच मुक्त आहे का ? तिला सामाजिक आर्थिक व राजकिय स्वातंत्र्य मिळाले असेल किंवा ज्ञानाच्या अनेक क्षेत्रांमध्ये ती आत्मविश्वासाने वावरत असली तरी परंपरागत मुल्यांच्या व संस्काराच्या दडपणाखाली ती जगते आहे हे नाकारुन चालत नाही. स्त्रीमुक्ती म्हणजे मानवमुक्ती. स्त्रियांचा विकास झाल्याशिवाय मानवी समाजाचा विकास होवू शकत नाही. त्यासाठी स्त्रियांना पुरुषाइतकाच प्रत्येक क्षेत्रात समतेचा, स्वातंत्र्याचा आणि बंधूतेचा न्याय मिळणे आवश्यक आहे.

**संदर्भ :-**


1. सिमोन द बोव्हुआर, द सेकंट सेक्स, (अनुवाद, करूणा गोखाले),पद्मगंधा प्रकाशन,पुणे, २०१०
2. सोवनी सौ. सुनिता, हिंदुत्वाच्या प्रकाशात, स्त्री चिंतन भारतीय विचार साधना,पुणे, प्रकाशन २००७
3. रानडे प्रतिभा, स्त्री प्रश्नांची चर्चा एकोणिसावे शतक, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २००५
4. कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे संरक्षण, अधिनियम २००५-०६, शिवांस प्रकाशन,
5. स्त्री अभ्यासाच्या दिशा, डॉ.सुनंदा अहिरे, डॉ. उषा साळुके, अर्थव पब्लीकेशन, धुळे, २०१२
6. डॉ.वैध सुमन,डॉ. कोठकर, शांता, आधुनिक भारताचा इतिहास,श्री साईनाथ प्रकाशन,नागपूर, २००४
7. बोर्ड प्रा. सुनिता, खडसे प्रा.सतोष, ऐतिहासिक परिप्रेक्षातील स्त्रिया, शुभम पब्लीकेशन, २०१०

# भारतातील महिला सक्षमीकरणाच्या समस्या आणि आव्हाने यावर एक चिकित्सक अभ्यास

**प्रा. डॉ. एस.डी. राठोड**
असोसिएट प्रोफेसर अर ए एमहाविद्यालय, वाशिम

**गोषवारा**

*हा पेपर भारतातील महिला सक्षमीकरणाच्या स्थितीचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न करतो आणि महिला सक्षमीकरणाच्या समस्या आणि आव्हानावर प्रकाश टाकतो, वास्तविकता आम्ही आमच्या दैनंदिन जीवनात पाहतो की स्त्री विविध सामाजिक दृष् कृत्या त्यामुळे कशा बळी पडतात. महिला सक्षमीकरण हे महिलांच्या संसाधनाची क्षमता वाढवण्यासाठी आणि धोरणात्मक जीवन निवड करण्यासाठी महत्त्वपूर्ण साधन आहे. समाजातील पारंपारिकपणे वंचित असलेल्या स्त्रियांची सामाजिक आणि राजकीय स्थिती ही सर्व प्रकारच्या हिंसाचारापासून त्याचे संरक्षण करण्याची प्रक्रिया आहे. हा अभ्यास पूर्णपणे दुय्यम स्त्रोतावर आधारित आहे . या अभ्यासातून असे दिसून आले आहे की, भारतातील महिला तुलनेने अशक्त आहेत आणि सरकारने अनेक प्रयत्न करूनही त्यांना पुरुषांच्या तुलनेत काहीसा खालचा दर्जा मिळतो असे आढळून आले आहे की समाजात आजही महिला कडून असमान लिंग नियमाचा स्वीकार होत आहे. शिक्षण रोजगार आणि सामाजिक संरचनेतील बदल हे केवळ महिला सक्षमी करण्यासाठी सक्षम घटक आहेत . असे निरीक्षण करून अभ्यासाचा निष्कर्ष काढला जातो.*

***मुख्य शब्दः*** *महिला सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य, सामाजिक आर्थिक स्थिती , धोरणाचे परिणाम.*

## परिचय

सशक्तिकरण म्हणजे महिलांच्या व्यक्ती आणि समुदायाची अध्यात्मिक,राजकी,सामाजिक ,शैक्षणिक, लिंग किंवा आर्थिक ताकद वाढवणे. भारतातील महिला सशक्तिकरण हे भौगोलिक स्थान (शहरी / ग्रामीण) शैक्षणिक स्थिती, सामाजिक स्थिती आणि वय यांचा समावेश असलेल्या विविध परिवर्तनावर मोठ्या प्रमाणावर अवलंबून आहे. आरोग्य शिक्षण, आर्थिक संधी, लिंग आधारित हिंसा आणि राजकीय सहभागासह अनेक क्षेत्रांमध्ये राष्ट्रीय राज्य आणि स्थानिक स्तरावर महिला सक्षमीकरणाची घोरणे अस्तित्वात आहेत. तथापि धोरणात्मक प्रगती आणि समुदाय स्तरावरील वास्तविक सराव यामध्ये लक्षणीय अंतर आहे.

महिलांचे सक्षमीकरण ही मुलता समाजातील पारंपारिकपणे वंचित असलेल्या महिलांच्या आर्थिक सामाजिक आणि राजकीय स्थितीच्या उन्नतीची प्रक्रिया आहे. सर्व प्रकारच्या हिंसाचारा पासून त्याचे संरक्षण करण्याची ही प्रक्रिया आहे. महिला सक्षमीकरणांमध्ये समाजाची राजकीय वातावरणाची उभारणी समाविष्ट आसते. ज्यामध्ये स्त्रिया अत्याचार, शोषण, भीती, भेदभाव आणि छळांच्या सामान्य भावनांना न घाबरता श्वास घेऊ शकतात, जी पारंपारिकपणे पुरुष वर्चस्व असलेल्या संरचनेत स्त्री आपल्याबरोबरच असते. जगाच्या लोकसंख्येच्या जवळपास 50% महिला आहेत परंतु भारताने असमान लिंग गुणोत्तर दाखवलेले आहे. ज्यामुळे स्त्रियांची लोकसंख्या पुरुषांपेक्षा तुलनेने कमी आहे. जोपर्यंत त्यांच्या सामाजिक स्थितीचा संबंध आहे. त्यांना सर्व ठिकाणी पुरुषाच्या बरोबरीने वागवले जात नाही . पाश्चिमात्य समाजात स्त्रियांना जीवनाच्या सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने अधिकार आणि स्थान मिळाले आहे. परंतु आजही भारतात लैंगिक आणि अपंगत्व आणि भेदभाव आढळतात. विरोधाभाषी परिस्थिती अशी आहे की, ती कधी देवी म्हणून चिंतित होते तर काही वेळा फक्त दासी म्हणून.

## साहित्याची समीक्षा

**सुब्रमण्यम (2011)** यांनी भारतातील वर्तमान आणि भूतकाळातील महिला शिक्षणाची तुलना केली , शाळेमध्ये मुलींच्या एकूण नोंदणीत चांगले प्रगती झाल्याचे लेखकाने अधोरेखित केले. सशक्तिकरण या शब्दाचा अर्थ कायदेशीर शक्ती किंवा कार्य करण्याचा अधिकार देणे, ही महिलांची काही कामे आत्मसात करण्याची प्रक्रिया आहे. **एम भवानी शंकरराव (2011)** यांनी हे अधोरेखित केले आहे की SHG च्या महिला सदस्यांचे आरोग्य नक्कीच चांगले झाले आहे. यावरून स्पष्टपणे दिसून येते की महिला सदस्य इतर सदस्यांच्या आणि त्यांच्या मुलांच्या आरोग्याशी संबंधित समस्याबद्दल आपापसात चर्चा करतात आणि त्यांना खास त्यांच्यासाठी असलेल्या विविध सरकारी तरतुदीची जाणीव करून देतात.

**Duflo E (2011)** महिला सबलीकरण आणि आर्थिक विकास, नॅशनल ब्युरो ऑफ इकॉनोमिक रिसर्च केंब्रिज

या अभ्यासात असा युक्तिवाद करण्यात आला आहे की, सक्षमीकरण आणि विकासाचे आंतरसंबंध स्वयं टिकून राहण्यासाठी कदाचित खूप कमकुवत आहेत आणि ती सतत धोरणात्मक वचनबद्धता स्वतःच्या फायद्यासाठी समानतेने करू शकते, स्त्री पुरुष समानता आणण्यासाठी आवश्यक आहे. **सेतूरामन के.** (2008) दक्षिण भारतातील आदिवासी आणि ग्रामीण समुदायांमध्ये बालकांच्या वाढीमध्ये आणि कमी पोषणामध्ये महिला सक्षमीकरण आणि घरगुती हिंसाचाराची भूमिका हा शोध निबंध महिला सक्षमीकरण आणि घरगुती हिंसाचार, मातृ पोषण, स्थिती, आणि ग्रामीण आणि आदिवासी समुदायातील 6 ते 24 महिने वयोगटातील मुलांमध्ये सहा महिन्यातील पोषण स्थिती आणि वाढ यांच्यातील सबंध शोधतो. ग्रामीण कर्नाटकात हा रेखांशांचा निरीक्षणात्मक अभ्यास करण्यात आला. भारतामध्ये आदिवासी आणि ग्रामीण विषयाचा समावेश होतो

**अभ्यासाची उद्दिष्टे**

* महिला सक्षमीकरणाची गरज जाणून घेणे

* महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे

* महिला सक्षमीकरणाच्या जागरूकतेचे मूल्यांकन करणे

* महिला सक्षमीकरणासाठीच्या सरकारी योजनेचा अभ्यास करणे

* महिला सक्षमीकरणाच्या मार्गातील अडथळे ओळखणे व उपयुक्त सूचना देणे

**संशोधन कार्यप्रणाली**:

हा पेपर मुळात वर्णनात्मक आणि विश्लेषणात्मक आहे. या पेपरमध्ये भारतातील सक्षमीकरणाची विश्लेषण करण्यात आला आहे.

**महिलांची सध्याची स्थिती**

भारतीय महिलां पुरुषाच्या बरोबरीने असणे हे त्यांच्या साठी आजही खूप मोठे आव्हान आहे . केवळ सार्वजनिक व्यक्ती म्हणूनत्या किरकोळ नसतात. सरासरी भारतीय महिला क्वचितच घरात किंवा बाहेर शॉर्ट कॉल करू शकतात. 2012 मध्येकेंद्रीय मंत्री परिषदेत 74 पैकी फक्त आठ मंत्री पदावर महिला होत्या. सर्वोच्च न्यायालयात 26 न्यायाधीशांपैकी केवळ दोन महिला न्यायाधीश होत्या आणि विविध उच्च न्यायालयांमध्ये 634 न्यायाधीशांपैकी केवळ 54 महिला न्यायाधीश होत्या. धक्कादायक तथ्य 2013 नुसार UNDP च्या मानवी विकास निर्देशकांवरील अहवालानुसार अफगाणीस्थान वगळता सर्व दक्षिण स्त्रियांसाठी भारतापेक्षा चांगले क्रमांकावर होते.असे भाकीत केले आहे. एक ते पाच वर्ष वयोगटातील भारतीय मुलगी मुलांपेक्षा 75 टक्के जास्त मरण पावते , दर 20 मिनिटात एकदा एका महिलेवर बलात्कार होतो आणि सर्व गुण्यांपैकी 10% टक्के गुन्हे नोंदविले जातात. भारताच्या लोकसंख्येच्या 48% भारताच्या स्त्रिया आहेत. राष्ट्रीय कर्मचाऱ्यांच्या फक्त 29 टक्के आहेत. फक्त 26 टक्के महिलांना औपचारिक कर्ज उपलब्ध आहे

**महिला सक्षमीकरणाची गरज का आहे ?**

भारतीय संस्कृतीच्या वेद पुरानात प्रतिबिंबित करून स्त्रियांची लक्ष्मी सारखी पूजा केली जाते एम ए ए संपत्तीची देवी सरस्वती मॉ, बुद्धीसाठी ; सत्तेसाठी दुर्गा मॉ भारतातील महिलांची स्थिति विशेषतः ग्रामीण भागातील महिलांच्या सक्षमीकरणांच्या समस्येकडे लक्ष देण्याची गरज आहे. ग्रामीण भागातील महिला लोकसंख्येपैकी सुमारे 66% लोकसंख्येचा वापर होत नाही. हे प्रामुख्याने विद्यमान सामाजिक चालीरीतीमुळे आहे. कृषी आणि पशुसंवर्धन क्षेत्रात महिलांचे योगदान एकूण कर्मचाऱ्यांपैकी 90% आहे. स्त्रिया लोकसंख्येच्या जवळपास निम्म्या आहेत. त्यांच्या कामाच्या तासांपैकी जवळजवळ 2/3 काम करतात. जगाच्या उत्पन्नाचा 1/10 मिळवतात आणि 1/ 100 पेक्षा कमी जागतिक संपत्तीची मालकी असते .जगातील 900 दशलक्ष निरक्षर लोकांमध्ये स्त्रिया पुरुषांपेक्षा एक ते दोन क्रमांकावर आहेत. गरिबीत राहणाऱ्या लोकांपैकी 70 % महिला आहेत. कमी लिंग गुणोत्तर म्हणजे 933 सध्याच्या अभ्यासातून असे दिसून आले आहे. स्त्रिया समान वर्गातील असूनही पुरुषांपेक्षा तुलनेने कमी निरोगी आहेत. ते विकसनशील देशातील प्रशासक आणि व्यवस्थापकांच्या 1/7 पेक्षा कमी आहेत. जगातील संसदेत केवळ 10% जागा आणि राष्ट्रीय मंत्रीमंडळात 6% जागा महिलांकडे आहेत.

**महिला सशक्तीकरणातील अडथळे:**

**महिलांना पूर्वीच्या काळात आणि आजही काही प्रमाणात भेडसावणाऱ्या मुख्य समस्या ;**

लैंगिक भेदभाव , शिक्षणाचा अभाव, स्त्रीभ्रूणहत्या, आर्थिक मर्यादा, कौटुंबिक जबाबदारी, कमी गतिशीलता, जोखीम पत्करण्याची कमी, क्षमता उपलब्धीची कमी गरज, महत्त्वाकांक्षेचा अभाव, सामाजिक स्थिती, हुंडा, एकाच जातीतील विवाह आणि बालविवाह अजूनही अस्तित्वात आहेत.

स्त्रियांवर होणाऱ्या अत्याचार बलात्कार, लाथ मारून मारले गेले, दाबले गेले , जवळजवळ दररोज अपमानित केले गेले. महिलांवरील अन्यायावर संतापलेल्या अनेक पुरुषांनीही संघर्षांना पाठिंबा दिला आहे. स्त्रीया जगातील निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात आणि लिंग असमानता प्रत्येक देशात अस्तित्वात आहे. जोपर्यंत महिलांना पुरुषांच्या समान संधी मिळत नाही संपूर्ण समाज त्यांच्या खऱ्या क्षमतेपेक्षा कमी कामगिरी करू शकतील. महिलांकडे पाण्याचा सामाजिक दृष्टिकोन बदलवणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. जेव्हा स्त्रिया पुढे जातात तेव्हा कुटुंब पुढे सरकते, गाव हलते आणि राष्ट्रापुढे जाते त्यांचे विचार आणि त्यांची मूल्य प्रणाली एक चांगले कुटुंब ,चांगला समाज आणि शेवटी एक चांगले राष्ट्र विकसित करण्यासाठी आवश्यक आहे. महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे हा कदाचित सक्षमीकरणाचा सर्वोत्तम मार्ग आहे. महिला सशक्तिकरण तेव्हाच खरे आणि प्रभावी ठरेल जेव्हा त्यांना उत्पन्न आणि संपत्ती दिली जाईल जेणेकरून त्या त्यांच्या पायावर उभ्या राहतील आणि समाजात त्यांची ओळख निर्माण करू शकतील. महिलांचे सक्षमीकरण ही केवळ राष्ट्रीयच नव्हे तर 21 व्या शतकातील सर्वात महत्त्वाची चिंता बनली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केवळ सरकारी उपक्रमच पुरेशी नाहीत. लिंगभेद नसलेले वातावरण निर्माण करण्यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. महिलांना स्वतः निर्णय घेण्याची आणि सामाजिक, राजकीय आणि आर्थिक जीवनात सहभागी होण्याची पूर्ण संधी आहे. समानतेची भावना असलेला देश .

**महिला सक्षम करण्याचे मार्ग**

* महिलांच्या गतिशीलता आणि सामाजिक संवादात बदल
* महिलांच्या श्रम पद्धतीमध्ये बदल
* महिलांच्या संसाधनामध्ये प्रवेश आणि त्यावर नियंत्रण आणि बदल
* निर्णय घेण्यावर महिलांच्या नियंत्रणात बदल
* शिक्षण देणे
* स्वयंरोजगार आणि बचत गट
* पोषण, आरोग्य, स्वच्छता ,गृहनिर्माण यासारख्या किमान गरजा पुरवणे
* समाजाने स्त्रियांबद्दलची मानसिकता बदलली पाहिजे

**महिला सक्षमीकरणासाठी सरकारी योजना**

महिला विकासासाठी सरकारी कार्यक्रम भारतात 1954 पासून सुरू झाले परंतु प्रत्यक्ष सहभाग 1974 मध्येच सुरू झाला. सध्या भारतात सरकारकडे महिलांसाठी 34 पेक्षा जास्त योजना कार्यरत आहेत. विविध विभाग आणि मंत्रालयाद्वारे यापैकी काही खाली प्रमाणे आहेत .

1. राष्ट्रीय महिला कोष RMK 1992- 1993
2. महिला समृद्धी योजना MSY ऑक्टोबर 1993
3. इंदिरा महिला योजना IMY 1995
4. 1997- 98 मध्ये महिला उद्योजक विकास कार्यक्रमाला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आले.
5. सुमारे 9000 गावांमध्ये महिला समक्ष राबविण्यात येत आहे.
6. स्वयंसज्जा
7. स्वशक्ती ग्रुप
8. महिलांसाठी प्रशिक्षण आणि रोजगार कार्यक्रमास समर्थन STEP
9. स्वावलंबन
10. कामकरी आणि आजारी आईच्या मुलांसाठी क्रेचेस डे केअर सेंटर .
11. नोकरदार महिलांसाठी वस्तीगृहे
12. स्वाधार
13. महिला सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अभियान
14. एकात्मिक बाल विकास सेवा CDS 1975
15. किशोरवयीन मुलींच्या सक्षमीकरणासाठी राजीव गांधी योजना RGSEAG 2010
16. काम करणाऱ्या मातांच्या मुलांसाठी राजीव गांधी राष्ट्रीय क्रेंच योजना
17. एकात्मिक बाल संरक्षण योजना ICPS 2009-10
18. धनलक्ष्मी 2008
19. शॉर्ट स्टे होम
20. उज्वला 2007
21. जेंडर बजेटिंग साठी योजना XI योजना
22. एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम IRDP
23. ग्रामीण युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षण TRYSEM
24. पंतप्रधान रोजगार योजनाPMRY
25. महिला विकास महामंडळ योजनाWDCS
26. कार्यरत महिला मंच
27. इंदिरा महिला केंद्र
28. महिला समिती योजना
29. खादी आणि ग्रामोद्योग
30. इंदिरा प्रियदर्शनी योजना

31. SBI श्री शक्ती योजना
32. कृषी आणि ग्रामीण विकास योजनांसाठी राष्ट्रीय बँक
33. सरकार आणि त्यांच्या विविध योजनांचे प्रयत्न गैरसरकारी द्वारे पूरक आहेत. ज्या संस्था महिला सक्षमीकरणासाठी तितकीच महत्त्वाची भूमिका बजावत आहे. सरकार आणि स्वयंसेवी संस्थांच्या एकत्रित प्रयत्न नंतरही काही त्रुटी आहेत. अर्थात आम्ही महिलांच्या सक्षमीकरणासाठी खूप पुढे आलो आहोत. तरीही भविष्यातील प्रवास कठीण आणि मागणीचा आहे.

**महिला सक्षमीकरणाची स्थिती**

महिला सशक्तिकरणाची स्थिती महिलांच्या जीवनातील विविध घटकांच्या संदर्भात मूल्यमापन न करता एका आयामाने कल्पना करता येणार नाही आणि त्यांची स्थिती स्पष्ट संकल्पना आणेल म्हणून या पेपरमध्ये स्त्रियांची स्थिती आणि याबद्दल मूलभूत कल्पना देण्याचा प्रयत्न केला आहे.

**महिला सक्षमीकरणाची कारणे**

आज आपण भारतातील महिलांना सक्षम करण्यासाठी केंद्र सरकार तसेच राज्य सरकारचे वेगवेगळे कायदे आणि योजना पाहिल्या आहेत. परंतु भारतामध्ये सामाजिक सहभाग असो , राजकीय सहभाग असो, आर्थिक सहभाग असो, शिक्षणात प्रवेश असो, तसेच पुनरुत्पादक आरोग्य सेवा असो, समाजाच्या प्रत्येक स्तरावर महिलांना भेदभाव आणि उपेक्षित केले जाते. संपूर्ण भारतामध्ये महिला आर्थिक दृष्ट्या अत्यंत गरीब असल्याचे आढळून येते. काही महिला सेवा आणि इतर कामांमध्ये गुंतलेल्या आहेत. त्यामुळे पुरुषांसोबत स्वतः;च्या पायावर उभे राहण्यासाठी त्यांना आर्थिक ताकदीची गरज आहे. दुसरीकडे असे आढळून आले आहे की पुरुषापेक्षा महिला कमी साक्षर आहेत. 2001 च्या जनगणनेनुसार, भारतातील पुरुषांमध्ये साक्षरतेचे प्रमाण 76 % आहे. तर महिलांमध्ये हे प्रमाण केवळ 34% आहे. अशाप्रकारे स्त्रियांमध्ये आढळणारी शिक्षण त्यांना सक्षम करण्यासाठी खूप महत्त्वाचे आहे. असेही लक्षात आले आहे की काही स्त्रिया काम करण्यास खूप कमकुवत आहेत ते अन्न कमी खातात पण काम जास्त करतात त्यामुळे आरोग्याच्या दृष्टिकोनातून ज्या महिला कमकुवत आहेत. त्यांना अधिक सशक्त बनवायचे आहे. दुसरी समस्या म्हणजे कामाच्या ठिकाणी महिलांचा होणारा छळ, बलात्कार, मुलींचे अपहरण, हुंड्यासाठी छळ अशा अनेक घटना घडत आहे. या कारणामुळे त्यांना स्वतःचे संरक्षण करण्यासाठी आणि त्याची पवित्रता आणि प्रतिष्ठा सुरक्षित ठेवण्यासाठी सर्व प्रकारच्या सक्षमीकरणाची आवश्यकता आहे. सारांश स्त्रिया जोपर्यंत सोबत येत नाहीत आणि स्वतःला सक्षम बनवण्यासाठी मदत करत नाही तोपर्यंत महिला सक्षमीकरण शक्य नाही. महिलांची गरीबी कमी करण्यासाठी, महिलांच्या शिक्षणाला चालना देण्यासाठी आणि महिलांवरील हिंसाचार रोखण्यासाठी आणि आणि निर्मूलनासाठी योजना आखण्याची गरज आहे.

**आव्हाने**

भारतातील महिला सक्षमीकरणाची प्रक्रिया तपासणाऱ्या अनेक मर्यादा आहेत. भारतासारख्या विकसनशील देशांमध्ये सामाजिक नियम आणि कौटुंबिक रचना स्त्रियांची उपशीर्ष स्थिती प्रकट करतात आणि कायम ठेवतात. निकषांपैकी एक म्हणजे मुलींच्या जन्मापेक्षा मुल्लासाठी सतत प्राधान्य देणे जे सध्या जवळजवळ सर्व समाज आणि समुदायांमध्ये आहे. शिक्षण पोषण आणि इतर संधी बाबत समाज पुरुष मुलांच्या बाजूने अधिक पक्षपाती आहे. या प्रकारच्या वतीचे मूळ कारण मेघालयांचा अपवाद वगळता पुरुष मुलांना वंशाचा वारसा मिळतो या समजूतीमध्ये आहे. स्त्रिया सहसा त्याच्या भूमिकेची पारंपारिक संकल्पना नैसर्गिक मानतात आणि त्यामुळे त्यांच्यावर अन्याय होतो. भारतातील बहुसंख्य महिलांसाठी गरिबी हे जीवनाचे वास्तव आहे. हे आणखी एक घटक आहे जे महिला सक्षमीकरण साकारण्यात आव्हान निर्माण करते. भारतामध्ये महिलांच्या हक्काच्या समस्यांसमोर अनेक आव्हाने आहेत. यांना लक्ष करत या मुद्द्यांचा थेट फायदा भारतातील महिला सक्षमीकरणाला होईल.

***शिक्षण:** स्वातंत्र्यानंतर देशांनी झेप घेत प्रगती केली आहे. जेथे शिक्षणाचा विचार केला तर स्त्रिया आणि पुरुषांमधील अंतर गंभीर आहे. तर 82.14% प्रौढ पुरुष शिक्षित आहे, तर भारतात केवळ 65.46% पौढ स्त्रिया साक्षर आहेत. लिंगभेद हा उच्च शिक्षण, विशेष व्यावसायिक प्रशिक्षणामध्ये आहे. याचा महिलांना रोजगार आणि कोणत्याही क्षेत्रात सर्वोच्च नेतृत्व मिळवण्यात खूप मोठा फटका बसतो.

**गरिबी:** गरिबी हा जगातील शांततेसाठी सर्वात मोठा धोका मानला जातो आणि निरक्षरतेच्या निर्मूलनाला इतकेच गरिबीचे निर्मूलन हे राष्ट्रीय उद्दिष्ट असले पाहिजे, यामुळे महिलांचे घरगुती मदतनीस म्हणून शोषण केले जाते

**आरोग्य आणि सुरक्षितता** : महिलांचे आरोग्य आणि सुरक्षितता या देशाच्या कल्याणासाठी सर्वोपरी आहेत आणि देशातील महिलांच्या सक्षमीकरणांचे मूल्यांकन करण्यासाठी हा एक महत्त्वाचा घटक आहे तथापि मातृ आरोग्य सेवेचा प्रश्न चिंताजनक आहे.

### भारतातील महिलांच्या सक्षमीकरणासाठी घटनात्मक तरतुदी

* सर्व व्यक्तींसाठी कायद्या समोर समानता (Article 14)

* धर्म, वंश, जात लिंग किंवा जन्मस्थानाच्या आधारावर भेदभाव करण्यास प्रतिबंध (Article 15 - 1)

* तथापि राज्याद्वारे विशेष तरतुदी केला जाऊ शकतात स्त्रिया आणि मुलांसाठी अनुकूल लेख (Article1-15-3)

* राजाच्या अंतर्गत कोणत्याही कार्यालयात नोकरी किंवा नियुक्तीची संबंधित सर्व नागरिकांसाठी समान संधी (Article16)

* राज्य धोरण पुरुष आणि स्त्रियांना पुरेशा साधनांचा समान अधिकार सुरक्षित करण्यासाठी निर्देशित केले जाईल linvelihood (Article39 a, v) पुरुष आणि स्त्रिया दोघांनाही समान कामांसाठी समान वेतन अनुच्छेद (Article 39 d)

* कामाच्या न्याय आणि अमानवीय परिस्थिती आणि मातृत्व आराम (Article 42) सुसंवादाला प्रोत्साहन देण्यासाठी

* राज्याने करावयाच्या तरतुदी भारताच्या प्रत्येक नागरिकत्वाद्वारे आणि अशा प्रथांच्या त्याग ज्या अपमानास्पद आहेत. बिघडलेल्या कलम (Article 51 A) सन्मानासाठी (e)

* स्थानिक स्वराज्य संस्थांच्या थेट निवडणुकीत महिलांसाठी एकूण जागाच्या एक तृतीयापेक्षा कमी जागा राखून ठेवणे उदाहरण पंचायत आणि नगरपालिका (Article 343 d and 343 T)

### अभ्यासाचे निष्कर्ष

1. जागतिकीकरण, उदारीकरण आणि इतर सामाजिक आर्थिक शक्तीने मोठ्या लोकांना थोडा दिलासा दिला आहे. लोकसंख्येचे प्रमाण, तथापि अजूनही काही क्षेत्रीय आहेत जिथे 2 मध्ये महिला सक्षमीकरण भारतात मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. 21 देशातील लोकांच्या मानसिकतेत मोठा बदल होणे आवश्यक आहे . फक्त महिलांच नाही. स्वतःला पण पुरुषांना जागृत व्हावे लागेल अशा जगासाठी जे समता आणि समानते कडे वाटचाल करत आहे. आपल्या स्वतःच्या फायद्यासाठी नंतरच्या पेक्षा हे चांगले आहे

3. देशात अनेक सरकारी कार्यक्रम आणि स्वयंसेवी संस्था आहेत त्यामध्ये अजूनही मोठी दरी आहे.

4 गरिबी आणि निरक्षरता या गुंतागुंत वाढवते महिला सक्षमीकरणाची सुरुवात त्यांच्या आरोग्य आणि सुरक्षिततेच्या हमी सह होते

5 महिलांचे सक्षमीकरण तेव्हाच होऊ शकते जेव्हा त्यांची आर्थिक आणि सामाजिक स्थिती सुधारली जाते. सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने निश्चित सामाजिक व आर्थिक धोरणे अवलंबूनच हे शक्य आहे. स्त्रियांची आणि त्यांना जाणीव करून देणे की त्यांच्यात सशक्त माणूस बनण्याची क्षमता आहे

6 एक श्वासात जग निर्माण करण्यासाठी आम्ही महिलांना सक्षम बनवायला सुरुवात करतो.

### सूचना

तळागाळातील समस्या असलेल्या महिलांच्या शिक्षणाला पहिले आणि सर्वात महत्त्वाचे प्राधान्य दिले पाहिजे. त्यामुळे महिलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष द्यावे लागेल .विशेषता: दुर्बळ घटकांतील महिलांमध्ये त्यांच्या हक्काबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी जागृती कार्यक्रम आयोजित करणे आवश्यक आहे. महिलांना काम करण्याची मुभा देण्यात यावी आणि त्यांना काम करण्यासाठी पुरेशी सुरक्षा आणि पाठिंबा दिला गेला पाहिजे. त्यांना योग्य मोबदला आणि पुरुषांच्या बरोबरीने काम देण्यात यावे जेणेकरून समाजात त्यांचा दर्जा उंचावेल देशात प्रचलित गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी कार्यक्रम आणि कायद्यांची कठोर अंमलबजावणी व्हायला हवी.

### निष्कर्ष

अशाप्रकारे उत्पन्न/ रोजगाराच्या क्षेत्रात आणि शैक्षणिक आघाडीवर, महिला सक्षमीकरणाची परिस्थिती तुलनेने खराब असल्याचे दिसते. ज्या त्रुटी किंवा मर्यादा महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने लक्षात येत आहेत त्या ओळखणे ही काळाची गरज आहे आणि या उपक्रमाची सुरुवात महिला वर्गातूनच व्हायला हवी तसेच त्याहूनही महत्वाचे म्हणजे राज्य आणि समाजाने घेतले धोरणात्मक पाऊल. चला शपथ घेऊया की आम्हाला एक समाजवादी समाज हवा आहे जिथे प्रत्येकाला स्त्री असो वा पुरुष यांना अभिव्यक्त करण्याची आणि संपूर्ण समाजाचे कल्याण आणि उन्नती करण्याची समान संधी मिळेल. महिला सक्षमीकरण ही उत्तरेकडील संकल्पना नाही , दक्षिणेकडील देशांसह

जगभरातील महिला इतिहासाच्या सुरुवातीपासूनच लैंगिक असमानता आव्हानात्मक आणि बदलत आहेत या महिलांवरील अन्यायावर संतापलेल्या अनेक पुरुषांनीही संघर्षांना पाठिंबा दिला आहे. स्त्रियाजगातील निम्म्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात आणि लिंग असमानता प्रत्येक देशात आहे. जोपर्यंत महिलांना पुरुषांच्या समान संधी मिळत नाही. संपूर्ण समाज त्यांच्या खऱ्या क्षमतेपेक्षा कमी कामगिरी करू शकतील. महिलांकडे पाण्याचा सामाजिक दृष्टिकोन बदलवणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. जेव्हा स्त्रिया पुढे जातात तेव्हा कुटुंब पुढे सरकते, गाव हलते आणि राष्ट्र पुढे जाते त्यांचे विचार आणि त्यांची मूल्य प्रणाली एक चांगले कुटुंब, चांगला समाज आणि शेवटी एक चांगले राष्ट्र विकसित करण्यासाठी आवश्यक आहे. महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात सामील करून घेणे हा कदाचित सक्षमीकरणाचा सर्वोत्तम मार्ग आहे. महिला सशक्तिकरण तेव्हाच खरे आणि प्रभावी ठरेल जेव्हा त्यांना उत्पन्न आणि संपत्ती दिली जाईल जेणेकरून त्या त्यांच्या पायावर उभ्या राहतील आणि समाजात त्यांची ओळख निर्माण करू शकतील. महिलांचे समक्ष सक्षमीकरण ही केवळ राष्ट्रीयच नव्हे तर 21 व्या शतकातील सर्वात महत्त्वाची चिंता बनली आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी केवळ सरकारी उपक्रमच पुरेशी नाहीत. लिंगभेद नसलेले वातावरण निर्माण करण्यासाठी समाजाने पुढाकार घेतला पाहिजे. महिलांना स्वतः निर्माण निर्णय घेण्याची आणि सामाजिक ,राजकीय आणि आर्थिक जीवनात सहभागी होण्याची पूर्ण संधी आहे.p समानतेची भावना असलेला देश

**संदर्भ**


1. सुब्रमण्यम **(2011)** यांनी भारतातील वर्तमान आणि भूतकाळातील महिला शिक्षणाची तुलना केली**.** शाळेमध्ये मुलींच्या एकूण नोंदणीत चांगले प्रगती झाल्याचे लेखकाने अधोरेखित केले
2. भवानी शंकर **(2011)** यांनी हे अधोरेखित केले आहे की **SHG** च्या महिला सदस्यांचे आरोग्य नक्कीच चांगले झाले आहे**.**
3. **Duflo E (2011)** महिला सबलीकरण आणि आर्थिक विकास नॅशनल गुरु ऑफ इकॉनोमी रिसर्च केंब्रिज
4. शेतू रामन के **(2008)** दक्षिण भारतातील आदिवासी आणि ग्रामीण समुदायांमध्ये बालकांच्या वाढीमध्ये आणि कमी घोषणांमध्ये महिला सक्षमीकरण आणि घरगुती हिंसाचाराची भूमिका

# स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून महिला सक्षमीकरण

**डॉ. सुनिता तुकाराम राठोड (गोरे)**
सहाय्यक प्राध्यापक, श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, रिसोड रोड, वाशिम
sunitagore07@gmail.com

## गोषवारा (Abstract)

*प्राचीन काळापासून महिलांचे असणारे दुय्यम स्थान, महिलांवर होणारा अन्याय, अत्याचार, अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरेने जखडलेल्या महिलांना या जोखडातून मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्यानंतर अनेक समाजसुधारकांनी महिलांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी व त्याच्या उत्थानासाठी चळवळीच्या, परिसंवादाच्या, चर्चासत्राच्या माध्यमातून महिलांच्या प्रश्नांना हात घातला त्यांचे परिणामही. सकारात्मक बघायला मिळाले. महिलांसाठी अनेक कायदे,संविधानात तरतुदी, राजकीय आरक्षण, योजनांच्या माध्यमातून महिलांच्या सक्षमीकरणाचे वारे वाहू लागले त्यातच क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, न्यायमूर्ती रानडे, महात्मा गांधी अशा एक नव्हे अशा अनेक समाजसुधारकांनी पुढे येऊन महिलांच्या समस्येवर फुंकर घातली. स्त्री शिक्षणाची दालणे खुली करून दिली. "शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जे पेईल ते गुरगुरल्याशिवाय राहणार नाही" या उक्तीला समोर ठेवून अन्यायाला वाचा फोडायची असेल तर शिक्षण हे उत्तम माध्यम आहे. या संशोधन लेखात महिलांची ऐतिहासिक, पार्श्वभूमी महिला विषयक योजना, स्वयंसहायता बचत गटाचे महत्त्व, त्यामुळे महिलांच्या जीवनात झालेले बदल, महिला ह्या परस्परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे, बचतीचे , आर्थिक व्यवहाराचे, संघटनाचे, सर्वानुमते निर्णय घेण्याचे, परस्पर सहकार्याचे, सहभागाचे, नेतृत्व व कर्तव्य परायणाता, विचारांची, देवाण-घेवाणाची, सातत्यपूर्ण प्रयत्नशीलता या सर्व बाबी विकसित होतात हे सौभाग्य मिळाले प्रोफेसर मोहम्मद युनिस यांच्या मुळे सर्वात प्रथम स्वयंसहायता बचत गटाची निर्मिती व सुरुवात त्यांनीच केली.*

***कीवर्ड* (keyword)**: *स्वयंसहाय्यता—स्वतःची मदत स्वतः करणे, अनिष्ट – इष्ट नसलेले, जो खोडातून—बंधनातून जखडलेल्या—बांधलेल्या, प्राचीन --- पुरातन, स्वावलंबन—इतरांवर अवलंबून न राहता स्वतःचा बळावर, साम्राज्यवाद—साम्राज्याच्या शिखरावर, बळी – अर्पण हत्या सशक्त—शक्तिमान वृद्धिंगत – वाढ होणे*

**प्रस्तावना**

भारत देश हा देवीची उपासना करणारा देश आहे.

**"या देवी सर्वभूतेषु सस्तीरुपेन संस्थीता**
**नमस्ते,नमस्तस्ये नमस्तस्ये नमो नमः"**

भारत देशाला भारत माता म्हणून संबोधल्या जाते. त्याच भारतामध्ये महिलांचा विकास होणे क्रमप्राप्त ठरते. या देशात अर्धनारी नटेश्वर,उमा महेश्वर, राधाकृष्ण देवाच्या आधी देवीचे नाव घेतल्या जातात. अशा देशात स्त्रियांना समान, वागणूक समान दर्जा, स्वातंत्र्य, समानता मिळणे आवश्यक आहे. महिलांच्या स्थितीचा विचार करत असताना ऐतिहासिक पार्श्वभूमीचा विचार करने आवश्यक आहे.

अश्मयुगात मानवाने बुद्धीचा वापर करून दगड, हाडे यापासून अवजारे बनवली. ज्या ठिकाणी पाण्याचा स्रोत आहे. जसे नदी, नाले, तलावाच्या ठिकाणी वास्तव्य करायचे. आणि तिथेच जवळपास शेती करायचे. सर्वात प्रथम शेतीची सुरुवात स्त्रियांनीच केली. तिला शेतीची जनक म्हटले तरी काही वावगे ठरणार नाही. स्त्रिया अन्नाची व्यवस्था करायच्या कंदमुळे, फळे गोळा करायच्या. आणि पुरुष मात्र शिकार करायचे.

* **वैदिक काळात** :- स्त्रियांना पतीबरोबर मान सन्मान मिळत होता. स्त्रिया अध्यापनाचे कार्य करत, महिलांना आपला पती निवडण्याचे स्वातंत्र्य होते. या काळात मैत्रेयी , गार्गी याज्ञवल्की अशा अनेक विदूषी होऊन गेल्या. नदी, खोऱ्यात हवा, पाणी, जमीन, पोषक असल्यामुळे मोठ्या प्रमाणात शेतीला चालना मिळाली. भारतात खेडी वसण्याची, त्यांच्या हळुवार विकास होण्याची हळुवार प्रक्रिया सुरू झाली.

*** मध्य युगीन कालखंडात महिलांची स्थिती**

मध्ययुगीन काळात ग्रामीण लोक शेतीवर निर्भर होते. गहू, बाजरी, ज्वारी यासारखे धान्य पिकवत असंय व धातू उद्योग करत.या काळात वस्तू विनिमय पद्धती होती. मध्ययुगीन काळाला मुस्लिम राजवटीचा काळ सुद्धा म्हणत . या काळात महिलांवर अनेक प्रकारचे अन्याय, अत्याचार झाले सती प्रथा, बालविवाह, विधवा विवाह, बालिका वध, केशव पण, पडदा पद्धती अशा प्रकाराचे अनेक जाचक बंधने लादली केली. ठिकठिकाणी उद्रेक, दुष्काळी परिस्थिती,शेतसारा यामुळे सर्वसामान्य लोकांचे जीवन जगत होते.

***स्वातंत्र्यापूर्वीचा काळ :-**

या काळात इंग्रज भारतात व्यापारी म्हणून आले व राज्यकर्ते बनले. ग्रामीण भागात इंग्रज सरकारने कापूस, निळ,

तंबाखू, चहा या उत्पादनावर भर दिला. शेतीचे व्यापारीकरण केले. सामाजिक जीवनात उलथापालत घडून आली. सती प्रथेविरुद्ध कायदा लॉर्ड बेंटिक यांनी पारित केला. बालिका वध, बालविवाह , सती प्रथा, केशवपण अशा प्रकारच्या अनेक अनिष्ट प्रथांना महिला बळी पडल्या होत्या. त्याला वाचा फोडण्याच्या माध्यमातून अनेक समाजसुधारकांनी चळवळी,आंदोलने, चर्चासत्रे, परिसंवादाच्या माध्यमातून महिलांना सोबत घेऊन लढा

दिला. सावित्री ज्योतिबा, न्यायमूर्ती रानडे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, महात्मा गांधी यांनी महिलांसाठी चळवळी उभारल्या. इंग्रजांच्या साम्राज्यवादी धोरणाचा बळी ग्रामीण शेतकरी होऊ लागला. स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामविकासात आणि परिवर्तने झालेत. कृषी उद्योग, ग्रामीण उद्योग, कुटीर उद्योग उद्योग सुरू केले.रवींद्रनाथ टागोर यांच्या श्रीनगर संस्थेचे कार्य उल्लेखनीय आहे. महात्मा गांधीजींनी खेडी स्वयंपूर्ण करण्यावर भर दिला. ग्रामीण उद्योग, शिक्षण,प्रौढ शिक्षण, ग्रामीण आरोग्य,खेड्याकडे चला, भारत हा खेड्यांचा देश आहे. खेड्यांचा विकास म्हणजेच भारताचा विकास आणि भारताचा विकास जर साध्य करायचा असेल तर, महिलांच्या विकास होणे क्रमप्राप्त ठरते.

*** स्वातंत्र्यानंतरच्या काळात महिलांसाठीच्या वेगवेगळ्या योजना अंमलात आणल्या गेल्या.खालील प्रमाणे**

1)जननी सुरक्षा योजना.

2)महिला समाख्या योजना.

3)काम करी मातांच्या बालकांसाठी राजीव गांधी पाळणा योजना.

4) स्वाधार योजना

5)उज्वला योजना

6)आदिवासी महिला सशक्तिकरण योजना.

7) जननी शिशु सुरक्षा ककार्यक्रम

8)महिला किसान सशक्तिकरण योजना

9)नैरोशनी योजना

10)बेटी बचाव बेटी पढाओ

11)माझी कन्या भाग्यश्री

12)अस्मिता योजना

13)ग्रामीण भागातील स्त्रिया व मुलांच्या विकास कार्यक्रम (DWCRA)

डॉ. ए.पी.जे अब्दुल कलाम अमृत आहार योजना

14)स्वयंसिद्ध संरक्षण प्रशिक्षण

15) मनोधैर्य योजना प्रधानमंत्री

16)उज्वला योजना

17)स्वयंसहायता महिला बचत गट

18)राष्ट्रीय ग्रामीण जीवनोन्नती अभियान

अशा अनेक योजना अंमलात आणल्या. जेणेकरून महिलांचा विकास होईल त्या आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होऊन आत्मनिर्भर होतील." सशक्त नारी सशक्त समाज" "जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाला उधारी" किंवा " शिकलेली आई घर पुढे नेई" या म्हणी प्रमाणे महिला शिक्षण घेऊन राष्ट्राच्या विकासात योगदान देण्याकरिता त्यांना तयार करणे आवश्यक आहे. याच हेतूने सर्वात प्रथम प्रोफेसर मोहम्मद युनूस यांनी 1976 मध्ये चितगाव बांगलादेश येथे महिला बचत गटाची सुरुवात केली. 1983 ग्रामीण महिला बँकेची स्थापना केली. आणि त्यासाठी प्रोफेसर युनूस यांना नोबेल पारितोषिक मिळाले. भारतातील पहिला महिला बचत गट महाराष्ट्र राज्यात स्थापन झाला. प्रथम दक्षिणेकडील कर्नाटक राज्यात(MYRADA) म्हैसूर पुनर्वसन आणि विकास संस्था नावाच्या स्वयंसेवी संस्थेने बचत गटाची संकल्पना मांडली. बचत गटाच्या माध्यमातून बचतीचे महत्त्व कळावे. यासाठीचा हा प्रयत्न महिला आर्थिक विकास महामंडळाने आंतरराष्ट्रीय कृषी विकास तथा सहाय्यीत महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा कार्यक्रम महाराष्ट्रातील बारा जिल्ह्यात 951 गावात राबविला या कार्यक्रमात 76,000 महिलांना स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून संघटित करण्यात आले.

*** स्वयंसहाय्य बचत गट म्हणजे काय?** साधारणतः 15 ते 20 महिलांचा समूह होय. जो समान रक्कम ठराविक कालावधीत बचत म्हणून एकत्र करतो व त्याचा विनयोग सर्वांसाठी लोकशाही मार्गाने करतो.

***स्वयंसहाय्यता बचत गटाची व्याख्या-**

'परस्परावलंबनाकडून स्वावलंबनाकडे व स्वावलंबनाकडून परस्परावलंबनाकडे जाण्यासाठी स्वेच्छेने, सहमतीने सामुदायिकपणे बचतीच्या निमित्ताने केलेल्या प्रवास म्हणजेच स्वयंसहायता बचत गट होय.'

***उद्देश**

1)स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या कौटुंबिक आणि सामाजिक दृष्टिकोनात झालेल्या बदलांचे अध्ययन करणे.

2)ग्रामीण भागातील गरिबी दूर करण्याकरिता महिला संघटनांनी एकत्र येऊन आर्थिक गरजांचीपुरती करू शकतात का याचे अध्ययन करणे.

3)शासकीय योजना घर जोपर्यंत पोहोचवून त्याचा लाभ लाभार्थ्यांना झाला का याचे अध्ययन करणे.

4)शाश्वत किंवा दीर्घकाळ टिकणाऱ्या उपजीविका निर्माण करून स्वयंरोजगार किंवा रोजगाराच्या संधी वाढल्या का त्याचे अध्ययन करणे.

5) बचत गटाच्या माध्यमातून व योजनेतून आणखी कोणत्या अपेक्षा आहेत का याचे अध्ययन करणे.

***गृहितके/ उपकल्पना**

1)स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून महिलांकडे पाहण्याचा कौटुंबिक आणि सामाजिक दृष्टिकोन बदलला आहे.

2)ग्रामीण भागातील गरिबी दूर करण्याकरिता महिला संघटनांनी एकत्र येऊन आर्थिक गरजांची पूर्ती केली आहे.

3)शासकीय योजना गरजू पर्यंत पोहोचवून त्याचा लाभ लाभार्थ्यांना झाला आहे.

4) शाश्वत आणि दीर्घकाळ टिकणाऱ्या उपजीविका निर्माण करून स्वयंरोजगार किंवा रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत.

5)बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक बदलाची अपेक्षा आहे.

वरील उद्देश व उपकल्पना वरून असे लक्षात येते की, महिलांचा सर्वांगीण विकासासाठी बचत गट हा सहाय्यक आहे. स्वयंसहायता बचत गट हा कुणाचाही असू शकतो. शासन, स्वयंसेवी संस्था ज्या दुर्लक्षित घटकांकरिता काम करतात त्यांनी गट करतांना तो दारिद्र्यरेषेखालील लोकांचा, विधवा- परित्यक्ता स्त्रियांचा, स्त्रीप्रधान कुटुंबे असणाऱ्यांचा, शेतमजूर स्त्रियांचा, भूमिहीन स्त्रियांचा, सामाजिक दृष्ट्या दुर्बल दुर्लक्षित समाज घटकातील स्त्री-पुरुषांचा गट करणे अपेक्षित आहे.

*सद्यस्थितीत महिलांचे संघटन आवश्यक आहे.

*महिला संघटनांचे फायदे

* दैनंदिन आयुष्यात येणाऱ्या अडचणी, समस्या ना सामोरे जाण्यासाठी कुणावरही अवलंबून न राहता परस्पर सहकार्याने गावातल्या गावात समस्या सोडविण्यासाठी.

*परंपरागत सत्ता केंद्रांना धडक देऊन सर्वांच्या हातात सत्ता येण्यासाठी.

*राज्यसत्तेत सहभागी होण्याच्या प्रक्रियेत सक्षम होण्यासाठी.

***स्वयंसहायता बचत गटाची वैशिष्ट्ये**:

1स्वयंसहायता बचत गट लोकशाही प्रणालीवर आधारित असतो.

2 अत्यंत अल्प बचतीमध्ये महिला गटांमध्ये सभासदत्व मिळू शकते .

3 या गटामुळे महिला एकत्र येऊ शकतात.

4एकमेकींच्या अडचणीसाठी मदत करण्याची भावना निर्माण होते.

5"एकीसाठी सर्व" ही भावना वृद्धिंगत होते.

6गटस्थापन झाल्यापासून सहा महिन्यानंतर गटामध्ये अंतर्गत कर्ज व्यवहाराची प्रक्रिया सुरू होते.

7बचत केल्यामुळे गटातील सदस्यांचे आर्थिक कार्य सुरळीत होते.

'धन' व्यवहार सुरू होत असतांनाच सर्वात महत्त्वाचे असते 'मन'व्यवहार देखील सुरू होतो.

8 स्वबचतीच्या बळावर गटामधून कर्ज घेऊन स्वतःच्या कुटुंबीयांच्या दैनंदिन अडचणी सोडविणे शक्य होते घरगुती आजारपण, शेतातील छोटी मोठी कामे, शालेय खर्च बाळंतपण, लग्न इत्यादी घरगुती कारणांसाठी गटाकडून अल्प दरात कर्ज घेता येते. सावकारी पद्धती मुळीच येते अंतर्गत कर्ज व्यवहार प्रक्रियेमुळे स्वयंसहायता बचत गटाची आर्थिक कुवत वाढू लागते व त्या टप्प्यापर्यंत महिलांना बचतीचे आणि परतफेडीची सवय लागल्यामुळे गटाची कार्यप्रणाली सुव्यवस्थित सुरू होते विश्वासाचे वातावरण निर्माण होतेयाप्रतीमेच्या आधारावर गट स्थापन झाल्यास पासून तर एक वर्षापर्यंतच्या कालावधीत गटाला बँकेकडून कर्ज प्राप्त होऊ शकते कर्ज मिळू लागल्यावर गट बँकेला जोडल्या जातो. अर्थ व्यवहारात बरोबर सामाजिक कामामध्ये देखील गटाचा सक्रिय सहभाग अपेक्षित असतो लोकसहभाग हा स्वयंसहायता बचत गटाचा आत्मा आहे.

गटाची वाढ व विकास होणे हेही तेवढेच महत्त्वाचे आहे. गट स्थापन करणे, गटाला नाव देणे, बैठकी घेणे, गटाच्या सुव्यवस्थेत कार्यप्रणालीसाठी सर्वांमध्ये संघटिका व सहसंघटिका निवडली जाते. सहा महिन्यानंतर जमा रकमेतून कर्ज व्यवहार केला जातो. परतफेडची सवय लागते. गटाच्या नियमित अर्थकारणामुळे गटाची पत तयार होऊ लागते. बँक अथवा तत्सम वित्तीय संस्थांच्या दृष्टीने गटाचे अर्थकारण सुरळीत स्वरूपाचे आढळल्यास बँकेकडून कर्ज घेण्यास पात्र होतो. बँकेकडून कर्ज मिळाल्यामुळे गटाची आर्थिक बाजू भक्कम होते. गटाच्या नियमित बैठका, लेखी रेकॉर्ड, आर्थिक कुवत 100% अंतर्गत कर्ज व्यवहार यातूनच मायक्रो क्रेडिट संकल्पनेची सुरुवात होते. उद्योजकता विकास कौशल्यावर प्रशिक्षणाची जोड मिळाल्यास व्यावसायिक उद्योगाची सुरुवात, सामूहिक उद्योग, महिलांचे प्रश्न, गावाचे प्रश्न मोठ्या प्रमाणावर सोडविले जातात.

**सारांश**

बचत गटाच्या माध्यमातून महिलांचे कौटुंबिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक दृष्टिकोनातून महिला सक्षमीकरणाकडे वाटचाल करत आहे. स्वयंसहायता बचत गटाच्या माध्यमातून बचतीचे महत्त्व, आर्थिक व्यवहार, निर्णय कौशल्य, बँकेचे व्यवहार, व्यवसाय इत्यादी विषयात परिपूर्ण होतांना दिसत आहे त. बचत गटाच्या माध्यमातून वेगवेगळे व्यवसाय जसे सामूहिक शेती, शेळीपालन, कुक्कुटपालन, दुग्ध व्यवसाय , ब्युटी पार्लर, लघुउद्योग, कुटीर उद्योग, शिलाई काम, विणकाम, संगणक प्रशिक्षण , शेवया- कुरडया, चिप्स तयार करणे . या आणि अशा प्रकारचे व्यवसाय करण्यासाठी कर्ज दिले जाते. कर्ज घेऊन आपला व्यवसाय सुरू करतात. मिळणाऱ्या उत्पन्नातून कर्जाची परतफेड केली जाते. झालेल्या नफ्यातून आपले स्वप्न सत्यात उतरवण्याचे प्रयत्न केले जाते. त्यामुळे आत्मविश्वास वाढतो. मिळणाऱ्या उत्पन्नाची विक्री करण्यासाठी वेगवेगळे स्टॉल लावून विक्री केली जाते. तसेच बाजारपेठा उपलब्ध करून दिल्या जातात. कोरोना काळात शिलाई काम करणाऱ्या महिलांकडून मोठ्या प्रमाणात मास्क, पीपीई किट तयार केले गेले त्याच्या विक्रीसाठी व्यापारी वर्गाकडून विक्री केली गेली.अशा रीतीने हंगामानुसार आपले व्यवसाय करून उदरनिर्वाह व्यतिरिक्त नफ्यातून मुलांचे शिक्षण, व्यवसाय, लग्न, डिलिव्हरी खर्च, आरोग्यावर खर्च करून आपले राहणीमान उंचावण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यामुळे महिला ह्या स्वाभिमानी व स्वावलंबी बनल्या आहेत. बचत गटाच्या माध्यमातून कौटुंबिक व सामाजिक दृष्टिकोनात बदल झाला आहे. त्यांच्या सामाजिक दर्जा वाढला , त्या संघटित होऊन आर्थिक गरजांची पूर्तता करू लागल्या, सोबतच शिक्षण प्रवाह मध्ये आल्यामुळे शासकीय योजनांचा लाभ घेऊ लागल्या, महिलांच्या शाश्वत विकास घडून आला. स्वंयम रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या. म्हणजेच त्या काही

प्रमाणात का होईना स्वावलंबी, स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर, कार्य कुशल,सक्रिय कार्यकर्त्या, निर्णय क्षम बनल्या स्वयंसहायता बचत गटामुळे महिलांचा सर्वांगीण विकास साध्य झाला.

**संदर्भ ग्रंथ सूची**


1. गायधनी र.णा.:---प्राचीन भारताचा इतिहास, अनिरुद्ध पब्लिशिंग, हाऊस पुणे
2. मुलानी एम.यु. :--- महिला स्वयंसहायता बचत गट डायमंड, पब्लिकेशन, 2006 पुणे
3. *महिलांच्या योजना
4. *सराफ कुसुम बाळ:--- सहयोगिनी: महिला आर्थिक विकास महामंडळ मर्यादित, महाराष्ट्र शासन 2 ऑक्टोबर 2003 *स्वयंसहायता गट प्रशिक्षण पुस्तिका महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान 2018

# महिला आणि राजकारण

**वैशाली रघुनाथ देवळे**
**विद्यार्थी, आर. ए.कॉलेज वाशिम**
RUSHIVAISHU1@gmail.com

**गोषवारा**

*भारतीय राज्यघटनेतील 73 व्या घटनादुरुस्तीप्रमाणे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना 33% आरक्षण हे सभासदत्वाबरोबरच अधिकार पदांमध्ये ठेवले.त्यामुळे ग्रामीण महिला ह्या राजकारणात सहभागी होऊ शकल्या." जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उध्दारी" या उक्तीप्रमाणेच ही संकल्पना ठरवण्यात आली.संसाराचा गाडा ज्याप्रमाणे त्या महिला कार्यक्षमपणे हातात त्याचप्रमाणे त्या पंचायतीचा कारभार देखील सक्षमपणे कार्यक्षमपणे करतील हा विश्वास महिलांवर 73 व्या घटनादुरुस्तीप्रमाणे ठेवण्यात आला आणि महिला देखील सक्षमपणे व स्थानिक संस्थांमध्ये सहभागी झाल्या.महिला राजकारणात सहभागी झाल्यानंतर पाणी समस्या स्वच्छता या समस्यांना प्राधान्य देऊ लागल्या.चूल आणि मुल या पारंपरिक चौकटी बाहेर जाऊन विकासाचे निर्णय सक्षमपणे घेऊ लागल्या.20 ते 40 वयोगटातील महिला राजकारणात सक्रिय दिसून येतात.राजकीय सहभागामुळे त्यांचा आत्मविश्वास द्विगुणित झाला आहे.कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना महिला कौटुंबिक जबाबदारी सांभाळून राजकारणात सहभागी होत आहेत.ग्रामीण महिलांना राजकारणात काम करताना अनेक अडचणी येतात तरीही त्या अडचणींचा सामना करीत पुढे जात असलेल्या दिसून येतात.*

**कीवर्ड:** पहिल्या महिला पंतप्रधान– इंदिरा गांधी, गेल्या वीस वर्षात महिलांच्या अनेक प्रश्नांवर आवाज उठवलेला आहे–महिला नेत्यांनी, महिलांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न– महिला राज्यकर्त्या.

**परिचय:**

राजकारणातील महिलांच्या कर्तुत्वाचा इतिहास वेळोवेळी साक्षीदार आहे. मेरी अटॉइन पासून राणी एलिझाबेथ पर्यंत जगभरातील महिलांनी गरज पडेल तेव्हा अनेकदा राजकीय राजदंड आपल्या हातात घट्ट धरला आहे भारताने वेळोवेळी अशा प्रभावशाली महिला राजकीय व्यक्ती पाहिल्या आहेत.त्यांच्या योजना आणि राजकीय वैशिष्ट्यांची अनेकांनी कौतुक केले आहे.देशाच्या विकासातील त्यांचे योगदान कधीही नजरेआड करता येणार नाही.भारतात अनेक महिलांनी आपल्या कर्तुत्वाने वेळोवेळी राजकीय आयाम बदललेले आहेत.यात प्रतिभाताई पाटील या देशातील सर्वोच्च पदापर्यंत असलेल्या राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचल्या.तर इंदिरा गांधी यांनी पंतप्रधानपदी असताना कुशाग्र बुद्धिमत्तेने 1971 च्या युद्धात पाकिस्तानला धूळ चारली होती.अशा अनेक महिलांच्या कर्तुत्वाने ही भारत भूमी पावन झाली. महिलांच्या राजकारणा मधून महिलांचे सबलीकरण कसे झाले,याचा परिचय आपल्याला निश्चितच घडतो.

**संशोधनकार्याचा मुख्य भाग:**

भारतातच नव्हे तर जगामध्ये स्त्रियांचा राजकारणातील सहभाग बघितला तर आपल्याला नवलच वाटेल.या सर्व महिलांच्या सहभागामुळेच आज महिलांनाअनेक क्षेत्रात कर्तृत्व दाखवण्याची संधी मिळालीआणि त्यांनी ती यशस्वीपणे पारही पाडली.अशाच भारतातील काही राजकारणी महिला यांनी महिलांचे स्थान उंचावण्यासाठी व त्यांना न्याय मिळवण्यासाठी व त्यांच्या सबलीकरणासाठी महत्त्वाचे योगदान दिले.त्या महिला नेत्यांच्या इतिहासामधूनमहिलांचे सबलीकरण आपल्याला अभ्यासता येईल.

सुचिता कृपलानी: या या एक भारतीय स्वातंत्र्य सैनिक आणि राजकारणी होत्या.उत्तर प्रदेशच्या महिला मुख्यमंत्री म्हणून यांनी काम पाहिले.भारतीय राज्यघटनेच्या मसुदा तयार करणाऱ्या संविधान सभेचा भाग असलेल्या 15 महिलांमध्ये त्या एक होत्या.अरुणा असफली आणि उषा मेहता त्यांच्याप्रमाणेच त्या भारत छोडो आंदोलनादरम्यान आघाडीवर होत्या. फाळणीच्या दंगलीत त्यांनी महात्मा गांधी सोबत काम केले.भारताच्या संविधान सभेसाठी निवडून आलेल्या काही महिलांपैकी त्या एक होत्या.त्या कानपूर मतदार संघातून उत्तर प्रदेश राज्याच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून निवडून आल्या होत्य. तसेच भारतीय राज्यघटनेच्या मसुदा तयार करणाऱ्या उपसमितीचा भाग होत्या.1940

मध्ये त्यांनी ऑल इंडिया महिला काँग्रेसची स्थापना केली.1942 ते 1944 या काळात स्वातंत्र्यासाठी भूमिगत राहून आंदोलन केले 1944 ला त्यांना अटक करण्यात आली.1948 मध्ये विधानसभेसाठी पहिल्यांदा त्या निवडून आल्या. संसदेमध्ये वंदे मातरम गाण्याचा पहिला मान सुचिता कृपलानी यांना मिळाला.

इंदिरा गांधी: इंदिरा गांधी अगदी सुरुवातीपासूनच स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय होत्या.बालपणीच त्यांनी बाल चरखा संघाची स्थापना केली. इंदिरा गांधी यांनी स्वातंत्र्यलढ्यात सहभाग घेतल्यामुळे सप्टेंबर 1942 मध्ये त्यांना तुरुंगात टाकण्यात आले.1947 मध्ये त्यांनी गांधीजीच्या मार्गदर्शनाखाली दिल्लीतील दंगल ग्रस्त भागात काम केले.1958 मध्ये त्यांनी काँग्रेसच्या केंद्रीय संसदीय मंडळाच्या सदस्य म्हणून त्या काँग्रेसच्या राष्ट्रीय एकात्मता परिषदेच्या उपाध्यक्ष आणि 1956 मध्ये अखिल भारतीय युवक काँग्रेस आणि काँग्रेसच्या महिला विभागाच्या अध्यक्षा झाल्या.1959 ते 60 या काळात भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष होत्या.1966 ते 1964 या काळात त्या माहिती आणि प्रसारण मंत्री होत्या.त्यानंतर जानेवारी 1966 ते मार्च 1977 या काळात त्या भारताच्या पंतप्रधान होत्या.त्यांनी 5 सप्टेंबर 1967 ते 14 फेब्रुवारी 1969 पर्यंत परराष्ट्र मंत्रालयाचा अतिरिक्त कारभार सांभाळाला.इंदिरा गांधी यांनी जून 1970 गृह मंत्रालयाचा कारभार सांभाळला. जानेवारी 1980 पासून त्या नियोजित 1980 रोजी त्या पुन्हा पंतप्रधान झाल्या. इंदिरा गांधी भारताच्या पहिल्या आणि एकमेव महिला पंतप्रधान आहेत. हरित क्रांती खाजगी बँकांचे राष्ट्रीयीकरण, अवकाशात पहिला माणूस पाठवणे आणि परकीय धोरणे सुलभ करणे यातून त्यांचे नेतृत्व दिसून येते. 1984 ला इंदिरा गांधी यांची हत्या करण्यात आली.

सोनिया गांधी: राजीव गांधी यांच्यासोबत लग्न केल्यानंतर सोनिया गांधी यांनी भारतात राहणे पसंत केले. पंतप्रधानपदी असताना राजीव गांधी यांची हत्या झाल्यानंतर देखील त्यांनी भारत सोडण्याचा विचार केला नाही.एवढेच नाही तर काँग्रेसची धुरा सांभाळली.आपल्या पतीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी स्वतःला समर्पण केले. काँग्रेस अध्यक्ष म्हणून सोनिया गांधी यांचा कार्यकाळ त्यांच्या शतकानुशतके इतिहासातील सर्वात मोठा आहे. प्रतिभाताई पाटील: प्रतिभाताई पाटील हे एक असे व्यक्तिमत्व आहे,ज्यांच्या वर प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे.त्या स्वतंत्र भारताच्या सर्वोच्च पदावर विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला राष्ट्रपती आणि देशाच्या बाराव्या राष्ट्रपती होत्या.याव्यतिरिक्त राजस्थान च्या माजी राज्यपाल राज्यसभा सदस्य आणि महाराष्ट्र सरकार मध्ये कॅबिनेट मंत्री म्हणून देखील त्यांनी आपली सेवा दिली आहे.

सुषमा स्वराज: भारतीय जनता पक्षाच्या कुशाग्र नेत्यांमध्ये सुषमा स्वराज यांचे नाव नेहमीच घेतले जाते.सर्वोच्च न्यायालयाच्या माजी अभिवक्ता सुषमा स्वराज नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या सरकारमध्ये भारताच्या परराष्ट्र व्यवहार मंत्री होत्या. इंदिरा गांधी नंतर हे पद भूषवणाऱ्या त्या दुसऱ्या महिला आहेत.त्या सात वेळा खासदार आणि तीन वेळा विधानसभेच्या सदस्य म्हणून निवडून आल्या.13 ऑक्टोबर 1998 पासून त्यांनी दिल्लीचे पाचवे मुख्यमंत्री म्हणून काम केले.दिल्लीच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून त्यांची निवड झाली होती.आपल्या यशस्वी राजकीय कारकिर्दीत च्या दरम्यान प्रकृती अस्वस्थतेमुळे त्यांनी 2019 ची निवडणूक लढविण्यास नकार दिला.6 ऑगस्ट 2019 रोजी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले.

ममता बॅनर्जी: पश्चिम बंगालच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री म्हणून ममता बॅनर्जी यांनी काम केले.त्यांनी राज्यातील 34 वर्षीय डाव्या आघाडीच्या सरकारचा पडाव केला.त्या देशाच्या पहिल्या महिला रेल्वेमंत्री होत्या.1997 मध्ये त्यांनी पश्चिम बंगालमध्ये आपली स्थान मजबूत करण्यासाठी तृणमूल काँग्रेस या पक्षाची स्थापना केली.सध्या देखील त्या पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्रीपदी आहेत.

शीला दीक्षित: शीला दीक्षित या दिल्लीच्या मुख्यमंत्री होत्या.त्या काँग्रेस पक्षाच्या ज्येष्ठ सदस्य होत्या.दीक्षित यांनी काँग्रेसला राजधानीत सलग तीन निवडणुकांमध्ये विजय मिळवून दिला आहे.11 मार्च 2014 च्या केरळच्या राज्यपाल झाल्या.त्यानंतर 25 ऑगस्ट 2014 रोजी त्यांनी या पदाचा राजीनामा दिला.

जय ललिता: जय ललिता ह्या तामिळनाडूच्या सलग पाच वेळा मुख्यमंत्री राहिल्या.जय ललिता यांनी तामिळनाडूमध्ये आपली एक वेगळी ओळख निर्माण केलीहोती.आपल्या कारकिर्दित अनेक हिट चित्रपट देणाऱ्या आणि लाखोच्या हृदयावर राज्य करणाऱ्या,एका महान राजकारण्यापूर्वी त्या एक अभिनेत्री होत्या.1991 मध्ये तामिळनाडूमध्ये त्या मुख्यमंत्री बनल्या.पंचवीस वर्षे राज्य करणाऱ्या जय

ललिता यांची लोक पूजा करत असत.पाच डिसेंबर 2016 मध्ये त्यांचे निधन झाले.

मायावती: मायावती यांना भारतातील सर्वात शक्तिशाली दलित नित्या मानले जाते.त्यांनी चार वेळा उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री पद भूषवले आहे.सध्या त्या बहुजन समाज पक्षाच्या अध्यक्षा आहेत.भारतातील सर्वात तरुण महिला मुख्यमंत्री आणि पहिल्या दलित मुख्यमंत्री होण्याची श्रेय ही मायावतींनाच जाते.राजकीय सत्तेत त्यांना अनेक समस्यांचा सामना करावा लागला आहे.सत्तेवर येण्यापूर्वी त्या शिक्षिका होत्या.शिक्षिका म्हणून काम करत असताना त्यांची भेट काशीराम यांच्याशी झाली.त्यामुळे मायावतीचे आयुष्य पूर्णपणे बदलून गेले.काशीराम यांचा प्रभाव पाहून मायावतींच्या वडिलांना आनंद झाला नाही.त्या चार वेळा त्या उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्री झाल्या. वसुंधरा राजे: राज घराण्याची पार्श्वभूमी असलेल्या वसुंधरा राजे यांनी दोन वेळा राजस्थानचे मुख्यमंत्रीपद सांभाळले.तसेच वाजपेयी सरकारच्या काळात त्या केंद्रात मंत्रीपदावर देखील होत्या. राजस्थान मधील त्यांना मोठ्या प्रमाणावर जन समर्थन आहे. सुप्रिया सुळे: लोकसभा खासदार सुप्रिया सुळे या राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या कन्या आहेत.भारतीय राजकारण्यांच्या नव्या पिढीचा त्या एक प्रमुख भाग आहेत.पवार यांच्या खाजगी राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदी सुप्रिया येतील असा अनेकांचा विश्वास आहे.सुप्रिया सुळे यांनी 2011 मध्ये स्त्री भ्रूणहत्येविरुद्ध राज्यव्यापी मोहीम सुरू केली.त्यासाठी त्यांना ऑल लेडीज लीग तर्फे मुंबई महिला ऑफ द डिफेंड अचीवर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.सुप्रिया सुळे यांनी काही काळ पत्रकार म्हणून देखील काम केले आहे.एक सप्टेंबर 2014 रोजी त्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालय सल्लागार समिती वित्त आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि 2014 साठी भारतीय संसदीय गटाच्या सदस्य बनल्या.

## निष्कर्ष

स्वातंत्र्योत्तर काळात भारतीय राजकारणातील स्त्रीनेता म्हणून इंदिरा गांधी,सोनिया गांधी,ममता बॅनर्जी, मायावती, जय ललिता,प्रतिभाताई पाटील, सुषमा स्वराज, शालिनीताई पाटील,सुप्रिया सुळे,शीला दीक्षित,वसुंधरा राजे सिंधिया ही नावे सुपरिचित आहेत.

गेले वीस वर्षात सुविधा,स्वच्छतागृहे,बचत गट,महिला सुरक्षितता,लिंगनिदान करून स्त्रीभ्रूणहत्या यासारख्या प्रश्नांवर लक्ष वेधले आहे,शहरासोबतच गेल्या दहा वर्षात ग्रामीण भागातही महिला सरपंचापैकी काहींनी दारूबंदीच्या लढाईलाही मूर्त स्वरूप दिले.महिला सरपंचांनी व ग्रामपंचायत सदस्यांनी समाज सुधारण्याचा प्रयत्न केला.स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना राजकीय आरक्षणाची कवच प्राप्त झाल्यानंतर राजकारणात त्यांचा वावर वाढल्यानंतर महिला आता विश्वासाने बोलत आहेत.काहीतरी करून दाखवण्याची महिला मधील जिद्द वाढली आहे.स्त्रियांना राजकारणाविषयी नकारात्मकता न बाळगता राजकारणात येत आहेत.महिला चळवळीने कात टाकून केवळ समाजकारण न करता राजकीय आरक्षणासाठी लढले पाहिजे महिला राजकीय क्षेत्रात सक्रीय होत आहेत हे अत्यंत महत्त्वाची असून त्यातून येणारा काळ नक्कीच बदललेला असेल.शेवटी राजकारण येऊनच चांगलं राजकारण करता येतं शिवाय राजकीय महिला आरक्षणाचं जे विधेयक जे गेल्या अनेक वर्षापासून रखडून आहे ते संसदीय अधिवेशनात महिला खासदारांनी संसदेत मांडावे आणि सर्वांनी ते एकमताने पास करावे.हे विधेयक संसदीय अधिवेशनात मांडले गेले तर परिस्थिती बदलू शकते.कारण सर्वसमावेशक लोकशाही ही समान राजकीय सहभागाशिवाय निर्माण होऊ शकत नाही.

**संदर्भ:**

विकिपीडिया.

लोकमत,लोकसत्ताइ.वर्तमानपत्रातीललेख

# नारियों की प्रस्थिति, कानूनी प्रावधान : बनाम इच्छाशक्ति

**डॉ. महाश्वेता**
असिस्टेंट प्रोफेसर, संस्कृत विभाग संताल परगना महिला महाविद्यालय, सिदो–कान्हू मुर्मू विश्वविद्यालय
दुमका, झारखंड
mahashvetadevi@gmail.com

''क्या तुम जानते हो
अपनी कल्पना में
किस तरह एक ही समय में
स्वयं को स्थापित और निर्वासित
करती हैं एक स्त्री ?[1]

हाँ ये सच है कि बेटियाँ जब ब्याही जाती हैं तो एक जगह तो घर से बाहर जा रही होती हैं और दूसरी ओर उसे घर बसाना है, कैसे सामंजस्य करती हैं नारियाँ ? प्रकृति प्रदत् अपने सारे उतरदायित्वों को निभाती आज की महिलायें किसी भी क्षेत्र में पीछे नहीं है। चाहे वह स्कूल हो, कॉलेज हो, दफ्तर हो, कारखाना का क्षेत्र हो या खेल का मैदान, खेत हो या खलिहान, अचार पापड़ बनाना हो या दीदी–ढाबा चलाना हो सभी ओर महिलायें पुरूषों के समानांतर रात दिन काम कर देश के विकास में संलग्न है और देश के आर्थिक विकास में सहयोग दे रही है। लेकिन अभी भी समाज में कुछ लोग ऐसे दृष्टिकोण के मिल जाते हैं जो नारी को पुरूषों की अपेक्षा हेय दृष्टि से देखते हैं। हेय दृष्टिकोण न केवल पुरूषों का होता है अपितु कुछ नारियाँ भी ऐसे दृष्टिकोण में पीछे नहीं होती।

मानव–समुदाय पुरूष और महिला दोनों से बना होता है लेकिन जब समाज में कल्याण करने की बात उठती है, सुरक्षा की बात उठती है तो महिला की ही उठती है। यह बात स्पष्ट करती है कि समाज में महिलाओं की स्थिति कमजोर है। यदि समाज में दोनों की प्रस्थिति समान होती तो महिलाओं के कल्याण और सुरक्षा की बात नहीं पनपती। किसी भी समाज की वास्तविक स्थिति उस समाज में स्थित नारियों की स्थिति को देखकर जाना जा सकता है या कहें सामाजिक उन्नति का आकलन उस समाज में नारियों की दशा से किया जा सकता है। भारत में नारियों की स्थिति देश के काल क्रमानुसार समय–समय पर बदलता रहा है।

वैदिककालीन समाज में महिलाओं की स्थिति सम्मान जनक थी। उन्हें पुरूषों के ही समान राजनीतिक, सामाजिक, आर्थिक और धार्मिक अधिकार प्राप्त थे। उन्हें शिक्षा और संस्कार के भी अधिकार प्राप्त थे। महिलायें धार्मिक कृत्यों, शास्त्रार्थों, सभाओं, युद्धों में पुरूषों के कंधे से कंधे मिलाकर काम करती थीं। अपाला, विश्वावारा, मदालसा, घोषा, मैत्रेयी, गार्गी आदि। वैदिककाल महिलाओं का स्वर्णयुग था। रामायण काल में कैकेयी (युद्ध भूमि में साथ देने वाली) जैसे कई उदाहरण हमें मिलते हैं। यहाँ तक कि महिलाओं को विवाहित या अविवाहित रहने का भी पूर्ण अधिकार उस काल में प्राप्त था। स्वयंवर प्रथा न केवल राजकुमारियों तक सीमित थी अपितु सामान्य आर्य कन्यायें भी इस पद्धति से अपना वर चुनती थीं।

रामायण और महाभारत काल में भी नारियों को पुरूषों की भांति सामाजिक और धार्मिक अधिकार प्राप्त थे। कहीं–कहीं तो माता को गुरू से भी ऊपर (श्रेष्ठ) माने जाने के उदाहरण मिलते हैं–

गुरूणां चैव सर्वेषां माता हि परमो गुरूः।[2]

लेकिन आगे चलकर महाभारत के अंतिम चरण में महिलाओं की स्थिति बिगड़ने लगी। बौद्धकाल में महिलाओं की सामाजिक स्थिति और अधिक गिरी यद्यपि योग्य महिलाओं को सम्मान की दृष्टि से देखा जाता था।

स्मृतिकाल में समाज में महिलाओं की सामाजिक स्थिति के उच्च एवं निम्न दोनों के उदाहरण मिलते हैं। 'मनुसंहिता' में उल्लेख है–

''यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवताः।
यत्रैतास्तु न पूज्यन्ते सर्वांस्तत्राफलाः क्रियाः।[3]

अर्थात् जिस कुल में स्त्रियों की पूजा (यानि सम्मान) होती है उस कुल में देवता रमण करते हैं या देवता प्रसन्न रहते हैं। जहाँ नारियों का सम्मान नहीं होता, वहाँ सभी क्रियायें निष्फल हो जाती हैं। 'मनुसंहिता' में ही आगे महिलाओं को नियंत्रण में रहने की आवश्यकताओं पर चर्चा है। भले ही पुरुष शीलरहित, व्यसनी, दुराचारी हो या विद्या आदि गुणों से शून्य हो फिर भी ऐसे पति की पत्नी को पतिव्रता बने रहना चाहिए इन बातों का उल्लेख हैं।

खैर, मध्यकालीन युग आते–आते महिलाओं की स्थिति और बिगड़ गयी जब मुस्लिम आक्रमणकारियों का आगमन हुआ। प्रारम्भ में तो कई वीरांगनायें आक्रमणकारियों से लोहा लेने के लिए

मैदान में उतरी, मर्यादा और संस्कृति की रक्षा के लिए पुरूषों का साथ दिया लेकिन कालान्तर में मुस्लिम शासन स्थापित हुआ और पर्दा प्रथा का विस्तार हुआ। महिलाओं का शोषण होने लगा और दुर्व्यवहार होने लगा। समाज में महिलाओं की शैक्षिक, आर्थिक, राजनैतिक क्रियाकलाप को धक्का लगा। यद्यपि इस युग में भी कई महिलाओं के गौरवपूर्ण उपलब्धि कवयित्रियों, वीरांगनाओं और शासिकाओं के रूप में उदाहरण मिलते हैं।

अब हम बात करें आधुनिक काल की महिलाओं की स्थिति पर तो पता चलता है कि ब्रिटिश शासन काल की प्रारम्भिक चरणों में देश की महिलाओं की स्थिति काफी खराब थी। देश के कई भागों में सती प्रथा का प्रचलन हो गया था। बाल विवाह की प्रथा फैली हुई थी। विधवा विवाह प्रतिबन्धित था। पर्दा प्रथा और दहेज प्रथा सर्वत्र फैली हुई थी। शिक्षा पर पाबन्दियाँ लगने लगी थीं। महिलाओं के प्रति दुर्व्यवहार में वृद्धि हुई। अंगरेजों के आने से भारतीय समाज में पाश्चात्य सभ्यता का गहरा प्रभाव पड़ा। इसी बीच कई भारतवासियों को विदेशों में शिक्षा ग्रहण करने का मौका मिला। कई भारतीय पाश्चात्य विचारधाराओं के संपर्क में आये और नारी के पुनरूत्थान के लिए कार्य किया।

ब्रिटिश साम्राज्य में महिलाओं के हितों की रक्षा और उनकी प्रस्थिति में सुधार का प्रयास करने वाले समाज सुधारकों में राजा राम मोहन राय, ईश्वर चन्द्र विद्यासागर, रानाडे, दयानन्द सरस्वती, स्वामी विवेकानन्द, एनी बेसेंट, सरोजिनी नायडू, मार्गरेट कजिन्स, महात्मा गांधी, ज्योतिबा फूले जैसे कई ख्याति प्राप्त व्यक्तित्व सम्मिलित हैं। इन समाज सुधारकों की सहायता से स्त्री–शिक्षा ने बल पाया। सती–प्रथा, बाल–विवाह आदि कुप्रथायें समाप्त होने लगी। विधवा–विवाह के कानूनी अधिकार को पाकर महिलायें अपने को स्थापित करने लगी। समाज में महिलाओं की स्थिति सुधरने लगी। डॉ. भीमराव अंबेडकर ने महिलाओं को सशक्त करने का जो बीड़ा उठाया उसे नजरअंदाज नहीं कर सकते। हिन्दुओं में कतिपय कारणों से जो लैंगिक असमानता थी उन मुद्दों को डॉ. अम्बेडकर ने सामने लाया और सामाजिक स्थिति में सुधार हेतु शिक्षा की भूमिका को उद्घाटित किया।

कुछ नकारात्मक बातों को अगर हम नजरअंदाज करें तो वर्तमान में महिलाओं की स्थिति काफी हद तक अच्छी है। संविधान के 15 वें अनुच्छेद में पुरूषों और महिलाओं को समान अधिकार दिये गये हैं। फिर भी हम इस तथ्य को नकार नहीं सकते कि विकास और सामाजिक दृष्टि से महिलाएँ पुरूषों के मुकाबले पीछे हैं। आज भी नारी को कमजोर वर्ग की नारी समझी जाती है। समाज में घटने वाली घटनायें, यथा छेड़खानी, तेजाबी आक्रमण, घरेलू हिंसा, महिलाओं पर पाबंदी (कई क्षेत्र में) इसके उदाहरण हैं। यद्यपि सरकार द्वारा नारी उत्थान के अनेक प्रयास किये जा रहे हैं। यह ध्यान देने वाली बात है कि जहाँ सारे पुरूष बलिष्ठ तथा शक्तिशाली नहीं हो सकते वहीं सभी महिलायें कमजोर नहीं हो सकती। हाँ कुछ महिलायें तो पुरूषों से भी कमजोर हो सकती है तो दूसरी ओर कुछ महिलाएँ पुरूषों से भी अधिक शक्तिशाली हो सकती हैं, इसका सबसे अच्छा उदाहरण है–कर्णम् मल्लेश्वरी जिन्होंने सिडनी ओलम्पिक में विशेष तथा पुरूष वर्चस्व वाले क्षेत्र में पदक प्राप्त किया तथा उतना भार उठाया जितना कि औसत भारतीय पुरूष भी तीन भागों में विभाजित कर ही उठा सकता है। पीटी उषा, गीता फोगाट और बबीता फोगाट जैसी कुश्ती लड़ने वाली महिलायें उदाहरण हैं। केवल शारीरिक शक्ति से ही नहीं अपितु मानसिक, राजनीतिक, व्यावसायिक एवं बौद्धिक शक्ति से भी नारी धनवती है। वर्तमान राष्ट्रपति द्रौपदी मुर्मू प्रत्यक्ष प्रमाण है। प्रथम महिला राष्ट्रपति प्रतिभा पाटिल प्रधानमंत्री इन्दिरा गाँधी, डॉ. किरण बेदी, नजमा हेपतुल्ला, अन्ना राजम मल्होत्रा (प्रथम आईएएस) मीरा नायर, ज्योतिमय सिकन्दर, कल्पना चावला, कोनेरू हम्पी, चोकिला अय्यर (प्रथम भारतीय महिला विदेश सचिव) मेनका गांधी, महाश्वेता देवी, अरूंधती राय, मेधा पाटेकर, शबाना आजमी, विजय लक्ष्मी विदारी (सिविल सेवा परीक्षा 2000 में प्रथम स्थान प्राप्त) सुषमा स्वराज, वर्तमान वितमंत्री श्रीमती निर्मला सीतारमण आदि नारियों की सफलता इस बात की साक्षी है कि महिलायें पुरूषों की अपेक्षा न तो कमजोर होती हैं न ही अबला। उक्त समाज सुधारकों ने सामाजिक, आर्थिक और राजनीतिक, जीवन में महिलाओं की सहभागिता पर बल दिया। विश्व और राष्ट्रीय स्तर पर नारी उत्थान सम्बन्धी कार्यक्रमों और योजनाओं के प्रचलन के बाद भी नारी वर्ग को अपेक्षित लाभ नहीं मिल पाया है। शासकीय प्रशासकीय तंत्र की असफलताओं ने महिलाओं को स्वयं पहल करने के लिए प्रेरित किया फलस्वरूप कई महिला संगठनों की स्थापना हुई।

यद्यपि सरकारी स्तर पर भी नारी उत्थान सम्बन्धी अनेक प्रयास किये जा रहे हैं फिर भी कुछ समस्यायें जैसे–पुरूषों की तानाशाही, आर्थिक निर्भरता, लैंगिक भेदभाव, निराश्रित महिलाओं की समस्यायें, नारी उत्पीड़न में वृद्धि, गिरते मानवीय मूल्य जैसी समस्याओं का सामना एक सामान्य महिला को झेलना ही पड़ता है। दोहरे काम की समस्या, निम्न मजदूरी, कार्य की कठिन दशायें,

असामाजिक तत्वों से सुरक्षा की समस्या, प्रसूति से उत्पन्न समस्यायें, आवास, यातायात, आर्थिक सुरक्षा आदि समस्यायें महिलाओं के लिए विशिष्ट समस्या के रूप में है। कामकाजी महिला को बच्चे सम्भालने जैसी समस्या भी कभी–कभी जटिल समस्या बन जाती है।

इन समस्याओं को ध्यान में रखते हुए सरकार ने समाधान हेतु बहुत से उपाय किये है–जैसे–

**1. महिला विकास कार्यक्रम–**

i. महिलाओं को प्रशिक्षण एवं रोजगार सहायता कार्यक्रम
ii. नोराड कार्यक्रम
iii. महिला समृद्धि योजना
iv. राष्ट्रीय महिला कोष
v. इन्दिरा महिला योजना
vi. राष्ट्रीय महिला संसाधन केन्द्र
vii. ग्रामीण महिला विकास एवं सशक्तीकरण परियोजना
viii. राष्ट्रीय महिला आयोग का गठन
ix. बालिका सार्क दशक (1991–2000) के लिए राष्ट्रीय कार्य योजना
x. व्यापक राष्ट्रीय योजना
xi. पंचायती राज में महिलाओं की भागीदारी।

**2. संविधान एवं सामाजिक विधान**

**3. पंचवर्षीय योजना एवं बीस सूत्री कार्यक्रम–इसके अंतर्गत् निम्नलिखित महिला विकास की केन्द्रीय योजनाओं को स्वीकृति प्रदान की गयी।**

i- कामकाजी महिलाओं के लिए हॉस्टल की व्यवस्था
ii- महिलाओं के लिए रोजगार एवं आय के अवसर प्रदान करने के लिए प्रशिक्षण एवं उत्पादन केन्द्रों की स्थापना।
iii- प्रौढ़ महिलाओं के लिए शिक्षा और व्यावसायिक प्रशिक्षण के अल्पकालीन पाठ्यक्रम।
iv- ग्रामीण गरीब महिलाओं के लिए प्रशिक्षण।
v- महिलाओं के प्रशिक्षण द्वारा रोजगार की स्थिति में सुधार।
vi- स्वयं सेवी संगठनों को कार्य में सक्रिय रखना।
vii- संकटकालीन आश्रय।
viii- महिला उत्पीड़न को रोकने हेतु शिक्षा केन्द्रों और महिला संगठनों को प्रोत्साहन।
ix- असहाय महिलाओं की पुनर्स्थापना हेतु प्रशिक्षण केन्द्रों की स्थापना।
x- महिला संगठनों की नीति निर्माण में भाग लेने के अवसर प्रदान करना।

समाज में महिलाओं के अधिकार के प्रति जागृति, उनकी स्थिति में सुधार, उनका उत्पीड़न रोकने हेतु जनजागृति,, महिला कल्याण से संबंधित संगठनों की सहायता और पिछड़े क्षेत्रों में तकनीकि सहायता की योजनायें भी बनायी गयी हैं। तथा नौंवी पंचवर्षीय योजना (1997–2002) में पहली बार –महिला सशक्तिकरण को प्रमुख उद्देश्य के रूप में शामिल किया गया है।

इस प्रकार हम देखते हैं कि महिलाओं की समस्या के समाधान के लिए सरकार तो प्रयासरत है लेकिन कहीं न कहीं समाज सरकार के प्रयासों के प्रति निष्क्रिय है, जिसके कारण सरकार के सारे प्रयास निष्प्रभावी हो जाते हैं। समाज (कतिपय लोगों) में एक सबसे विकराल समस्या लड़का–लड़की संतान में अन्तर का है। जिससे लड़कियां अक्सर कुंठित हो जाती है और उनका विकास अवरूद्ध हो जाता है। महिला विकास के लिए समाज को, प्रत्येक माँ–बाप को चाहिए कि वह अपनी बेटी को प्रोत्साहित करे ताकि बेटी की सोच सकारात्मक बने और वह भी पुत्र के समान सफलता अर्जित करे क्योंकि आज की बेटी ही कल माँ बनेगी और–

'गुरूणां चैव सर्वेषां माता हि परमो गुरूः।

अर्थात् माँ गुरूओं की भी गुरू पहली गुरू होती है।

महिला कल्याण के लिए सरकार के प्रयास को समाज का अपेक्षित सहयोग चाहिए। सम्प्रति वातावरण में बलात्कारियों को मृत्युदण्ड देने की मांग उठती है लेकिन यह प्रश्न विचारणीय है कि क्या हम वर्तमान समय में विधि द्वारा विहित दण्ड भी किसी अपराधी को दिला पाते हैं ? कोई भी अपराधी दण्ड से बचा रहता है तो उसका कारण कानून की कमी नहीं अपितु दृढ़ इच्छाशक्ति की कमी है।

निष्कर्षतः हम कह सकते हैं कि सारी शक्तियाँ सभी अधिकार और सरकारी प्रयास महिलाओं की सहायता तब तक नहीं कर सकते जबतक नारी स्वयं अपनी हीन मानसिकता से ऊपर उठकर दृढ़ प्रयास नहीं करती। महिलाओं के प्रयास के साथ–साथ समाज भी अपना परम्परावादी नजरिया बदले और इस बात पर गौर करे कि–

''यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवताः।

इस श्लोक में 'पूजयन्ते' का अर्थ सम्मान करने से है। महिलायें भी, जान लें कि नारियों का उन्नयन नारियों के ही हाथों है। किसी ने ठीक ही कहा है–

''दृढ़ इच्छाशक्ति के बिना प्रयास ठीक उसी प्रकार होगा, जिस प्रकार किसी बुत के हाथों में

परमाणु हथियार के होते हुए भी किसी चूहे का शिकार भी असंभव है।''

## संदर्भ–सूची


1. निर्मला पुतुल–क्या तुम जानते हो ? (हिन्दवी)
2. महाभारत 1/211/16
3. मनुसंहिता 913
4. हाशिये का समाज एवं डॉ. अम्बेडकर
5. डॉ. प्रभात कुमार– श्रम एवं समाज कल्याण
6. राम आहूजा– सामाजिक समस्यायें (द्वितीय संस्करण)
7. प्रतियोगिता दर्पण–2002–03–04

# महिला आणि राजकारण
# Women And Politics

**आधार छगन पानपाटील[१] आणि डॉ.प्रा.रमेश धनराज जाधव[२]**
[1]Research Student KBCNMU Jalgaon
[२]मार्गदर्शक, इतिहास विभाग प्रमुख, उपप्राचार्य कला, वाणिज्य आणि विज्ञान, महाविद्यालय शिरपूर, जि.धुळे
aadharpanpatil@gmail.com

**प्रस्तावना**

*देशाच्या स्वातंत्र्यपूर्व काळापासून देशातील महिलांचे राजकारणातील स्थान हा चर्चेचा विषय राहिला आहे. दिल्लीच्या राजगादीवर स्त्री राज्यकर्ती म्हणून विराजमान झालेली रझिया सुलतान पासून ते स्वतंत्र भारतातील पहिल्या महिला प्रधानमंत्री पदावर विराजमान झालेल्या इंदिरा गांधी आणि पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून निवडून येणाऱ्या प्रतिभाताई पाटील पर्यंत हा भारतीय राज्यव्यवस्थेत स्त्रीयांच्या राजकारणातील सहभागाचा महत्वाचा टप्पा आहे. आज भारतीय राज्यव्यवस्थेत स्त्रिया देखील अग्रेसर असलेल्या दिसून येतात. देशाच्या सर्वोच्च पदापर्यंत स्त्रियांनी आपली राजकीय झेप घेतल्याचे दिसून येत आहे. सध्या कार्यरत असलेल्या द्रौपदी मुर्मू ह्या देशाच्या दुसऱ्या महिला राष्ट्रपती आहेत. त्याच प्रमाणे देशाच्या अर्थ मंत्री असलेल्या निर्मला सीतारमण ह्या यापूर्वी देशाच्या पहिल्या स्वतंत्र संरक्षण मंत्री पदावर असणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या आहेत. हे सर्व पाहता भारतीय राजकारणात स्त्रिया आज सर्वोच्च पदापर्यंत जरी पोहचल्या असल्या तरी त्यांचे राजकारणातील स्थान त्यांना मिळालेले राजकीय अधिकार आणि त्याअधिकारांची होत असलेली अंमलबजावणी या विषयी संशोधन होणे आवश्यक आहे. म्हणून सदरील संशोधन लेखात देशातील संसदेपासून ते स्थानिक स्वराज्य संस्थे मधील स्त्रियांचे राजकीय सहभाग विषयी संशोधन करण्यात आले आहे. स्त्रियांचे राजकीय सबलीकरण होणे आवश्यक असल्याने. १९८४-१९८९ या काळात महिला सबलीकरण हि संकल्पना प्रथमच चर्चेला आली. त्यासाठी १९९० मध्ये राष्ट्रीय महिला आयोग कायदा निर्माण करून १९९२ मध्ये राष्ट्रीय महिला आयोगाची व राज्य महिला आयोगाची स्थापना करण्यात आली. महिलांच्या संविधानिक आणि विधीविषयक सुरक्षा उपायांचा आढावा घेणे, कायदेमंडळाला स्त्रीयांच्या विकासाबाबतीत शिफारशी करणे, स्त्रीयांच्या बाबत घेत असलेल्या धोरणात्मक निर्णयांच्या बाबतीत सरकारला सल्ला देणे इ. कार्य राष्ट्रीय व राज्य महिला आयोग करीत असते.*

## संशोधनाचे उद्देश

1) देशातील व महाराष्ट्रातील स्त्रीयांचे राजकारणातील स्थान आणि महत्व जाणून घेणे.
2) भारतीय स्त्रीयांच्या राजकारणातील असलेल्या योगदानाचा अभ्यास करणे.
3) भारतीय राजकारणातील स्त्री-पुरुष समानतेचा अभ्यास करणे.
4) राष्ट्र विकासात स्त्रियांच्या भूमिकेचा अभ्यास करणे.
5) राजकारणातील स्त्री विषयक दृष्टिकोनाचा अभ्यास करणे.

## संशोधन पद्धती

प्रस्तुत लेखात ऐतिहासिक, विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीचा वापर केलेला असून संशोधन लेखातील विवेचन प्राथमिक व द्वितीय साधन सामग्रीवर आधारित आहे त्यासाठी विविध संदर्भ ग्रंथ व संशोधन लेखांचा वापर करण्यात आला आहे.

## विषय विवेचन

भारताच्या स्वातंत्र्य चळवळीत देखील महिलांचा सहभाग विशेष महत्वाचा होता. भारत स्वतंत्र झाल्यानंतर देशाचा राज्यकारभार कसा चालवावा यासाठी निर्माण करण्यात आलेल्या संविधान सभेत २९९ सदस्यांपैकी १५ महिला सदस्य होत्या. भारताच्या संविधान निर्मितीमध्ये देखील स्त्रियांचे मोलाचे योगदान आहे. स्त्रिया आणि राजकारण या संशोधन लेखाचे विवेचन खालील मुद्यांच्या आधारे करता येईल.

### १) स्त्रीयांच्या राजकीय हक्काबाबत संविधानात्मक व कायदेविषयक तरतुदी

संविधानाच्या भाग १५ मधील कलम ३२५ मधील तरतुदी नुसार 'कोणतीही व्यक्ती धर्म, वंश, जात किंवा लिंग या कारणावरून मतदार यादीत समाविष्ट होण्यास अपात्र असणार नाही'. असे वर्णन आहे याचा अर्थ देशातील सर्व नागरिकांना स्त्री-पुरुष, जात-पात, धर्म असा कुठलाही भेदभाव न करता समान मताधिकार देण्यात आला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर स्त्रियांना पुरुषांच्या समान मताधिकार देण्यात आला आहे.

संविधानातील कलम २४३ मध्ये दुरुस्ती करून १९९३/९४ मध्ये ७३ व्या व ७४ व्या घटना दुरुस्तीनुसार कलम २४३D व २३४T अन्वये अनुक्रमे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये महिलांना ३३%राजकीय आरक्षण देण्यात आले होते. या घटना दुरुस्ती नंतर महिलांना ३३% आरक्षण देणारे महाराष्ट्र हे देशातील

पहिले राज्य ठरले. त्यानंतर २००९ मध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% जागा आरक्षित करण्यात आल्या असून ग्रामीण व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांना पुरुषांच्या समान प्रतिनिधित्व देण्यात आले आहे. महाराष्ट्र शासनाने २०११ पासून स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% जागा आरक्षण म्हणून जाहीर केल्या. त्यानुसार महिलांचे राजकीय आरक्षण घोषित करण्याचे आणि निवडणुका घेण्याचे कार्य राज्य निवडणूक आयोग करीत असतो.

भारतीय संसदेत महिलांना समान प्रतिनिधित्व असावे हा विचार स्वातंत्र्य चळवळी पासून मांडण्यात येत होता. देशाच्या एकूण मतदाराच्या तुलनेत ५०% च्या जवळपास लोकसंख्या असलेल्या महिलांना मात्र राजकीय प्रक्रियेत समान प्रतिनिधित्व मिळायला हवे या दृष्टीने महिलांच्या राजकीय आरक्षणाकडे १९८८ मध्ये तत्कालीन प्रधानमंत्री राजीव गांधी यांनी लक्ष वेधले. राजीव गांधी सरकारने महिलांचे संसदेतील ३३% प्रतिनिधित्व देण्यासंबंधी १९८९ मध्ये ६४ वे घटनादुरुस्ती विधेयक मांडले. परंतु ते मंजूर होऊ शकले नाही. त्यानंतर एच.डी.देवेगौडा सरकार मध्ये हे विधेयक संसदेत मांडण्यात आले परंतु देवेगौडा सरकार अल्पमतात आल्याने ते कोसळले. १९९८ मध्ये वाजपेयी सरकार मध्ये देखील हे विधेयक संसदेत चर्चेला आले परंतु त्याला तत्कालीन संसद सदस्यांनी प्रचंड विरोध केल्यामुळे ते मंजूर होऊ शकले नाही. त्यानंतर २०१० मध्ये मनमोहनसिंग सरकार मध्ये हे महिला राजकीय आरक्षणाचे विधेयक पुन्हा मांडण्यात आले. ते राज्यसभेत मंजूर करण्यात आले परंतु लोकसभेत त्यावर चर्चा न झाल्याने ते मंजूर करण्यात आले नाही.

महिलांच्या बाबतीत इतर प्रश्नावर एकत्र येणारे राजकीय नेते आणि पक्ष महिलांच्या राजकीय समानता प्रस्थापित करण्याच्या प्रश्नांवर मात्र एकत्र येताना दिसत नाहीत. संसदेत अनेक पक्ष व नेत्यांकडून त्याला विरोध होताना दिसतो. लोकसंख्येच्या जवळपास ५०% असलेला हा वर्ग भारत स्वतंत्र होऊन ७५ वर्षे झाल्यावर देखील राजकीय समानतेच्या बाबत मात्र उपेक्षितच दिसून येतो.

## २) भारतीय संसदेतील महिला प्रतिनिधित्व -:

२०१९ मध्ये झालेल्या सतराव्या लोकसभेच्या निवडणुकीत सर्वप्रथम ८२ महिला खासदार निर्वाचित झाल्या आहेत. हे आता पर्यंत निवडून आलेल्या महिलांच्या संख्येच्या प्रमाणात सर्वाधिक जास्त महिला निवडून आल्याचे प्रमाण आहे.

**भारताच्या लोकसभेतील महिलांचे प्रमाण**

| अ. क्र. | लोकसभा कार्यकाळ | एकूण संसद सदस्य | निवडून आलेले महिला सदस्य | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १लि | १९५१-१९५७ | ४८९ | २२ | ४.४ % |
| २री | १९५७-१९६२ | ४९४ | २२ | ५.४ % |
| ३री | १९६२-१९६७ | ४९४ | ३१ | ६.७ % |
| ४थी | १९६७-१९७१ | ५२३ | २९ | ५.९ % |
| ५वी | १९७१-१९७७ | ५२१ | २८ | ४.२ % |
| ६वी | १९७७-१९८० | ५४४ | १९ | ३.४ % |
| ७वी | १९८०-१९८४ | ५४४ | २८ | ५.१ % |
| ८वी | १९८४-१९८९ | ५४४ | ४३ | ८.१ % |
| ९वी | १९८९-१९९१ | ५२९ | २९ | ५.३ % |
| १०वी | १९९१-१९९६ | ५०९ | ४१ | ७.० % |
| ११वी | १९९६-१९९८ | ५४१ | ४० | ७.४ % |
| १२वी | १९९८-१९९९ | ५४५ | ४३ | ८.० % |
| १३वी | १९९९-२००४ | ५४३ | ४९ | ८.८ % |
| १४वी | २००४-२००९ | ५४३ | ४५ | ८.१ % |
| १५वी | २००९-२०१४ | ५४३ | ५९ | १०.९ % |
| १६वी | २०१४-२०१९ | ५४३ | ६६ | ११.२ % |
| १७वी | २०१९-२०२४ | ५४३ | ८२ | १५.१० % |

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या २०२१ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार एकुण मतदार ९१,१९,५०,७३४ पैकी महिला मतदार ४३,८५,३७,९११ असून त्यांचे शेकडा प्रमाण ४८.०८% एवढे आहे. याचाच अर्थ देशातील ४८% लोकसंख्या असलेल्या महिला वर्गाचे देशाच्या संसदेत केवळ १५% प्रतिनिधित्व आहे. देशात महिलांच्या विकासासाठी सन २००१ मध्ये राष्ट्रीय महिला धोरण मंजूर करण्यात आले. परंतु ज्या ठिकाणी धोरण निश्चित केले जाते तेथेच महिलांचे प्रमाण पुरुषांच्या मानाने कमी दिसून येते. राज्य सरकारांच्या बाबत देखील जवळपास हेच प्रमाण आहे.

**३) महाराष्ट्रातील विधानसभेतील महिला प्रतिनिधित्व–**
१ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली त्यानंतर १९६२ मध्ये सर्वप्रथम महाराष्ट्र राज्याच्या विधानसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या. २०१९ मध्ये झालेल्या १३व्या विधानसभा निवडणुकीत राज्यातून एकुण २४ महिला आमदार निवडून आल्या आहेत. आता पर्यंतचे हे सर्वाधिक प्रमाण आहे.

**महाराष्ट्रातील विधानसभेतील महिलांचे प्रमाण**

| अ. क्र. | विधानसभा कार्यकाळ | एकूण विधानसभा सदस्य | निवडून आलेले महिला सदस्य | शेकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १लि | १९६२–१९६७ | २६५ | १७ | ६.४१ % |
| २री | १९६७–१९७२ | २७१ | १२ | ४.४२ % |
| ३री | १९७२–१९७७ | २७१ | २८ | १०.३३ % |
| ४थी | १९७७–१९८० | २८९ | ०८ | ०२.७६ % |
| ५वी | १९८०–१९८५ | २८९ | २० | ०६.९२ % |
| ६वी | १९८५–१९९० | २८९ | १६ | ०५.५३ % |
| ७वी | १९९०–१९९५ | २८९ | ०६ | ०२.०७ % |
| ८वी | १९९५–१९९९ | २८९ | १३ | ०४.४९ % |
| ९वी | १९९९–२००४ | २८९ | १२ | ०४.१५ % |
| १०वी | २००४–२००९ | २८९ | ११ | ०३.८० % |
| ११वी | २००९–२०१४ | २८९ | ११ | ०३.८० % |
| १२वी | २०१४–२०१९ | २८९ | १२ | ०४.१६ % |
| १३वी | २०१९–२०२४ | २८८ | २४ | ०८.३३ % |

केंद्रीय निवडणूक आयोगाच्या ३१ जाने २०१९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या अहवालानुसार १३ व्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रातील एकुण मतदार ८,७३,३०,४८४. पैकी ४,१६,२५,८१९. महिला मतदार असून त्यांचे शेकडा प्रमाण ४७.६६% एवढे आहे. याचा अर्थ ४८% लोकसंख्या असलेल्या महिला वर्गाचे विधानसभेतील प्रतिनिधित्व फक्त ८% एवढे आहे. १९६२ मधील पहिल्याच विधानसभा निवडणुकीत मा. प्रतिभा पाटील यांनी स्त्री आमदार होण्याची मुहूर्तमेढ रोवली. पुरुषांच्या मानाने राज्यांमध्ये देखील महिला प्रतिनिधित्व कमी प्रमाणात दिसून येते. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बाबत मात्र स्रियांना समान प्रतिनिधित्व दिल्यामुळे स्थानिक स्तरावर महिलांना राजकीय स्वातंत्र्य बहाल केल्याचे दिसून येते.

**४) स्थानिक स्वराज्य संस्था मधील महिला प्रतिनिधित्व–:**
स्वातंत्र्यानंतर राजकीय क्षेत्रात महिलांना समान प्रतिनिधित्वाचा प्रश्न नेहमीचा वादात्मक राहिला अखेर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये एक वैधानिक दर्जा देण्यासाठी सन १९९३ /९४ मध्ये ७३ वी व ७४ वी घटनादुरुस्ती करून संविधानातील २४३ मध्ये दुरुस्ती करून २४३D व २३४T अन्वये अनुक्रमे ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्था व नागरी स्थानिक स्वराज्य संस्था यांमध्ये महिलांना ३३%राजकीय आरक्षण देण्यात आले होते. २००९ मध्ये पुन्हा स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी ५०% जागा राखीव केल्यानंतर आज रोजी देशातील एकूण २२ राज्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५०% महिला आरक्षणाचा अंमल सुरु झाला आहे. महाराष्ट्रात २०११ पासून हि प्रक्रिया अंमलात आली.

**५) देशाच्या सर्वोच्च पदावर असलेले महिला प्रतिनिधित्व**
संविधानातील कलम ५२ अन्वये देशासाठी एक राष्ट्रपती असेल अशी तरतूद आहे. त्यानुसार आता पर्यंत १९५० ते २०२२ पर्यंत एकूण १५ व्यक्ती राष्ट्रपती पदावर विराजमान झाले आहेत. यापैकी केवळ दोन महिलांनी राष्ट्रपती पद भूषविले आहे. २५ जुलै २००७ ते २४

जुलै २०१२ या काळात महाराष्ट्राच्या जळगाव जिल्ह्यातील मा.प्रतिभाताई पाटील यांनी देशाच्या पहिल्या महिला राष्ट्रपती म्हणून मान मिळवला होता. ते १२ वे राष्ट्रपती होते. त्यानंतर १५ वे राष्ट्रपती म्हणून २५ जुलै २०२२ पासून दुसऱ्या महिला राष्ट्रपती पदी मा. द्रौपदी मुर्मू ह्या विराजमान आहेत. या दोन्हीही महिला या पूर्वी राज्यपाल ह्या पदावर देखिल होत्या. मा.प्रतिभाताई पाटील ह्या ८ नोव्हे २००४ ते २३ जून २००७ या काळात राजस्थान राज्याच्या राज्यपाल होत्या. तर मा. द्रौपदी मुर्मू ह्या १८मे २०१५ ते १३ जुलै २०२१ या काळात झारखंड राज्याच्या राज्यपाल होत्या.

**६) राज्यपाल पदावर असलेल्या महिला प्रतिनिधी**

राज्यांच्या बाबत राज्यपाल हे पद अति महत्वाचे आहे. देशातील प्रत्येक राज्यात राज्यपाल आणि केंद्रशासित प्रदेशासाठी नायब राज्यपाल संविधानाच्या कलम ६३ नुसार राष्ट्रपती कडून नियुक्त केला जातो. त्यानुसार देशातील ३६ राज्यांमध्ये (केंद्रशासित प्रदेशांसह) राज्यपाल पदावर अनेक व्यक्ती नियुक्त केले गेले आहेत. देशाच्या इतिहासात सरोजिनी नायडू ह्या पहिल्या महिला राज्यपाल होत्या. त्या उत्तर प्रदेश राज्याचा १५ ऑगस्ट १९४७ ते २ मार्च १९४९ या काळात राज्यपाल होत्या. त्यानंतर आता पर्यंत देशात एकूण २८ महिलांनी राज्यपाल पद उपभोगलेले आहे. महाराष्ट्रात १ मे १९६० पासून महाराष्ट्र स्वतंत्र झाल्यानंतर आतापर्यंत एकूण २० व्यक्तीं राज्यपाल पदावर आल्या आहेत पैकी फक्त एकाच महिलेला महाराष्ट्राच्या राज्यपाल होण्याचा बहुमान मिळालेला आहे. विजयालक्ष्मी पंडित ह्या महाराष्ट्राच्या पहिल्या महिला राज्यपाल होत्या. त्या २८ नोव्हे १९६२ ते १८ ऑक्टो १९६४ या काळात राज्यपाल होत्या. इतर राज्यांच्या महिला राज्यपाल विषयी अधिक संशोधन होणे आवश्यक आहे.

**७) प्रधानमंत्री पदी असलेली महिला प्रतिनिधी**

भारत स्वतंत्र झाल्यापासून आता पर्यंत देशात १५ व्यक्तींनी प्रधानमंत्री पद उपभोगलेले आहे. २०१९ मध्ये झालेल्या १७ व्या लोकसभेच्या निवडणुकीत श्री, मा. नरेंद्र मोदी हे पद म्हणून २६ वे आणि व्यक्ती म्हणून १५ वे प्रधानमंत्री आहेत. यापैकी स्व. इंदिरा गांधी ह्या एकमेव महिला आहेत ज्यांनी देशाच्या प्रधानमंत्री म्हणून राज्यकारभार पाहिला आहे. तिसऱ्या लोकसभेचे प्रधानमंत्री स्व. लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या मृत्यू नंतर स्व. इंदिरा गांधी ह्या प्रधानमंत्री झाल्या. मार्च १९६६ ते मार्च १९७७ या चौथ्या आणि पाचव्या लोकसभा काळात त्या प्रधानमंत्री होत्या. सातव्या लोकसभेत देखील त्या प्रधानमंत्री होत्या. ( १४ जाने १९८० ते ३१ ऑक्टो १९८४) त्यांनी चार वेळेस प्रधानमंत्री पद उपभोगलेले आहे. एक महिला असूनही त्यांचा कार्यकाळ प्रभावशाली ठरला. दि. ३१ ऑक्टो १९८४ रोजी त्यांच्याच अंग रक्षकाने त्यांची हत्या केली.

**८) मुख्यमंत्री पदावर असलेल्या महिला प्रतिनिधी**

देशातील एकूण २८ राज्य आणि दोन केंद्रशासित प्रदेश (दिल्ली आणि पुद्दुचेरी) मध्ये मुख्यमंत्री असतात. आता पर्यंत देशातील केवळ १६ महिलांनी मुख्यमंत्री पद उपभोगलेले आहे.

**देशातिल मुख्यमंत्री पदावर असलेल्या महिला**

| अ.क्र. | महिला मुख्यमंत्र्याचे नाव | कार्यकाल | कालावधी (दिवस) | राज्य |
|---|---|---|---|---|
| १ | सचेता कृपलानी | २/१०/१९६३ ते १३/३/१९६७ | १२५८ | उत्तर प्रदेश |
| २ | नंदिनी सतपथी | १४/६/१९७२ ते ३/३/१९७३<br>६/३/१९७४ ते १६/१२/१९७६ | १२७८ | ओडिशा (२ वेळा) |
| ३ | शशिकला काकोडकर | १२/८/१९७३ते २७/४/१९७९ | २०८४ | गोवा |
| ४ | सैय्यदा अन्वरा तैमुर | ६/१२/१९८० ते ३०/६/१९८१ | २०६ | आसाम |
| ५ | व्ही.के.जानकी रामचंद्रन | ७/१/१९८८ ते ३०/१/१९८८ | २३ | तामिळनाडू |
| ६ | जयललिता | २४/६/१९९१ ते १२/५/१९९६<br>२/३/२००२ ते १२/५/२००६<br>१६/५/२०११ ते २७/९/२०१६<br>२३/५/२०१५ ते ५/१२/२०१६ | ५२३८ | तामिळनाडू (४ वेळा) |
| ७ | मायावती | १३/६/१९९५ ते १८/१०/१९९५<br>२१/३/१९९७ ते २१/९/१९९७<br>३/५/२००२ ते २९/८/२००३<br>१३/५/२००७ ते १५/३/२०१२ | २५६२ | उत्तर प्रदेश (४ वेळा) |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८ | राजिंदर कौर भट्ठल | २१/११/१९९६ ते १२/२/१९९७ | ८३ | पंजाब |
| ९ | राबडी देवी | २५/७/१९९७ ते ११/२/१९९९<br>९/३/१९९९ ते २/३/२०००<br>११/३/२००० ते ६/३/२००५ | २७४६ | बिहार<br>(३ वेळा) |
| १० | सुष्मा स्वराज | १२/१०/१९९८ ते ३/१२/१९९८ | ५२ | दिल्ली |
| ११ | शीला दीक्षित | ३/१२/१९९८ ते २८/१२/२०१३ | ५५०४ | दिल्ली |
| १२ | उमा भारती | ८/१२/२००३ ते २३/८/२००४ | २५९ | मध्य प्रदेश |
| १३ | वसुंधरा राजे शिंदे | ८/१२/२००३ ते ११/१२/२००८<br>८/१२/२०१३ ते १६/१२/२०१८ | ३६५९ | राजस्थान |
| १४ | ममता बॅनर्जी | २०/५/२०११ ते आता पर्यंत | | प. बंगाल |
| १५ | आनंदीबेन पटेल | २२/५/२०१४ ते ७/८/२०१६ | ८०८ | गुजरात |
| १६ | मेहबूबा मुफ्ती | ४/४/२०१६ ते २०/६/२०१८ | ८०७ | जम्मू काश्मीर |

देशातील पहिल्या मुख्यमंत्री म्हणून सुचेता कृपलानी यांना ओळखले जाते. त्या २ ऑक्टो १९६३ ते १७ मार्च १९६७ या काळात उत्तर प्रदेश राज्याच्या मुख्यमंत्री होत्या. देशातील एकूण १२ राज्य आणि एक केंद्रशासित प्रदेशात महिला मुख्यमंत्री झालेल्या आहेत. अजूनही महाराष्ट्र सारख्या बऱ्याच राज्यांमध्ये महिला मुख्यमंत्री झालेली नाही. शीला दीक्षित ह्या आजपावेतो सर्वाधिक जास्त काळ मुख्यमंत्री पद उपभोगलेल्या पहिल्या महिला आहेत. आजरोजी संपूर्ण देशात केवळ पश्चिम बंगाल या एकाच राज्यात मा. ममता बॅनर्जी ह्या विद्यमान मुख्यमंत्री आहेत. मे २०२१ पासून त्या पुन्हा पश्चिम बंगाल राज्याच्या मुख्यमंत्री झाल्या. त्यांचा हा कार्यकाल पूर्ण झाल्यास त्या देशातील सर्वाधिक काळ मुख्यमंत्री पदावर विराजमान असणाऱ्या महिला म्हणून गणल्या जातील.

**समारोप**

देशातील एकंदर महिलांच्या बाबतीत राजकीय पार्श्वभूमीचा अभ्यास केला असता असे निदर्शनास येते कि राजकीय स्वातंत्र्याच्या बाबतीत अजूनही महिलांना समान अधिकार मिळालेला नाही. संसदेत महिलांना किमान ३३% आरक्षण द्यावे ह्या विषयावर अजूनही संसदेत विधेयक मंजूर झालेले नाही. पुरुष प्रधान व्यवस्थेमुळे अजूनही महिला वर्ग राजकीय हक्कांपासून दूर असल्याचे चित्र आहे.

आता पर्यंत १५ व्यक्तींनी राष्ट्रपती पद उपभोगलेले असताना केवळ दोनच महिला त्या पदावर आलेल्या आहेत. राज्यपाल म्हणून महाराष्ट्राचा विचार केला तर २३ फेब्रु २०२३ पासून रमेश बैस हे २० वे राज्यपाल म्हणून कार्यरत आहेत. परंतु यापैकी केवळ विजयालक्ष्मी पंडित ह्या एकाच महिलेने महाराष्ट्राचे राज्यपाल पद उपभोगलेले आहे. देशातील एकंदरीत राज्यांचा विचार केला तर शेकडो व्यक्ती राज्यपाल पदावर आलेत परंतु त्यापैकी केवळ २८ महिला राज्यपाल म्हणून कार्यभार करू शकल्या आहेत.

मुख्यमंत्री म्हणून देखील आता पर्यंत देशातील केवळ १६ महिलांनी १२ राज्यांमध्ये कार्यभार सांभाळलेला आहे. पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांचे हे प्रमाण खूपच कमी आहे. अजूनही बरीच राज्य पहिल्या महिला मुख्यमंत्री होण्याच्या प्रतीक्षेत आहेत.

स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ग्रामीण भागात महिलांना ५०% आरक्षण असले तरी प्रत्यक्षात मात्र महिला नावाने पदावर असतात कार्यभार मात्र तिच्या घरातले पुरुष मंडळी चालवतात असे दिसून येते. त्यासाठी महाराष्ट्र सरकारने शासन निर्णय काढून त्यावर बंदी घातली आहे. एकंदरीत राजकीय दृष्ट्या महिलांचे प्रमाण पुरुषांच्या तुलनेने खूप कमी आहे. ज्या महिला आज राजकीय क्षेत्रात दिसून येतात त्या बहुतांशी राजकीय पार्श्वभूमी असलेल्या घरातूनच आलेल्या दिसून येतात. अजूनही सर्वसामान्य कुटुंबातील स्त्रिया राजकारणात सक्रीय असल्याचे दिसून येत नाही.

स्त्रीयांच्या राजकारणातील या कमी प्रमाणाला काही कारणे आहेत. जसे पुरुषांमध्ये स्त्रियांचे नेतृत्व मान्य करण्याची मानसिकता नसणे. स्त्रियांना दुय्यम दर्जा देणे. राजकारण हा स्त्रियांचा विषय नाही असे समजणे. अशा अनेक कारणामुळे स्त्रियांचे राजकीय क्षेत्रातील स्थान कमी झाल्याची दिसून येते.

**संदर्भ**


1) प्रा.मुटे पांडुरंग.- महिला सबलीकरण: स्वरूप आणि विकास. अरुणा प्रकाशन लातूर.
2) गोंधळेकर प्राची.- प्रतिभा पाटील.पहिल्या महिला राष्ट्रपती. कौस्तुभ प्रकाशन.
3) माने श्रीमंत.- महिला नेतृत्वाची मांदियाळी . २००९
4) दुर्गादास बसू.- Introduction of the Constitution of India.20th. Edi.2011
5) प्रा.देसाई संभाजी.- महिला सबलीकरण.- प्रशांत पब्लिकेशन जळगाव.
6) केंद्रीय निवडणूक आयोग अहवाल फ्लिप बुक- २०२१
7) केंद्रीय निवडणूक आयोग- महाराष्ट्र मतदार यादी अहवाल. जाने २०१९
8) एम. लक्ष्मीकांत.- भारतीय संविधान: के सागर प्रकाशन पुणे २०२०
9) प्रा. पवार दीपक.- महिलांचे राजकीय सक्षमीकरण.- श्री,साईनाथ प्रकाशन नागपूर
10) 10) प्रा.लवटे रत्नाकर बाबुराव.- महिला सबलीकरण: राजकीय विश्लेषण JRN.INDIAN THINKER ISSN-219-8648. Aug 2016 to Jan.2017

# स्त्री पुरुष समानता : स्वप्न की वास्तव

**प्रतिभा अरुण थोरात (आवंडकर )**
श्रीमती राधाबाई सारडा कला, वाणिज्य व व विज्ञान महाविद्यालय अंजनगाव सुर्जी

महाराष्ट्रातील सामाजिक सुधारणांचा विचार करताना स्त्रियांच्या सुधारणा, हा विषय स्वतंत्रपणे हाताळावा लागतो. कोणत्याही समाजात स्त्रियांची संख्या साधारणपणे पन्नास टक्के असल्यामुळे स्त्रियांना दुःस्थितीत ठेवून तो समाज, आपण सुधारलेले असल्याचा दावा करू शकत नाही. भारतातील प्राचीन वर्णन जाती व्यवस्थेचे दृढीकरण झाल्यानंतर समाजातील शुद्रातीशुद्राची अवस्था फारच वाईट झाली होती. आता स्त्रियांना अतिशुद्रांप्रमाणे वागवणे व्यवहारा अशक्य असले तरीही त्यांना शुभ्राप्रमाणे वागवणे शक्य होते आणि त्यांच्या वाटेला आले. म्हणूनच प्राचीन साहित्य 'स्त्रीशुद्र' असा द्वंद समास आढळतो. सूर आणि मूल हेच तिचे कार्यक्षेत्र ठरून गेले होते. पुरुषप्रधान समाजात ओळखलेच जात नव्हते. उलट बालपणात वडिलांवर तरुणपणीपतीवर आणि वृद्धापकाळी पुत्रावर अवलंबून ठेऊन ती स्वातंत्र्यासाठी पात्र नसल्याचां उद्घोष केला होता.

स्त्रियांच्या दुःखाला नाना तऱ्हेचे पदर होते. काही जातीमध्ये मुलगी जन्माला येता क्षणीच तिला मारून टाकण्याची प्रथा होती. बालविवाह तर समाजात सऱ्हास होत होते, शिवाजी बालविवाहाला मान्यता होतीच . शिवाय दुसऱ्या बाजूला जेवढी उच्च जातीची असेल तितके तिच्यावर निर्बंध अधिक लाधले जायचे. ज्या निम्न जातीत असे निर्बंध पूर्वी नव्हते, त्याही जाती आपला दर्जा उंचावण्यासाठी याबाबतीत उच्च जातीचे अनुकरण करून आपल्या स्त्रियांना बंधनात टाकायला तयार झालेल्या होत्या. असे एकूण स्वरूप असताना, आपला समाज जेव्हा ब्रिटिश राज्यकर्त्यांच्या संपर्कात आला आणि त्यांच्या माध्यमातून समाजाचा पश्चिमत्व ज्ञान विज्ञानाचा परिचय झाला, तेव्हा साहजिकच आपल्या समाजातील विचारवंत तुलनात्मक विचार करू लागले. तिकडच्या स्त्रिया शिक्षण घेतात, पुरुषांच्या बरोबरीने वावरतात, तरीही त्यांच्या समाजात त्यांना कुणी त्या बिघडलेल्या आहेत असे समजत नाहीत ; उलट त्यांचा समाज प्रगतीपथावर काम करताना दिसतो , या निरीक्षणामुळे बाळशास्त्री जांभेकर, लोकहितवादी, न्यायमूर्ती रानडे, डॉक्टर भांडारकर, विष्णु शास्त्री पंडित आणि आगरकर यांच्यासारखे सुधारक स्त्रियांच्या सुधारणेसाठी प्रवृत्त झाले. परंतु, उच्चवर्णीय सुधारकांपेक्षा महात्मा ज्योतिराव फुले यांनी पुकारलेला सुधारणात्मक संप्रदाय हा अधिक मुलगामी आणि अधिक विद्रोही होता. सावित्रीबाई फुले आणि ताराबाई शिंदे या सुधारक स्त्रिया फुले सांप्रदायिक होत्या.

**शैक्षणिक चळवळ**

कोणत्याही समाजाच्या उन्नतीचा विचार करताना त्या समाजामध्ये स्त्रियांना मिळणारा मान, स्थान, शिक्षण वगैरे गोष्टी लक्षात घेणे आवश्यक असते. शिक्षण संपादन करणे हा मानवी मूलभूत हक्कापैकी महत्त्वाचा हक्क आहे. आज घटनेप्रमाणे भारतीय स्त्री ज्ञानमंदिरांची सर्व दालने खुली झाली आहेत . हा हक्क प्राप्त होण्यासाठी कोणी किती कष्ट घेतले हे पाहणे महत्त्वाचे ठरेल.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला सर्वत्र अशांतता होती. स्त्रियांचा सामाजिक दर्जा अत्यंत खालवलेला होता. स्त्रियांचे या काळातील शिक्षण म्हणजे घरात आई किंवा सासू अशा वडीलधाऱ्या स्त्रियांच्या हाताखाली काम करताना घरकाम, कौटुंबीक रिती रिवाज, व्रतवैकल्ये यांची प्रत्यक्ष माहिती मिळवणे . मोठे झाल्यावर पुराने कितने ऐकून जे ज्ञान मिळेल तेवढेच शिक्षण. बाकी शिक्षणाचा गंधही त्यांना नव्हता.

सन १९१८ मध्ये पेशवाईचा अंत झाल्यावर कंपनी सरकारने आपले धोरण बदलले व शिक्षणासाठी काही रक्कम खर्च करण्याची ठरवले. मिशनरी संस्थांनी शाळांबाबत पुढाकार घेतला. कलकत्ता फीमेल ज्युवेनाईल सोसायटीने १८२० स*** कलकत्त्याला बंगाली मुलींची शाळा जी हिंदी मुलींची पहिली शाळा, ती काढली.१८२४साली लेडी ॲमर्स्ट ह्यांनी. कलकत्ता व त्यांचा परिसर ह्यात मुलींच्या शाळा काढण्याच्या हेतूने 'सोसायटी फॉर नेटिव्ह एज्युकेशन 'नावाची संस्था काढली. त्याचवेळी मुंबई शहरात अमेरिकन मिशनरी सोसायटीने मुलींची शाळा उघडली. ती इतकी लोकप्रिय ठरली की, सन १९२९ पर्यंत निरनिराळया भागात अशा नऊ शाळा निघून त्यात ४०० मुली शिकू लागल्या. मद्रास, मुंबई,

कलकत्ता येथे मिशनरी संस्थांनी शाळा काढल्या, पण या शाळेचा अंतिम हेतू हा ख्रिस्ती धर्माचा प्रसार करण्याचा होता. मेकॉले यांच्या धोरणानुसार शिक्षणाचे माध्यम इंग्रजी ठरवले तरी देशी शाळांची आवश्यकता भासू लागली. याची सुरुवात महात्मा ज्योतिबा फुले यांनी १८४८ मध्ये केली. स्त्रियांना शिक्षण दिल्याशिवाय देश वर येणार नाही. हिंदू धर्मातील जातीभेद, अस्पृश्यता, बुरसट धर्म कल्पना करावयाच्या असतील, तर स्त्रियांचे विचार सुधारले पाहिजेत. त्यासाठी त्यांना शिक्षण दिले पाहिजे अशी महात्मा फुले यांची दृढ इच्छा होती आणि श्रद्धा पण होती. या उद्देशाने त्यांनी मुलींची पहिली शाळा पुण्यात काढली आणि तीही पण अस्पृश्य मुलींची पहिली शाळा भिडे यांच्या वाड्यात सुरू केली. लोक मताची पर्वा न करता, लोकांच्या छळाला न जुमानता त्यांनी मुलींना शाळेत घेतले. तेव्हा शिक्षिका मिळत नव्हत्या म्हणून स्वतःच्या पत्नीस सावित्रीबाई फुले यांना शिकवून तयार केले व शिक्षिकेचे काम करून घेतले. ह्या त्यांच्या कामाबद्दल समाजाने उभय जोडप्यांचे अतोनात छळ केला, पण सरकारने त्यांचा गौरव केला. राजा राममोहन रॉय व ईश्वरचंद्र विद्यासागर यांनी ब्राह्मण समाजाच्या मार्फत स्त्री शिक्षणाच्या कार्यास बंगालमध्ये सुरुवात केली. श्री दादाभाई नौरोजी, डॉक्टर भाऊ दाजी, न्यायमूर्ती रानडे यांनी तेव्हा स्त्री शिक्षणास मदत केली. अशा रीतीने आपल्या संस्कृतीचे रक्षण करण्याच्या दृष्टीने मुलींच्या खाजगी शाळा खाजगी प्रयत्न निघत होत्या. पण कंपनी सरकारने सुरुवातीला याबाबतीत काहीच प्रयत्न केले नाहीत. सरकारचे हे धोरण लॉर्ड डलहौसीने बदलले, सन १८५४ च्या खालित्यानुसार स्त्रियांच्या शिक्षणाची जबाबदारी उघडरीत्या स्वीकारली. सन १८६५ मध्ये मुलींच्या खास शाळा 23 होत्या त्या १८७१ मध्ये २१८ झाल्या व शाळेतील मुलींची संख्या ६३९ होती. ती ९१९० झाली. मिस मेरी कार्पेंटर या इंग्रज समाज कार्यकर्तीच्या प्रयत्नाने१८७० स*** पुण्यात व१८७१ मध्ये अहमदाबादला स्त्रियांसाठी ट्रेनिंग कॉलेजस काढली. पण त्यांना विद्यार्थिनीच मिळत मध्ये ट्रेनिंग कॉलेजच्या प्रवेशासाठी निश्चित शैक्षणिक लायकीची अट ठेवता आली नाही, तरी पण वर्षाला तीन शिक्षिका प्रशिक्षित होऊन बाहेर पडल्या. शिक्षिका कमी म्हणून शाळा कमी होत्या.

मुलींच्या स्वतंत्र शाळा स्थापन होऊ लागल्यावर मुलींसाठी विशेष अभ्यासक्रम असावा अशी मागणी होऊ लागली. १९ व्या शतकापर्यंत सामान्य प्रचलित मत असे होते की, मुलींना पुढील आयुष्यात नोकरी करावयाची नसून संसार करायचा आहे. तेव्हा दिलेले शिक्षण संसार उपयोगी असले पाहिजे. त्यानुसार अभ्यासक्रमात बदल झाला. पण प्रत्यक्षात आला नाही. मिशनरी संस्थांनी मुलींच्या माध्यमिक शाळा काढण्यास सुरुवात केली. काही सुतिका गृह नरसिंग यांचेही शिक्षण सुरू झाले पण उच्च शिक्षणाची सोय नव्हती.सन१८८१-८२ साली एकही स्त्री कॉलेजमध्ये शिकत नव्हती.

**समाजामधील गटांचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर झाला**

१९ व्या शतकाच्या शेवटी समाजात दोन गट पडले. एक सुधारणावादी आणि दुसरा पुरातन वादी. या गटाचा परिणाम मुलींच्या शिक्षणावर झाला.सन १८८०-८१ साली पंडिता रमाबाईच्या खटपटीने न्यायमूर्ती रानडे, डॉक्टर भंडारकर यांच्या मदतीने आर्य महिला समाज स्थापन होऊन स्त्री शिक्षणाला गती मिळाली यातून त्यांना सद्यस्थितीचे सम्यक ज्ञान मिळू लागले. रमाबाई रानडे, काशीबाई कानिटकर यांनी स्त्री शिक्षणास प्रोत्साहन दिले. याच वेळी बडोद्यालाश्री ज्ञान शाळेने शाळेत न जाणाऱ्या स्त्रियांसाठी शिक्षिका पाठवून घरोघरी ज्ञान देण्याचे सुरू केले.१८८२ साली हंटर कमिशनने स्त्री शिक्षणासाठी अनेक शिफारशी मांडल्या. यामुळे पुण्यात १८८४ मध्ये मुलींची पहिली माध्यमिक शाळा सुरू झाली. 'हाईस्कूल फॉर इंडियन गर्ल्स'या नावाने ती स्थापन होऊन हुजूरपागा या नावाने ओळखली जाऊ लागली. थोड्याच दिवसात शाळेची भरभराट झाली.

सन१८८८ मध्ये बी. ए. परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या मिस कार्नेलिया सोराबजी मुंबई विश्वविद्यालयातील पहिली पदवीधर स्त्री होती. याच्या आधी अमेरिकेत जाऊन सन१८८६ मध्ये एम. डी. पदवी मिळवण्याचे दिव्य पुण्याच्या एका आनंदीबाई जोशी यांनी केले होते.

सन१८८२ते१९०१ पर्यंतच्या कालखंडात स्त्री शिक्षणाची वाटचाल बंद गतीने झालेली दिसते.

तरी याच काळात १८८९ मध्ये पंडिता रमाबाईंनी मुंबई व पुणे येथे खास विधवा साठी 'शारदा सदन' नावाची संस्था काढली. पण त्या व काही स्त्रिया ख्रिश्चन झाल्याने हिंदू समाजाने त्यांना विरोध केला. शारदा सदन हिंदू समाजासाठी निरोपयोगी ठरल्याने हिंदू विधवांचा प्रश्न अण्णासाहेब कर्वे यांनी सोडविला.

त्यांनी १८९६ मध्ये अनाथ बालिकाश्रम नावाची संस्था काढली. ती १९०० मध्ये हिंगण्यास नेली. नंतर या संस्थेची खूप प्रगती होऊन ती लोकप्रिय झाली.
जहाल व मवाळ असे दोन गट अस्तित्वात आले. जहाल पक्षासही श्री शिक्षणाचे महत्व कळले होते.
१९०४साली लॉर्ड कर्झनच्या शैक्षणिक निवेदनात मुला मुलींचे शाळेतील प्रमाण नवास एक आहे.शेकडो२.४९ मुलीचे शाळेत जातात असे म्हटले आहे.
ही परिस्थिती सुधारण्यासाठी अधिक शिक्षिका व स्त्री तपासणीस नेमण्याची सूचना झाली. यामुळे माध्यमिक व उच्च शिक्षण वाढीस लागले. मुली शाळेत पहिल्या येऊ लागल्या. त्यांच्यात आत्मविश्वास वाढला. पदवीधर स्त्रियांनी महाराष्ट्रात व महाराष्ट्रबाहेरही माध्यमिक शाळा काढण्यास पुष्कळ मदत केली. श्रीमती रमाबाई रानडे यांनी १९०९ मध्ये श्री मलबारी या पारशी दानशूर गृहस्थाच्या विनंतीवरून मुंबईस 'सेवासदन'नावाची संस्था काढली. विवाहित स्त्रियांसाठी साक्षरता वर्ग शिवण वर्ग गायन वादन चित्र वर्ग करता करता त्यांनी ट्रेनिंग कॉलेज नर्सिंग मिडविपरीवर्ग काढून धंदे शिक्षणाची सोय केली. नंतर पुणे व इतर शहरी त्यांच्या शाखा निघाल्या.

### भारत वर्षीय महिला विद्यापीठ अस्तित्वात

सन १९१६ मध्ये भारत वर्षीय महिला विद्यापीठ अस्तित्वात आले. बोध भाषेचे स्थान इंग्रजी दुय्यम पण आवश्यक विषय, स्त्री जीवनात उपयोगी शास्त्राचा आवश्यक विषयात समावेश, बाकीची शास्त्रे, भाषा याबरोबर ललित कला विषयांना स्थान व मातृभाषेचा आवश्यक अभ्यास या पंचसूत्री आधारित अभ्यासक्रम ठरला गेला. या विद्यापीठाची खूप प्रगती झाली.दानशूर शेठ ठाकरसी यांच्या देणगीने विद्यापीठाचा पाया भक्कम झाला. आजही महिलांसाठी असलेले हे एकमेव विद्यापीठ आहे. याच्या अनेक शाखा निघाल्या.

### अखिल भारतीय महिला परिषदेचा जन्म.

मुंबई बरोबर भारतात, इतर प्रांतातही स्त्री शिक्षणासाठी खूप प्रयत्न झाले.डॉक्टर ॲनी बेझंट यांनी मुलींच्या शिक्षणासाठी खूप प्रयत्न. त्यांच्या प्रयत्नांनी सन १९२७ मध्ये अखिल भारतीय महिला परिषदेचा जन्म झाला. त्यांचे पहिले अधिवेशन पुण्यास होऊन स्त्री शिक्षणाच्या स्वरूपा संबंधी चर्चा झाली व एक शिक्षण योजना तयार केली गेली.सन१९२८ मध्ये सरकारने हर्टॉग कमिशन नेमून हिंदुस्थानातील शिक्षणाची पाहणी करून शिफारसी करण्यास सांगितले. देवी सरोजिनी नायडू यांच्या नेतृत्वाखाली एक शिष्टमंडळ पाठविण्यात आले. तेथे डॉक्टर ॲनी बेझंट, डॉक्टर मथुल लक्ष्मी रेड्डी, मिसेस पी .के. सेन, बेगम हमीद अली वगैरेंच्या साक्षी झाल्या. त्यावेळेस ज्या शिफारशी करण्यात आल्या, त्याप्रमाणे सर्व वेळ काम करणाऱ्या स्त्री शिक्षणाधिकारी नेमाव्या. स्त्री शाळा तपासणीस वाढवावे, माध्यमिक व प्राथमिक शिक्षण वाढवावे. स्त्री शिक्षकांची संख्या वाढवावी. व प्राथमिक शाळांसाठी प्रशिक्षण घेण्यास खेड्यातील स्त्रियांस उत्तेजन द्यावे वगैरे होय. यामुळे भारतातील सर्व मोठ्या व लहान शहरातून स्त्रियांच्या शैक्षणिक प्रगतीला जोरदार जालना मिळाली.

### स्त्रियांकरिता मेडिकल कॉलेज व वकील होण्याची परवानगी तसेच राजकारणात सहभागी

याच दरम्यान १९०७ साली स्त्री डॉक्टरांची संघटना, तर १९१६ मध्ये स्त्रियांकरिता दिल्ली येथे मेडिकल कॉलेज पासून पासून स्त्रियांना न्याय मंदिरात वकिलाचा पेशा करण्याची परवानगी मिळाली.स्त्रिया राजकारणात घेऊ लागल्या.

### स्वातंत्र्यानंतर स्त्री पुरुष समानता

स्वातंत्र्यानंतर राज्यघटनेने स्त्रियांना समानतेचे सर्व हक्क दिले. याचे सर्व श्रेय डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्याकडे जाते . त्यापूर्वी महात्मा गांधींनी मूलउद्योग शिक्षण पद्धती सुरू केली. त्यात स्त्रियांनाही शिक्षण होते पण ही पद्धती फार काळ चालली नाही. स्वातंत्र्यानंतर स्त्री पुरुष समानता मान्य झाल्याने शिक्षणाचा वेगळा प्रश्न राहिला नाही. स्वतःच्या कुवतीप्रमाणे इतर कोणत्याही ज्ञानशाखे प्रवेश मिळवून स्त्रिया अतिउच्च पदवी मिळू लागल्या. आता प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे झाले आहे. मुलींना पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत मिळाले आहे. स्त्रियांना शिक्षणाचे महत्त्व पटले आहे.

### स्त्रियांचा दृष्टिकोन परंपरागतच

तरीही अजून मोठ्या प्रमाणात स्त्रियांचा दृष्टिकोन परंपरागतच आहे. मुलींना फार उच्च शिक्षण देण्याकडे प्रवृत्ती दिसून येत नाही. मध्यमवर्गीय स्त्रियांमध्ये शिक्षणाचे प्रमाण अधिक दिसते. स्त्री नोकरी करू लागली व अन्य जबाबदाऱ्या पार पडू लागली. तरी ती माता गृहिणी म्हणूनच मुख्यतः दिसून येते.

१९व्या शतकाच्या उत्तरार्धात स्त्री शिक्षणाचे महत्त्व करून आले.२०व्या शतकात स्त्री शिक्षणाची प्रगती झाली. स्वातंत्र्यानंतर स्त्री शिक्षण मोफत व सक्तीचे झाले. त्यामुळे आज जवळजवळ 70 टक्के स्त्रिया शिक्षण घेत आहे.

स्त्रियांना आजही शिक्षणासाठी बाहेर पडताना अनेक सामाजिक कौटुंबिक सांस्कृतिक बंधनांना सामोरे जाऊन विचार करावा लागतो खंत आहे म्हणूनच म्हणावसे वाटते **स्त्री पुरुष समानता: स्वप्न की वास्तव.**

**संदर्भ सूची**

१) सदानांद मोरे _सुधाकर

२) रानडे रमाबाई च्या आयुष्यातील काही आठवणी, अनभुव प्रकाशन, १९२३,१८

३) लोटे या.ज. सामाजिक व्यवस्थाआणि सामाजिक परिणाम पिंपळापुरे आणि कंपनी नागपूर

४) जाधव रा ग.साहित्यआणि सामाजिक संदर्भ

५) खडपेकर विनय स्त्री प्रश्नांची चर्चा 19 शतक

६) मराठीतील स्त्री आत्मचरित्राचा सामाजिक अंगाने अभ्यास(इस १९१०ते१९९५)

# 'लक्ष्य बाधित होऊ नये म्हणून...': सामाजिक वणव्याचं जळतं वास्तव

**डॉ. विजय जाधव**
राजस्थान महाविद्यालय,वाशीम

साहित्य आणि समाज या दोहोंचं अतिशय घट्ट नातं आहे. साहित्यातच समाजवास्तव प्रतिबिंबित होत असते. प्रतिवर्षी मोठ्या प्रमाणात साहित्यविश्वात अनेक प्रकारच्या साहित्यकृतींची भर पडत असते. तरीही बरीचशी सामाजिक मूल्यं, लोकजीवनातलं दाहक वास्तव उपेक्षितच राहते. लिहिणारे हात थिटे पडतात, किंवा तिथवर जाणीवपूर्वक जायचं टाळले जाते. हा सगळा विषय समाजव्यवस्थेचा परिणाम आहे. साहित्यक्षेत्र हे सर्वव्यापी व्हावं म्हणून परिवर्तनाची कास धरणाऱ्या साहित्यिकांनी जोरकसपणे लेखन करण्याची अत्यावश्यकता आहे. हळूहळू का असेना, हीसुद्धा उणीव भरून निघत आहे.

एवढ्यातच, सुरेश येरमुले या पोलीस दलात कार्यरत असलेल्या नवोदित कवीचा 'लक्ष्य बाधित होऊ नये म्हणून...' हा कवितासंग्रह प्रकाशित झालेला आहे. खरंतर, कुणी पोलिसांतून कवी म्हणून डोकावतो हीच एक गोष्ट आश्चर्य वाटावं अशी आहे. म्हणूनच माझी उत्सुकता शिगेला पोहोचली होती. काव्य म्हणून या पुस्तकात नेमकं काय असेल? मी अगदी कवीच्या मनोगतापासून वाचायला सुरुवात केली, पूर्ण संग्रह वाचून काढला आणि अक्षरशः मी भारावून गेलो. सर्वप्रथम लक्षात घेण्यासारखी ही गोष्ट, की सुरेश येरमुले यांचा जन्म आदिवासी समाज घटकात झालेला. महापूर, दारिद्र्य, अंधश्रद्धा, शिक्षणवंचितता, व्यसनाधीनता, वेठबिगारी, ऊसतोड कामगार... म्हणजे, एकूणच वेगवेगळ्या समस्यांची वखार. ते सामान्य समजल्या जाणाऱ्या घरातच लहानाचे मोठे झाले. काही काळ कुठलासा व्यवसाय केल्यानंतर काही काळ विनाअनुदानित शिक्षक म्हणूनही त्यांनी काम केलं. त्यानंतर त्यांची पावलं पोलीस खात्यात पडली. भाकरीचा प्रश्न सुटला, एवढ्यानं ते निश्चितच समाधानी झाले नाहीत. आपल्या दारिद्र्यात खितपत पडलेल्या समाजबांधवांचं काय? त्यांच्यासाठी आपल्याला काही करता येईल?

'रोटी प्यारी खरी
आणखी काही हवं आहे
यासाठी माझं जग
एक नवीन राजमुद्रा घडवीत आहे'

नारायण सूर्व्यांच्या या प्रश्नातून ते समाजाकडं पाहू लागले. विशेष म्हणजे, असाच प्रश्न आणि चिंतनातून त्यांच्या काव्यदृष्टीला धार येत राहिली. परिणामी, 'लक्ष बाधित होऊ नये म्हणून...' हा कवितासंग्रह जन्मास आला.

दुसरं हे की, हा एक सामाजिक कवितासंग्रह आहे. सामाजिक प्रश्नांची उकल करण्याकडंच संग्रहाचा कल दिसतो. यातल्या कविता आंबेडकरी प्रेरणेच्या असून त्या वैचारिक मूल्यांशी बांधिलकी बाळगून आहेत. स्वातंत्र्य, समता, न्याय आणि बंधुता या मूल्यांना अधोरेखित करणं त्या आपलं कर्तव्य मानतात. कवी केवळ दुःखापाशीच थांबत नाही, तर त्यातून बाहेर पडण्याचा मार्गही सूचित करतो. 'उपेक्षित पीडितांनो' या कवितेतून ते म्हणतात,

'उपेक्षित पीडितांनो बघता काय, रडून रडूनच मिळेल का न्याय?'

इथं बाबासाहेबांची प्रतिमा समोर येते. अन्याय करणाऱ्यापेक्षा अन्याय सहन करणारा जास्त गुन्हेगार असतो. अन्यायाविरुद्ध पेटून उठल्याशिवाय कुणालाही न्याय मिळणार नाही. वेळीच सावध व्हावं म्हणून कवितेच्या शेवटी कवी उपाय सुचवितो,

'संविधानांचे करून वाचन घटनेची
तुम्ही कास धरा
आंबेडकरांचा नारा शिका, संघटित व्हा, संघर्ष करा
नैराश्याचे पिऊनी विष अकारण मरता काय?'

भारतीय संविधान हे जगात सर्वश्रेष्ठ आहे, तरीही या देशातला एक वर्ग संविधान मोडीत काढण्याच्या मार्गाचा अवलंब करीत आहे. ते जाणून आहेत की, लोकशाही नष्ट करण्याच्या मार्गात संविधानच आड येतेय. सर्वच समाजघटकांतल्या गोरगरिबांना केवळ संविधानाचाच आधार वाटतो. धार्मिक अध्यात्मिकतेला पुढंपुढं करून, देव ऽ देव ही

कल्पना गोरगरिबांच्या मानसिकतेत रुजवून, त्यांना पूर्णार्थानं अज्ञानी बनवून लुटण्याची षडयंत्रं राजरोसपणे सुरू आहेत. असं लक्षात आल्यामुळेच सुरेश येरमुले 'प्रेरणास्थान' या कवितेतून व्यक्त होतात,

'लक्षात ठेव,
माझं एकमेव प्रेरणास्थान
भारतीय संविधान आहे...
त्याच्याच पानापानांवर
माझं बारीक ध्यान आहे'

देशाच्या स्वातंत्र्यवयाची पंच्याहत्तरी पूर्ण झाली. पण जातीयता मेलीच नाही. तिला जिवंत ठेवण्यासाठी आटोकाट प्रयत्न होताहेत. प्रतिदिनी खुनी, बलात्कारी वाढतच आहेत आणि निरपराध्यांना कठोर शिक्षा भोगाव्या लागत आहेत. प्रत्येक बाबतीत केवळ अन्यायच अन्याय. प्रश्नांचे ढीगच्या ढीग. हे सगळं बघून येरमुले अस्वस्थ होतात आणि थेट बाबासाहेबांनाच प्रश्न विचारतात,

'बाबासाहेब,
कुठून येत असावी माणसांत
माणसांविषयी
वैरत्वाची भावना ?
आपला हा देश
पूर्ण स्वातंत्र्याची हमी
देणारच नाही का?'

वर्तमान समाज हा मृतप्राय अवस्थेत जगत आहे. सारंकाही बघतोय आणि तो सारंकाही सहन करतोय. मात्र, संस्कृतीच्या नावाखाली चालू असलेल्या धार्मिक आतंकवादाला आणि अराजकतेला कवी झिडकारतो. 'बळ' ही कविता याची साक्ष आहे.

'काळोखव्याप्त क्षितिज
त्यात येतीलच येतील
अनेकानेक संकट आडवी
आणि मारतील उड्या
लहान मोठे फटाकेही...
तरीही
चालत राहा तू
ठामपणे... अविरत
नि:संदेह
लक्ष्य बाधित होऊ नये म्हणून..'

देशात सर्वत्र आराजक माजलेलं आहे. विषमतेची तब्येत चांगलीच ठणठणीत आहे. राजरोसपणे खोटं बोलत गोरगरिबांना लुटलं जात आहे. 'आराजक' या कवितेत कवीनं मांडलेली भूमिका अर्थपूर्ण म्हणावी अशीच –

'कुणाकुणाचे देह कुपोषित
तर कुणाकुणाचं मन
कुणाकुणाला मारतात भुका
कुणाकुणाचं वाढतंय धन !'

दिनानुदिन देशात संपत्तीचं एकत्रीकरणच होताना दिसत आहे. भाकरी गोरगरिबांवर प्रेम करत नाही. ठराविक लोकांना स्वातंत्र्य मिळालं की काय असं वाटायला लागते. राजकीय नेतृत्व मात्र मजेतच आहे. आणि कार्यकर्ते देशोधडीला लागत आहेत. ते आपल्या नेत्यांसाठी सर्वकाही करतात. खुर्च्या, सतरंज्या उचलतात आणि तुरुंगांतही जातात. नेता मात्र कार्यकर्त्यांचं मोजमाप घेतो. यावर कवीनं चांगलाच प्रकाश टाकलाय –

'भाऊ मात्र चतुर
ते बागेतल्या 'शो'च्या झाडागत
पुढाऱ्याला मापतात
उंच असेल त्याला
रातोरात कापतात
मग कुणी नि कसं व्हावं लोकाभिमुख
कशा मांडाव्या समस्या आणि प्रश्न?
स्वतंत्र आणि प्रजासत्ताक दिन साजरा करावा कसा,
जिथे बोलत असतो
विकृतीचाच वसा !!'

सामान्य, सर्वसामान्य लोकांच्या पाठबळाशिवाय कुठलाच पक्ष आणि नेता मोठा होत नसतो. सभांमधून लोकांना मोठमोठी आश्वासनं दिली जातात. आमिषं दाखविली जातात. नंतर तीच नेतेमंडळी लोकांच्या अवहेलनांची त्रासदायक मालिका चालवितात. यावर लक्ष केंद्रित करून येरमुले म्हणतात,

'ही तर लोकशाही
कधीचीच कोरोनाग्रस्त झालेली...
तिच्याच आडून भयंकर हुकूमशाहीची माय व्यालेली !!'

गरिबांच्या आयुष्यावर अन्यायाचे भयंकर आसूड चालविण्यात नेते आणि अधिकारीही चांगलेच

तरबेज असतात. लुटण्यासाठीच त्यांच्याकडं कुठलीही संधी चालून आलेली असते. अशा वास्तवाच्या पार्श्वभूमीवर शिकलेल्यांनी तरी गरिबांच्या बाबतीत आस्था बाळगावी असं कवीला वाटते. पण इकडलं वातावरणही धूसरच. कवी सरळ सरळ म्हणतोय,

'शिकूनही असे कसे
तुम्ही झाले मूढ
काय आमचा गुन्हा
तुम्ही उगवला सूड!'

अगदी पूर्वकाळापासून ढोंगी साधू हे समाजातल्या भोळ्याभाबड्यांची हवी तशी प्रतारणा करत आहेत. म्हणूनच काही परिवर्तनवादी संत आणि विचारवंतांनी त्यांना वेळोवेळी फटकारलेले आहे. परंतु त्याची विषारी पिलावळं आधुनिक काळातही सळसळताना दिसतात. येरमुले यांना पोलीस खात्यात कार्यरत असल्यामुळे सातत्यानं वेगवेगळे अनुभव येतच राहतात. ह्या काही काव्यपंक्ती 'महाराजा' कवितेतल्या,

'सेवकाचे पोट मोठे
पूजन दगड गोटे
लुटतो बोलून खोटे
महाराजा'

लाखो, कोट्यवधींची संपत्ती लुटून विदेशात जाणाऱ्यांसाठी सध्या सुगीचे दिवस सुरू आहेत. त्यांना देशरक्षकांचंच पाठबळ मिळत आहे. अहिंसा, शांती अन् विकास हे शब्द केवळ भाषणांच्याच मर्यादेत अडकून पडलेत. जबाबदार असणाऱ्यांनी माणुसकी जेरबंद केली. विविध प्रकारच्या थापा मारून देश विकायला काढणाऱ्यांनी हद्द सोडली. अशांना 'गरज' या कवितेतून कवी म्हणतोय,

'आज खरंच जगाला
गरज आहे बुद्धाची
देशोधडीला लावणाऱ्या
नको त्या युद्धाची!'

प्रतिदिनी वृत्तपत्रांत खून, बलात्कार, लुटमार, आत्महत्या आणि अनेक प्रकारच्या थरारक बातम्या छापल्या जातात. प्रतिदिनी माणुसकी ही प्रश्नांकित होताना दिसते. मानवी प्रदूषणांचा परिणाम म्हणून निसर्गही बदलला. या सूचना धोकादायक. 'श्रेय' ही कविता याविषयी बरेच काही बोलून जाते,

'माणसाला नाही, इथं पैशाला किंमत
स्त्री लुटली जाते मंदिरात, केवढी हिंमत
बायको, मेहुणीसाठी सारी धावपळ
जन्मदात्यांची चेष्टा, रोजचा छळ
घातले गावोगावी धर्माधर्मांचे घाट
जातीय दंगली आणि रक्ताचे पाट'

रोजच्या वापरात आधुनिक तंत्रज्ञानाला महत्त्व आलंय, आधुनिकता लोकांशी जवळीकताच साधताना दिसते... सोबतच माणुसकीचाही क्षय होतोय. गावागावांचं झपाट्यानं शहरीकरण होत आहे. लोक शहरांकडं वळताहेत आणि माणुसकी पाठीमागं सोडताहेत. शहरांचा बहुतांश भाग सिमेंटच्या जंगलांनी व्यापलेला असतो. त्या जंगलांत वासनांधता आणि हिंसा वाढत आहे. न्यायासाठी काढलेला आवाज दाबला जात आहे. सुरेश येरमुले म्हणतात, 'जंगलातील पशु आपल्याच कळपावर करीत नाहीत कधीच हल्ला; मात्र सिमेंटच्या जंगलात जळतात लेकी, गाडतात भाऊ, मारण्या संपत्तीवर डल्ला!' आपल्या कळपातलं कोणी उपाशी असेल तर त्याची काळजी इतर पशु घेतात. माणसाचं काय?

'पशुंना
नसते चिंता उद्याची;
मात्र सिमेंटच्या जंगलात
ठेवली जाते साठवून
अवैध संपत्ती
तीही पिढ्यानपिढ्यांची !!'

म्हणूनच तर शहरांतल्या उत्तुंग इमारती कवीला आकर्षित करू शकत नाहीत. ह्या इमारती कवीला मग्रूरी अन् अहंकारानं ओथंबलेल्या वाटतात. अंगणातल्या फुलांचा सुगंध म्हणजे गटारातला दुर्गंध वाटतो. 'थडगं' या कवितेच्या समारोपावेळी कवी म्हणतो,

'खरं सांगायचं म्हणजे,
ही उत्तुंग इमारत
सुंदर, आकर्षक असं
एक थडगंच
होय, थडगं म्हणजे थडगंच !'

ग्रामीण भागात टोलेजंग इमारती नसतील, पण तिथल्या झोपड्यांत संस्कृती आणि संस्कार दिसेल. झोपडीवासीयांच्या भरवशावरच

श्रीमंतांच्या गरजा पूर्ण होतात. झोपडीतली गरीब मात्र तुटपुंज्या मिळकतीवरही चाकरी करतो ती इमानदारीनंच. इमारतीतला सावकार आणि झोपडीतला फाटका कामगार या दोहोंची 'झोपडी' या कवितेत केलेली तुलना अधिक महत्त्वपूर्ण वाटते,

'सावकारांच्या सोहळ्यात
संस्कार आणि संस्कृतीचा
कधीच बसत नाही मेळ
झोपडीचे अंगण मात्र
संस्कार, संस्कृतीसोबत
अखंड खेळते खेळ'

श्रीमंताकडं पैसा असेल, संपत्ती असेल किंवा तो टोलेजंग इमारतीत राहत असेल; परंतु तो अतिशय स्वार्थी असेल; कुणाच्याही उपयोगी पडत नसेल तर संपत्ती मूल्यहीन होऊन जाते. 'बंदे मत करना अभिमान, कोई दिन उखड जायेगा प्राण!' या संत कबिरांच्या दोह्याप्रमाणे सुरेश येरमुले म्हणतात,

'तुझा
स्वार्थ जळो की न जळो
तू मात्र एक दिवस
नक्कीच आहेस जळणार...
एवढं तुला कधी कळणार?'

माणूस या नात्यानं आपण गरज असेल त्याच्या मदतीला धावून गेलो पाहिजे. त्यातूनच फार मोठे समाधान मिळत असते. परंतु, रक्ताच्या थारोळ्यात पडलेला मनुष्यही योग्य वेळी मदत झाल्यास वाचू शकतो. मात्र तसं होताना दिसत नाही. पूर्वी मदत करणाऱ्यालाच पोलीसवाले खूप त्रास द्यायचे. आता मात्र मदत करणाऱ्याची वाहवा केली जाते. 'अपघात' या कवितेतून वास्तवाची कवींनं चांगलीच जाणीव करून दिलेली आहे,

'स्वतःला जर अपघात झाला, काय रे तू करशील?
केवळ कण्हत, विव्हळत
सांग, जाग्यावरच मरशील?'

आता तर संतापजनक लोकमानस संस्कृतीचं स्थान घेताना दिसत आहे. पूर्वी असं नव्हतंच असं नाही, पण आता त्यात अधिकच वाढ झालेली आहे. कदाचित, ते भविष्यात अधिकच विस्तारलेलं असू शकेल. ते म्हणजे, आपलेच वृद्ध आई-वडील आजच्या पिढीला नको नकोसे झालेले आहेत. म्हणूनच सगळे वृद्धाश्रम तुडुंब भरलेले आहेत. आपल्या मुलांचं संगोपन करताना आई-वडिलांना किती किती कष्ट करावे लागतात. किती किती आव्हानांना समोरं जावं लागते! निमूटपणे वेदनाही सोसाव्या लागतात. पण अशा सगळ्या गोष्टींकडं सक्षम झाल्यावर मुलं पाठ फिरवून मोकळी होतात. हे प्रकरण यातनादायक आहे. यासंदर्भात आई-वडिलांच्या शब्दात कवी म्हणतो,

'वृद्धाश्रम नको आम्हा
वृद्धापकाळात आधार दे
उगाच स्टेटस ठेवून
करतोस हॅपी मदर्स डे...'

कुणी पुढंपुढं जात असेल, उजेडपेरणी करत असेल तर, प्रथमतः त्याची अडवणूक भावकीतले लोक करतात. बाह्यशत्रूंपेक्षा चार भिंतीतले धोके हे बलाढ्य आणि अधिक खतरनाक असतात. दुसऱ्याशी लढणं तितकंसं कठीण नसते, खरी परीक्षा होत असते आपल्याशी लढताना, याविषयी कवी म्हणतो,

'निर्विवादपणे
गाठता येईल ध्येय, पण तत्पूर्वी
पहिल्या पायरीवरचा
संघर्ष टाळताच येणार नाही...
आणि लक्षात ठेव
हेच असते सर्वाधिक कठीण
कठिणातलं कठीण!'

प्रतिकूलता प्रबळ आहे म्हणून चालणं थांबवता येईल का? या प्रश्नांचं उत्तर कवी 'नाही' असंच देतो.

'तुला पुरविताहेत
बारा हत्तींचं बळ
साहित्य अन्
उफाळून येत असलेल्या
आंतरिक भावना !!'

देवावर विश्वास ठेवणाऱ्यांची संख्या फार मोठी आहे. ते समजतात की, कर्ता आणि करविताही देवच. मात्र, येरमुले हे वेगळी वाट काढतात, त्यांना प्रश्न पडतात. सर्वत्र भव्यदिव्य देवाची

मंदिरं असूनही तिथंसुद्धा का घडतात बलात्कारांच्या निंदनीय घटना? बलात्कारी पसार आणि निरपराध्यांना हातकड्या... हे वास्तव. देवापुढं नतमस्तक व्हायला ट्रकच्या ट्रक भरून लोक जातात आणि पुष्कळदा देवाच्या हद्दीतही अतिभयंकर अपघात होतात. लोक मरतात. संसार मोडतात नवदांपत्यांचे. नवस फेडायला मंदिरांकडं भक्तांची अलोट गर्दी उसळते. तिथंही चेंगराचेंगरी होते आणि देवाच्या साक्षीनं लोक मृत्यूमुखी पडतात. मग देवाची अनंत रूपे कुठं गायब होतात? देव अबोल आणि निष्क्रिय असतो हेच कवीला सहन होत नाही. तो देवालाच आरोपीच्या पिंजऱ्यात उभा करतो–

'हे देवा,  
तुझ्याच अवतीभवती चालतो  
अवैध, अमानुष व्यापार  
की तसाच असतो करार?  
भक्त लुटले जातात  
होमहवनाच्या नावाखाली  
खिसे कापले जातात  
सीसीटीव्हीच्या नजरेखाली...  
आरास फुलांची अन् राळांचा गंध  
त्यातच असतो का तू मग्न ?  
असशील अस्तित्वात तर बघच बघ  
लोकच लोकांना करताहेत नग्न !!'

आदिवासी जमात ही निसर्गावर श्रद्धा ठेवते आणि विसंबून राहते. त्यांचं पोषणही निसर्गच करतो. मुळात देवधर्म ही त्यांची श्रद्धास्थळं नव्हेत. त्यांच्यात ह्या तथाकथित गोष्टी नंतर नंतर आलेल्या आहेत. निसर्गाकडं भेदभाव नाही. तो सर्वांसाठी मोकळा असतो. त्यालाही ओरबाडण्याचे अघोरी प्रयत्न गतीशील अवस्थेत आहेत... वेगवेगळ्या प्रकारची आक्रमणं आदिवासी आणि निसर्गावर होतच आहेत. तरीही, ही जमात निसर्गनिष्ठच आहे. ह्या अधिक बोलक्या काव्यपंक्ती –

'निसर्गावर प्रेम करता करता  
त्यांनी झाडंही लावली  
उन्हातान्हाशी भांडून त्यांनी  
स्वतःच मिळवली सावली...'

सुरेश येरमुले हे स्वतः पोलीस खात्यात आहेत. आपल्याही वाट्याला वेदना येतात हे त्यांनी स्वतःच अनुभवलेलं आहे. कुठल्याही क्षणी त्यांना कर्तव्यावर जावं लागते. परिणामी, आपल्या कुटुंबाकडंही त्यांना पुरेसं लक्ष द्यायला वेळ मिळत नाही. दुसऱ्यांना सुरक्षित राहता यावं म्हणून त्यांना नेहमीच आव्हानं पेलावी लागतात. बहुतवेळा त्यांना सणोत्सव, वाढदिवस वा मंगल कार्यांना वेळ देता येत नाही. वृद्ध आईवडील औषधांविना कण्हतात. येरमुले यांनी प्रातिनिधीक स्वरूपात आपल्या व्यथा वाचकांपुढं आणल्यात,

'सणोत्सव सदा  
घराच्या बाहेर  
लग्नसराईत  
ना मान, ना आहेर  
पोरीची सोयरीक अन् नातेवाईक हटले  
म्हणून आज पोलिसांवर लिहावे वाटले'

कृषीप्रधान म्हणून ख्याती असलेल्या भारतात आजही ऐंशी टक्के लोक शेतीवरच अवलंबून आहेत. आणि मुद्दा असा की, राजकीय पक्ष आणि नेते हे शेतकऱ्यांना केवळ आकर्षक आश्वासनांवरच झुलवीत ठेवतात. शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचंही भांडवल करतात. प्रतिवर्षी हवालदिल झालेला शेतकरी वेगवेगळी स्वप्न बघतो. मुलांचं शिक्षण, मुलींची लग्नं आणि आरोग्यविषयक बरेचसे प्रश्न त्याला अस्वस्थ करतात. कधी ओला, तर कधी कोरडा दुष्काळ त्याच्यावर तुटून पडतो. कर्जदातेही त्याला कोंडीत पकडतात. शेतकरी हा हसत हसत गळफासावर प्रेम करत असेल का? 'विध्वंस' या कवितेतून येरमुले म्हणतात,

'झाले उलटे  
पालटे क्षणात  
उराची हौस  
दाबली मनात'

प्रेमाशिवाय मानवी जीवन समृद्ध होऊ शकत नाही. सुरेश येरमुले हे आपल्या भकास जीवनात कुणाचीतरी प्रतीक्षा करताना म्हणतात,

'तू बहरावं कळ्याफुलांनी  
माझ्या भकास मनवृक्षी  
मग दूरवरून येतील, प्रिये  
सुंदर सुंदर पक्षी'

प्रेमावर कवीची अढळ निष्ठा आहे. प्रेमच सर्वोच्च स्थानी असायला हवं. प्रेमानंच प्रेमाला फुलविता येते. प्रेमावर कवी अधिक भर देऊन म्हणतो,

'प्रेमानंच प्रेमाला
शिकता येते...
प्रेमानंच प्रेमाला
जिंकता येते !'

ह्याविषयीच्या संदर्भात कवीमन सकारात्मक आहे. चांगला जोडीदार मिळाला की जीवनाला बहर येतो. 'सांगावा' ही कविता त्याची साक्ष आहे.

'तू येणार असा
एक सांगावा आला...
जगण्याची देऊन ऊर्जा
प्रकाशात न्हाला!'

खूपकाही भरभरून दिलेलं आहे निसर्गानं माणसाला. विशेषतः मानवी जीवन तेवत ठेवण्याचं काम प्राणवायूच करीत आलेला आहे. दुसरीकडं, मनुष्यच मनुष्याचा शत्रू बनलेला आहे. तो जंगलं नाहीशी करायला निघालाय. सिमेंट काँक्रीटच्या जंगलात प्रदूषणानं कहर केलेला आहे. हे प्रदूषण मनुष्यापुढं नवनवी आव्हानं उभी करत आहे. माणूस स्वतः प्रदूषित झालेला आहे. हेसुद्धा कवीच्या संवेदनशीलतेतून निसटलेलं नाही–

'उन्नती, प्रगती
पैशाचा हव्यास
नयनात सृष्टीचा
हाच काय ध्यास'

स्वतः कवी येरमुले हे आदिवासी संस्कृतीचा घटक आहेत. नैसर्गिक सौंदर्यमूल्यांचा त्यांच्यावर चांगलाच प्रभाव असल्याचं अनेकानेक कवितांमधून जाणवत राहते. त्यांच्या स्वभावातही निसर्गच प्रतिबिंबित झालेला आहे. विविध पक्ष्यांची मधुर वाणी, मयूर गाणी... आणखी काय काय म्हणून सांगावं!... कवी खुल्या दिल्यानं अनलंकृत भाषेतून सांगतो –

'नाना अनुभव इथं
शब्दही कमी पडे..
डोंगरात जा, अनुभवायला
अन् घ्या नैसर्गिक धडे !'

शोषित, पीडित, उपेक्षित अशी आदिवासी जमात. नाना प्रकारच्या दुःखांनी आणि संकटांनी वेढलेली. येरमुले यांचा जन्म याच जमातीतला. त्यांच्याही वाट्याला पारंपरिक भोगवटा आलेला आहेच. तेही प्रतिकूलतेशी झुंजतच वाटचाल करत आलेले आहेत. त्यांनी कुठल्याही परिस्थितीत नामोहरम होऊन मान टाकलेली नाही. तटस्थपणे आपली अनुभवसमृद्धी ते व्यापकच करत राहिले. व्यक्त होण्यासाठी त्यांना कवितेनं आधार दिला. आणि त्यांची लेखणी पाझरत राहिली. त्यांच्याप्रमाणेच त्यांचे शब्दही प्रामाणिक असल्यामुळे त्यांची कविता वाचकाला आपली वाटते. त्यांची कविता अनेक विषयांना हात घालते. त्यांच्या वास्तवरेखाटनात नि:संदेह जिवंतपणा आहे, करुणा आहे आणि अन्यायाविरुद्ध समंजस चीडही आहे. त्यांच्या कवितेला समजण्यासाठी कृत्रिम अभूषणांची निकड वाटत नाही. साधे आणि सरळ शब्द त्यांचे स्नेहीसोबती आहेत. एवढ्याच बळावर ते काव्यप्रवासाला निघालेले कवी आहेत. ते स्वच्छ मनुष्यत्व आणि माणुसकीचा आग्रह धरणारे आग्रही कवी आहेत.

'लक्ष्य बाधित होऊ नये म्हणून...' हा त्यांचा पहिलाच कवितासंग्रह. त्यामुळे काहीशा नवखेपणाच्याही खुणा दिसतात; परंतु त्या गंभीर म्हणाव्या अशा निश्चितच नाहीत.

कविता म्हणजे केवळ शब्दांची गुंफण नव्हे, तर त्यात भाषिक सौंदर्यही महत्त्वाचं असते. त्यातही ते बहुतांशी यशस्वी होताना दिसतात. एकूणच, त्यांचा हा संग्रह समाजोपयोगी आहे असं म्हटलं तरी वावगं ठरणार नाही. प्रा. नंदू वानखडे यांनी अर्थपूर्ण मुखपृष्ठ आणि यथोचित रेखाटनं दिल्यामुळे संग्रहाला अधिकच अर्थ प्राप्त झालेला आहे. महाराष्ट्रातील ख्यातनाम विचारवंत, साहित्यिक मा. विलास अंभोरे यांनी पाठराखण करून संग्रहाची उंची वाढविलीय.

प्रस्तुत कवितासंग्रह हा वाचकांच्या संग्रही असावा असाच आहे. त्यामुळे मराठी भाषिकांकडून या संग्रहाचं नि:संदेश स्वागतच होईल असं म्हणायला भरपूर वाव आहे.

# स्त्री सक्षमीकरणाची वाटचाल आणि अडथळे

**डॉ. प्रमोद ल. धनविजय**
रा. आ. महाविद्यालय, वाशीम

भारतीय समाज संस्कृतीचा ओघ सहस्त्रावधिपासून वाहतो. स्त्री आणि पुरुष या दोन मानवी जातिंमिळून भारतीय समाज संस्कृतिची घडण झालेली दिसून येते. भारतीय समाज संस्कृतिची घडण प्रामुख्याने वैदिक काळात म्हणजे ऋग्वेदकाळात झाली असे लक्षात येते, पण वैदिककाळापूर्वीही भारतात सुसंस्कृत समाज सिंधूसंस्कृतीत अस्तित्वात असल्याचे अनेक पुरावे मिळतात.

भारतीय समाजात स्त्री आणि पुरुष हे दोन महत्त्वाचे घटक; पण कालप्रवाहात या दोन घटकातील 'स्त्री' हा घटक अतिशय दुर्बल झालेला दिसून येतो. म्हणूनच वर्तमानकाळात स्त्रियांच्या सबलीकरणाच्या बाबतीत अधिक चर्चा होताना दिसते. स्त्रियांच्या सबलीकरणाच्या दृष्टिने विविध उपाययोजना करून तिला पुरुषाच्या बरोबरीने उन्नत करण्याचे समाज आणि शासनस्तरावर प्रयत्न चाललेले आहेत. हे प्रयत्न होणे अतिशय महत्त्वाचेही आहे; कारण समाज आणि राष्ट्रोन्नतीसाठी 'स्त्री' आणि 'पुरुष' सक्षम असण्याची आवश्यकता आहे. हा समाजरथ पुढे न्यायचा तर त्याची दोन्ही चाके समान क्षमतेची असायला पाहिजे. तसे न झाल्यास एक चाक जर मध्येच निखळून खचत असेल तर हा समाजरथ पुढे जाणार नाही. ही बाब आधुनिक काळात अनेक समाजहितैषी समाजपुरुषांच्या लक्षात आल्यानंतर स्त्री सबलीकरणाच्या प्रक्रियेने वेग घेतलेला दिसून येतो.

वास्तविक प्राचीन भारताचा आणि वैदिक काळाचा धांडोळा घेताना असे दिसून येते की, ऋग्वेदकाळात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क होते. स्त्रियांप्रति समाजात आदराची, गौरवाची भावना होती. 'वधू', 'स्त्री' साठी कित्येक शब्द प्रशंसापर होते. ऋग्वेदातील १० व्या सुक्तामध्ये ८५ व्या श्लोकामध्ये 'दम्पती', 'गृहपत्नी', 'सम्राज्ञी' अशा शब्दांनी स्त्रीचा गौरव केलेला दिसून येतो. ऋग्वेदातील पहिल्या सुक्तामधील ७३ व्या श्लोकामध्ये 'अनवद्या' म्हणजे पवित्र स्त्री, ऋताचितनारी, जाया, जायदेस्तम म्हणजे जाया हेच खरे घर होय. 'जाया' म्हणजे 'स्त्री' असे म्हटलेले आहे. काही ठिकाणी स्त्रीजातीची निंदाही केलेली दिसून येत असली तरी वैदिक काळातील ऋग्वेदात स्त्रिला महत्तम स्थान होते हे लक्षात येते. पण ऋग्वेदनंतर चार वर्णात मनुष्य जात विभागल्याने स्त्रियांना गौण दर्जा, दुय्यम वागणूक द्यायला आरंभ झाला.

'आर्य संस्कृती' या ग्रंथाचे लेखक स्त्रियाबाबतीतील वैदिकोत्तर काळातील शास्त्रकारांची मते उधृत करताना लिहितात.

"स्त्रिया विद्युताप्रमाणे आहेत. त्या थोड्या उघड्या पडल्या की, घातूक होतात. निर्बंधांनीच त्या अधिक लोकोपोकारक ठरतात." यापुढे जाऊन आर्य संस्कृती या ग्रंथात प्राचीन शास्त्रकारांच्या मताचा हवाला देत लेखक लिहितात.

"पुस्तक, वनिता, वित्त परहत्ते गतं गतं।
यदि चेत्पुनरायति नष्टं भ्रष्टं च खंण्डितम ॥

याचा अर्थ असा की, पुस्तक, वनिता म्हणजे स्त्री आणि वित्त म्हणजे संपदा दुसऱ्याच्या हाती गेले तर पुन्हा: तशाच स्थितीत परत येणे दुरापास्तच, म्हणून परोपरीने 'स्त्री'चे रक्षण करावे. कारण जगात जोवर स्त्री जात भोगण्यासाठी आहे ही कल्पना आहे; तोवर तिचे रक्षण कुठेही करावेच लागेल. वरील श्लोकाचा अर्थ पाहता स्त्री ही निसर्गतः दुर्बल आहे; कारण निसर्गाचे अनमोल देणे 'मातृत्व' तिला लाभलेले असल्याने तिच्या हृदयात वात्सल्य, करुणा, प्रेम या भावना नित्य वसत असतात. म्हणून ती मनाने दुर्बल असते असे मानले तरी सर्वथा तिला गुलाम करणे हे मानवी पातळीवर विचार करणाराला मान्य होणार नाही. मनुस्मृतीचे स्त्रियांच्या रक्षणाच्या बाबतीतील मत आणखी लक्षणीय आहे.

"स्वां प्रसूती चरित्रं च कुलमात्मानमेव च ।
स्वं च धर्म प्रयत्नेन जाय रक्षन्हि रक्षति।

स्त्रीच्या रक्षणामुळे शुद्ध संतती जन्माला येईल. संतती शुद्ध असेल तर उज्वल पवित्र जीवनाचे, स्वकुलाचे, आपले, आपल्या धर्माचे, कर्तव्य कर्माचेही रक्षण होते.

यापुढे जाऊन मनुस्मृती स्त्रियांच्या दास्याच्या बाबतीत अतिशय मजबूत मधुर मेख मारते ती अशी–

"सुक्ष्मेभ्योपि प्रसंगेभ्यो स्त्रियो रक्षा विशेषत:
व्दयोंहि कुलयो: शोकमावहेयुररक्षिता"

याचा अर्थ काही अंशी पटण्यासारखा असला तरी म्हणजे कुसंग व दु:शील यांचा अल्पसाही संबंध येऊ नये म्हणून बाल्यावस्थेपासूनच स्त्रियांचे रक्षण करावे. पुढील श्लोक तर अतिशय प्रसिद्ध आहे. मनुस्मृतिचे समर्थक या श्लोकाचा अर्थ सांगताना अतिशय उदात्तता रसिकांच्या कानामनात जागृत करतात.

"पिता रक्षति कौमार्य, भर्ता रक्षती योवने। रक्षन्ति स्थविर पुत्रा:
न स्त्री स्वातंत्र्यमर्हती"

कुमारी वयात पित्याने, तारुण्यात पतिने आणि वृद्धापकाळात पुत्राने स्त्रीयांचे रक्षण करावे पण स्त्रियांना कदापिही स्वातंत्र्य देऊ नये. याशिवाय स्त्रियांच्या जबाबदाऱ्यांच्या बाबतीत मनुस्मृती मार्गदर्शन करताना असे सांगते.

"गृहिणी गृहमुच्चते। अर्थस्य संग्रहे चैनां व्यये चैव नियोजयेत शौचे धर्मेऽन्नपक्त्यां च परिणामास्य वेक्षये"

**अर्थात-** धनधान्याचा संग्रह, विनियोग, धान्य निवडणे, झाडलोट करून घर आणि परिसर स्वच्छ ठेवणे, सडासंमार्जन करणे, सारवणे, रांगोळ्यादिकांनी घर सजवणे हे गृहकृत्य करावे, स्नानपानास पाणी आणणे, धर्मकार्यार्थ सहकारी होणे, स्वयंपाक करणे, वाढणे, दळण-कांडण करणे, मुलांचे संगोपन करणे, घरातील सर्व जबाबदाऱ्या घेऊन काय हवे, नको ते पाहणे, पतिला सूचना देणे, भांड्याकुंड्याचे रक्षण करणे, म्हणजे चूल आणि मूल ही गृहकृत्य सांभाळून स्त्रिने आपली उन्नती साधावी. त्यासाठीच परमात्म्याने स्त्री, स्त्रीदेह आणि स्त्रीदेह स्वभाव निर्माण केलेला आहे. याज्ञवलक्यस्मृती तर स्त्रियांच्या संदर्भात अतिशय अनुद्गार काढताना दिसते-

"कामनाम्ना किरातेन विकीर्णा मुग्धचेतस:। नार्यो नरविहंङगनामङ्बंधन वागुरा:
जन्मपलवलमात्स्यनां चित्तकर्दमवरिणम । पुंसां दुर्वासनारज्जूनारी बादिशापिण्डिला॥१२॥

अर्थात: एक जीवनमुक्त सोडून सामान्यतः सर्व नरपक्ष्यांना आपल्या आहारी पाडावे म्हणून नारी नावाचे जाळे काम नावाच्या पारध्याने भूमीवर पसरून ठेवले आहे. जन्मजलाशयात वावरणाऱ्या चित्तकर्दमातल्या नरमीनांना आपल्या आहारी पाडण्याकरिता दुर्वासनेच्या दोरीला नारी नावाचे आमिष बांधून काम कोळी वाट पाहतो.

पुढे अवधूतगीता स्त्री म्हणजे चौथी दारू जिला प्रमदा असे नाव आहे. गोडी, माध्वी आणि पौष्टी या दारूच्या तीन प्रकाराशिवाय प्रमदा ही चौथी दारूच होय असे सांगते.

नारद स्मृतीत दृष्टिक्षेपाने अथवा केवळ दर्शनानेच आपले विष भिन्न विषारी जालीम विषाची एखादी सर्पाची जात असल्याप्रमाणे ही स्त्रीजात आहे. अशा या दृष्टीविषारी नारीच्या सहवासापासून, दर्शनापासून, स्पर्शापासून समाजाने दूर राहावे. अशा प्रकारे प्राचीन काळापासून ते पेशवाईच्या अस्तापर्यंत स्त्रियांच्या बाबतीत धर्म, संस्कृती, समाज आणि साहित्याने देखिल भ्रममूलक लेखन आणि विचार प्रस्तुत करून पुरुषी संस्कृतीचे उदात्तीकरण केलेले दिसून येते. परिणामत: स्त्री भारतीय संस्कृतीत दुर्बल राहिली. आपण आजही स्त्री सबलीकरणाविषयी कितीही कंठशोष करीत असलो तरीही भारतीय समाजाची स्त्रीविषयक धारणा दृढ झालेली आहे. ती तसूभरही हलतांना दिसत नाही. परंतु प्राचीन काळातील स्त्रियांच्या अधोगतीची पाने चाळतांना आपल्या असेही लक्षात येते की, इसवीसनाच्या पाचशे वर्षांपूर्वी उदय पावलेल्या बौद्ध धर्माने मात्र स्त्रियांच्या बाबतीत पाशवी असलेल्या धर्मरुढी, कल्पना आणि संस्कृतीला सुरुंग लावला. प्रथमच आपल्या धर्मात परिव्रज्या घेण्यासाठी बुद्धाने स्त्रियांना स्वातंत्र्य दिले. त्यामुळे सिद्धार्थ गौतमाच्या आईप्रमाणेच, बुद्धाची पत्नी, मावशी व इतर हजारो स्त्रियाही बौद्ध धर्मात पट्टशिष्या बनून स्त्रियांच्या गुलामीची कोंडी फोडलेली दिसून येते. बुद्धाने स्त्रियांना पुरुषांप्रमाणे आत्मज्ञानाची संधी उपलब्ध करून दिल्याने तत्कालीन परिस्थितीत त्यांचा दर्जा सुधारला असे दिसून येते.

बौद्धकाळात बुद्धाने स्त्रियांना भिक्षुनी बनण्याचे स्वातंत्र्य देऊन आत्मोन्नतीचा मार्ग प्रशस्त केला. स्त्री-पुरुष असा लिंगभेद न ठेवता स्त्रियांना प्रतिष्ठा मिळवून दिली. कोणतीही स्त्री आपल्या बुद्धीचातुर्याने स्थविर बनू शकत होती. ती व्यवहार कुशल बनत होती. विवाहित- अविवाहित, विधवा आणि वेश्यावृत्ती करणाऱ्या स्त्रियांना सुद्धा बुद्धाने आत्मोन्नतीचा मार्ग खुला केला.

बुद्ध स्त्रीला सप्तसंपदेपैकी एक मानत असत. उदा. रथ, हत्ती, घोडे, रत्न, स्त्रिया, पुरुष आणि गृह ह्या सात संपदा होत. यापैकी स्त्रीसुद्धा एक संपदा होय. अशा या संपदा असलेल्या स्त्रीच्या उदरातून चक्रवर्ती सम्राट देखील जन्म घेतात, स्त्री या जगातील महान विभूती आहे. स्त्रीच्या उदरातूनच महान शासक अथवा बोधिसत्व जन्म घेतात. यावरून स्त्रियांप्रती

बौद्ध धर्मात अतिशय आदराची आणि समानतेची भावना होती असे दिसून येते.

परंतु पुढे भूदेवांनी श्रौत, स्मार्त धर्माचे समाजावर दृढ असे संस्कार केल्याने स्त्रियांची प्रतिष्ठा हळूहळू लयास जाऊ लागली. अशात बौद्ध धर्मात ईश्वरभक्ती नसल्याने उपरोक्त संस्कारामुळे समाज आणि स्त्रिया देखील शैव व वैष्णव संप्रदायाकडे वळून स्त्रियांचे धार्मिक व व्यवहारिक, अध्यात्मिक स्वातंत्र्य धोक्यात आले. असे म्हणता येईल की, प्राचीन वर्णाश्रम धर्मावर तथागत बुद्धाच्या विचारांनी काही काळ जय मिळविला पण कूट-कपटी नितीच्या वैदिक धर्माने हा विजय क्षणभंगुर ठरवला. पुढेही कुट-कपटी निती बुद्धाच्या धर्मामध्ये शिरूर तेथेही त्यांनी भिक्षू-भिक्षुणीमध्ये अनाचार माजवला व या अनाचाराचा फायदा घेऊन शंकराचार्य सारख्यांनी स्वतःला विद्वान घोषित करून बौद्ध तत्त्वज्ञानाचा ऱ्हास केला आणि स्त्री पुन्हा प्राचीन धर्मातील कर्मकांडाची बळी ठरली. शंकराचार्यप्रणित वैदिक धर्माने पुन्हा स्त्रीला गुलाम केले. ही गुलामी अनेक प्रकारची होती. अनेक बंधने स्त्रीवर लादली होती. उदा. नियोगपद्धती, पुनर्विवाहाचा अधिकार काढून घेतली, स्त्री शिक्षणाची दुरावस्था केली. बालविवाह पद्धती रूढ केली. धर्म कार्यास बंदी घातली. कर्मकांडाचा सुळसुळाट करून स्त्रीला अनाधिकारी ठरविले. सतीची पद्धती सुरू केली. बालाजरठ विवाह, बहुपत्निकत्व, पडदापद्धती अशा अनेक बेड्यांमध्ये स्त्रिला वैदिक आणि वैदिकोत्तर धर्माने बंदिस्त केलेले दिसून येते.

**मध्ययुगीन स्त्री :**

या काळात वेदाधिकारास नकार, शूद्र म्हणून स्त्रीची अवहेलना, जी स्त्री वेदसूक्ते रचत होती, ब्रह्मवादिनी म्हणून जिची ओळख होती ती या काळात भोगदासी बनली. या काळात पुरुषाने आई, बहीण, मुलगी यांच्यापासून सावध असावे, स्त्री ही केवळ दुर्गुणांची खाण आहे. अशा स्त्रीवर नेहमी कोणीतरी दडपण ठेवावे हे सांगितले जाऊ लागले.

पद्मपुराणात स्त्रीला अनेकविषयासक्त म्हटले. तर ही अशी स्त्रीची विटंबना मध्ययुगात झालेली दिसून येते. मुसलमानी अंमलकाळात तर हिंदू स्त्री, हिंदू मुली मुसलमानांच्या जनान खान्यातील बोगदाशी बनल्या. या काळात स्त्रियांच्या सामाजिक जीवनाला प्रचंड अवखळा आलेली दिसून येते. हिंदू स्त्रीमध्ये गोषापद्धती याच काळात आली कारण तिला उघड माथ्याने या काळात वावरणे कठीण होते.

**शिवकाळ :** मात्र स्त्रियांच्या बाबतीत प्रचंड उदार मनाचा दिसून येतो. या काळात कौटुंबिक, सामाजिक जीवनात धैर्याने पुढे येणाऱ्या स्त्रिया दिसतात.

**पेशवे काळ :** पेशवे काळात स्त्री जीवन अगतिक झालेले दिसून येते. शिक्षणावर बंदी असल्यामुळे स्त्रिया मानसिकदृष्ट्याही अविकसित राहिल्या. बंदिस्त जीवन जगणे नशिबी आले. वेदाध्ययन, धार्मिक संस्कार, ज्ञान या गोष्टीचा स्त्रीला वाराही लागू दिला जात नव्हता. याच काळात बालविवाह, बालजरठविवाह सर्रास झाले. सतीची चाल याच काळात प्रचंड प्रमाणात वाढली.

**आंग्ल काळ :** एकीकडे गाईला माता पण स्त्रियांना पशु मानणारी पूर्वापार चालत आलेली भारतीय परंपरा इंग्रजांच्या काळात गतप्रभ होऊ लागली. याला कारण इंग्रजांच्या आगमनाने पाश्चात्य विद्येचा प्रभाव होय. या प्रभावाने नवविचार, नवजाणीवा भारतीय समाजात रुळू लागल्याने स्त्रीलाही शिक्षणाची व्दारे काहीप्रमाणात खुली झाली आणि अनेक चळवळीत स्त्रियांचा सहभाग दिसू लागला. याच काळात राजा राममोहन रॉय, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले यासारख्या महापुरुषांनी स्त्री शिक्षण आणि स्त्री परवशतेच्या विरोधात पाऊल उचलून स्त्री जीवनात मोठे परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न केला.

**आधुनिक भारतीय स्त्री जीवन :**

पाश्चात्य विद्येच्या परिणामाने भारतीय स्त्रीजीवनामध्ये अमलाग्र परिवर्तन घडून आलेले दिसून येते. पाश्चात्यांच्या भारतीय समाज जीवनातील शिक्षण आणि सुधारणावादी विचारांमुळेच एका मोठ्या युगपरिवर्तनाचा आरंभ झाला. पाश्चात्यांच्या शिक्षणामुळे जुनाट रूढी बंधनात अडकून पडलेल्या प्रस्थापित समाजाला देखील दृष्टी आली. त्यांना सामाजिक जातीभेद, अस्पृश्यता आणि स्त्रियांची अवनात दशा, त्यांचे अज्ञान आणि स्व-मधील स्वदेशाभिमानाची उणीव लक्षात आली व या बाबींच्या मुळाशी असलेल्या कारणांची जाणीव झाली. पाश्चात्य शिक्षणाने परंपरागत कर्मठ विचारांना छेद देऊन नव्या युगाची नवी दिशा दिली. यातूनच नव्या समाज क्रांतीची बीजे समाजमनात रुजायला सुरुवात झाली. जातिभेद, वर्णभेद भारताने

टाकून देऊन स्त्री-पुरुष समानता निर्मिली पाहिजे असे विचार प्रथमच वर्णश्रेष्ठत्ववादी समाजातील शिक्षित मंडळींच्या मनात घोळू लागले. यामध्ये राजा राममोहन रॉय, पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर, दयानंद सरस्वती, लोकहितवादी, महादेव गोविंद रानडे, गो. ग. आगरकर, महात्मा ज्योतिबा फुले, महर्षी कर्वे या सारखे समाज सुधारक समाजोन्नतीसाठी पुढे सरसावले व त्यांनी भारतीय रुढी, परंपरा आणि अनिष्ट चालीरीतींवर हल्ले चढविले.

या महापुरुषांनी बालविवाह, विधवाविवाहनिषेध, सतीपद्धती, पडदापद्धती अशा अनिष्ट प्रथांचे निर्दालन केले. त्यांच्या महत्प्रयासांनी स्त्री शिक्षणाचे पर्व सुरू होऊन आज करोडो स्त्रिया अनेक क्षेत्रात कार्यरत आहेत. या संदर्भात पंडित महादेवशास्त्री जोशी भारतीय संस्कृतीकोशात लिहितात, "कित्येक स्त्रिया अर्थोपार्जनक्षमही झाल्या आहेत. सुशिक्षित हिंदू समाजातून बालविवाह नाहिसा झाला आहे. विधवा विवाहही बरेच होऊ लागले आहेत. स्त्रियांना बरेचसे आचारस्वातंत्र्य मिळाले आहे. स्त्रियांना मतदानाचा हक्कही मिळाला आहे."

यावरून असे लक्षात येते की, इंग्रजी विद्येमुळे स्त्रीजीवन पालटले. तिला तिच्या अस्तित्वाची आणि अस्मितेची जाणीव झाली. ती सुशिक्षित होऊन नोकरीच्या निमित्ताने उंबऱ्याबाहेर पडली आणि सभासंमेलनातून तिचा सहभाग वाढला तसेच स्वातंत्र्य संग्रामात देखील ती पुढे आली. राष्ट्रभक्तीने भारलेल्या नवसमाजरचनेत तिची मोलाची मदत झाली. यामुळेच महात्मा गांधीसारख्या दृष्ट्या पुरुषाच्याही लक्षात आले की, एखादी अपूर्व कामगिरी जर स्त्रियांकडे सोपवली तर ती पार पाडण्याचे सामर्थ्य स्त्रियांच्या अंगी आहे. या संदर्भात मद्रासच्या प्रसिद्ध कार्यकर्त्या डॉ. मुथुलक्ष्मींनी महात्मा गांधींना पत्र लिहून हजारो वर्षे गुलाम असलेल्या भारतीय स्त्रीसंदर्भात आपले मत प्रगट केले आहे. त्या म्हणतात, " जो देश आपल्या स्त्रियांना सन्मानाने वागवीत नाही तो देश केव्हाही मोठा झालेला नाही व होणारही नाही. रुढीच्या कचाट्यात सापडल्यामुळे स्त्रियांची सर्वांगीण अशी आरोग्यसंपन्नता खुंटली आहे."

**स्वातंत्र्योत्तर कालीन स्त्री :**

स्वातंत्र्योत्तर कालीन स्त्रियांच्या प्रगतीचा विचार केला तर त्यांच्या प्रगती मागे स्वातंत्र्यपूर्व काळाची पार्श्वभूमी आहे हे विसरता येत नाही. स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीत या स्त्रियांनी जुन्या बुरसटलेल्या चालीरीतींना तिलांजली देऊन आपल्या देशाच्या विकासासाठी व समृद्धीसाठी अथक प्रयत्न केलेले आहेत. याचे मूर्तीमंत उदाहरण सरोजिनीदेवी नायडू या आहेत. १९१७ साली कलकत्ता येथे भाषण करताना त्या म्हणतात, " मी एकच स्त्री अशी आहे की, जिला तुम्हा सर्वांना असं म्हणावसं वाटतं, ज्यावेळी तुमचा अपमान होईल, ज्यावेळी अंधारातून जातेवेळी प्रकाशाची गरज तुम्हाला भासेल, ज्यावेळी तुमच्या हातातील पडते निशान सावरण्यासाठी खंबीर हाताची जरुरी लागेल आणि जेव्हा तुम्ही सत्याच्या रक्षणासाठी आपला देह खाली ठेवाल त्यावेळी हिंदुस्थानच्या स्त्रिया तुमच्या समवेत राहतील. त्या तुमचे निशाण आकाशात उंच फडकवत ठेवतील आणि तुमच्या जागी आपली शक्तीपणाला लावल्या विना राहणार नाहीत."

हे अभिवचन जणू श्रीमती सरोजिनी नायडू यांनी महात्मा गांधींना दिले होते. स्वातंत्र्यानंतरही स्त्री शिक्षणाच्या बाबतीत समाजाची बरीचशी उदासिनता दिसून येते. शहरी भागात स्त्री शिक्षणाला बरा प्रतिसाद मिळत असला तरी ग्रामीण भागात मात्र कायम उदासिनता दिसून येत होती. त्यातही ग्रामीण भागातील जातीभेद हा स्त्री शिक्षणामधील मोठा अडसर होता. त्यामुळे बहुसंख्येने ग्रामीण स्त्री शिक्षणापासून वंचित राहिलेली दिसून येते.

आज स्त्रिशिक्षणाचे, स्त्रियांच्या प्रगतीचे प्रमाण बरेच वाढलेले दिसून येत असले तरी अजूनही स्त्री उच्चविद्याविभूषित होऊनही जातीयकोषातून, उच्चवर्णीय अहंगंडातून बाहेर पडू इच्छित नाहीत. एकाच कार्यालयामध्ये भिन्न जातीवर्णातील स्त्रिया एकाच हुद्द्यावर काम करीत असतील तर तेथेही बहुजन, गिरिजन किंवा खालच्या जातीतील स्त्रियांकडे पाण्याचा दृष्टिकोन तुच्छ आहे. भारतीय स्त्री शिकली त्यामधील नगण्य स्त्री समाज मानवतावादी दृष्टीकोण जपत स्त्री समानता, जाती समानता जपण्याचा प्रयत्न करतात परंतु बहुसंख्येने उच्चवर्णीय स्त्री आजही जुन्या बुरसटलेल्या मानसिकतेतून बाहेर पडू इच्छित नाहीत. जुन्याच अधर्मी धर्मग्रंथातील श्लोकांचे उदात्तिकरण करीत प्राचीन समाजव्यवस्था, जातीव्यवस्था, वर्णव्यवस्था कशी महान होती, प्रचलित समाजव्यवस्था कशी टाकावू आहे. समग्र भारतीय स्त्रीसमाजाला एका सूत्रात बांधणारे हिंदू कोडबिल असो किंवा स्त्री उद्धारार्थ झटणाऱ्या बहुजन

समाजातील समाजसेविका याबद्दल अत्यंत खालच्या प्रतिचे अनुद्गार काढताना लक्षात येते.

एकूण भारतीय समाजाची आजवरची प्रगती पाहता स्त्रीजिवनात जे असंख्य प्रश्न आहेत ते त्यातील बहुसंख्य प्रश्न कायम आहेत. हे प्रश्न कायम राहावेत अशी आजही सुशिक्षित, उच्चशिक्षित उच्चभ्रू स्त्रीची इच्छा दिसून येते. जोपर्यंत जातीवर्णाच्या कोषातून उच्चवर्णीय स्त्री बाहेर पडणार नाही तोवर भारतीय स्त्री खऱ्या अर्थाने सशक्त होणार नाही. स्त्री जीवनात खऱ्या अर्थाने क्रांती होणार नाही. मग ती वैज्ञानिक क्षेत्रात काम करो अथवा चंद्रयान ३ मध्ये. जोपर्यंत ती प्राचीन धर्मग्रंथातील बुरसटलेली मानसिकता टाकून देत नाही तोवर तिचा विकास नाही.

**निष्कर्ष**

१. वैदिक काळातील स्त्री आजच्या इतकी मानसिक आणि शारिरीकदृष्ट्या गुलाम नव्हती. तिला पुरुषांच्या बरोबरीने सन्मान होता.

२. वैदिक काळानंतर शास्त्रग्रंथांच्या काळात स्त्रियांवर विविध प्रकारची बंधने लादण्यात येऊन त्यांना पुरुषांच्या तुलनेत दुय्यम दर्जा देण्यात आला.

३. मनुस्मृतिसारख्या ग्रंथांनीतर स्त्रीजीवनाचे अतिशय अध:पतन केलेले दिसून येते.

४. याज्ञवल्क्य स्मृती, नाराज स्मृती, मनुस्मृती, अथर्ववेद अशाप्रकारच्या अनेक शास्त्रग्रंथातून स्त्रियांच्या गुलामीची बीजपेरणी केलेली दिसून येते.

५. बौद्ध काळात स्त्रिला पुन्हा एकदा सन्मानाची वागणूक देण्यात येऊ लागली. बुद्ध स्त्रीयांना सप्तसंपदेपैकी एक मानून त्यांचा आदर करीत.

६. श्रौत, स्मार्त अशा तत्त्वांनी तत्कालीन भारतीय समाजजीवनावर दृढ संस्कार करीत स्त्रीजीवनाची दुर्दशा केली त्यामुळे स्त्रियांची धार्मिक, अध्यात्मिक आणि व्यवहारिक जीवनात अधोगती झाली.

७. मध्ययुगीन काळात स्त्रिला वेदाधिकारास नकार देऊन त्यांची शूद्र वर्णनात गणना करण्यात आली. पद्मपुराणासारख्या ग्रंथांनी स्त्रीला अतिविषयासक्त म्हणून विटंबना केली.

८. मुसलमानी अमलात तर भारतीय स्त्रीला बोगदासी बनवून त्यांच्यावरही गोषा पद्धती लादली. त्यांना मुक्तपणे वावरण्यास बंदी घातली.

९. शिवकाळात मात्र स्त्रियांच्या बाबतीत आदराची भावना निर्माण केली गेली. त्यामुळे अनेक स्त्रिया धैर्याने पुढे आलेल्या दिसून येतात.

१०. पेशवे काळात महाराष्ट्रीयन स्त्रीजीवन प्रचंड अगतिक झालेले दिसून येते. समग्र स्त्रियांच्या शिक्षणावर पुन्हा एकदा बंदी घालून त्यांना गुलाम बनविले गेले आणि बालविवाह, बालजरठ विवाह, सतीची चाल या सारख्या अनिष्ठ बाबींना उधाण आलेले दिसून येते.

११. इंग्रजी काळात पाश्चात्य शिक्षणाने भारतीय समाज जागा होऊन स्त्रियांच्या शिक्षणाची वाट मोकळी झाली, स्त्रीजीवनात मोठे परिवर्तन झाले.

१२. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संविधानाने, हिंदू कोडबिलसारख्या कायद्याने स्त्रीजीवनाचे सोने झाले आणि सर्व क्षेत्रात भारतीय स्त्री पुढे येऊन ती प्रगतीची निरनिराळी क्षेत्रे व्यापताना दिसते.

१३. स्वातंत्र्यानंतरच्या काळात स्त्री बौद्धीक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिकदृष्ट्या जेवढी पुढारली तेवढीच त्यातील बहुसंख्य उच्चवर्णिय स्त्रीची मानसिकता प्रतिगामीत्वाकडे झुकलेली दिसते. ती इतर समाजातून शिकून पुढे आलेल्या स्त्रियांना समानतेची वागणूक, दर्जा द्यायला तयार नाही. बहुजन समाजातील स्त्रीला तुच्छ लेखण्याचा प्रयत्नही करताना दिसून येते.

**संदर्भसूची**

१. आर्य संस्कृती : परमहंस परिव्राजकाचार्य भगवान श्रीधर स्वामी प्रकाशन आनंद मुद्रणालय, पुणे. द्वितीय आवृत्ती १९०५

२. मनुस्मृति : कुल्लूकभट्टविरचित
डॉ. राकेश शास्त्री, विद्यानिधी प्रकाशन, दिल्ली २००५

३. भारतीय संस्कृती कोष खंड ५: पं. महादेवशास्त्री जोशी भारतीय संस्कृती कोष मंडळ ४१०, शनिवार पेठ, पुणे २, १९६८

४. मराठी विश्वकोश खंड १० तर्कतीर्थ
लक्ष्मणशास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती, मुंबई १९८२

# राजकारणात महिलांचा सहभाग

**डॉ. पुरुषोत्तम वानखडे**
राजस्थान आर्य महाविद्यालय, वाशीम

**प्रस्तावना**

भारतीय राजकारणात महिलांच्या प्रतिनिधित्वाला अजून बराच पल्ला गाठायचा आहे. २०२३ मध्ये पाच राज्यांच्या निवडणुका आणि २०२४ मध्ये होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांसाठी आपण तयारी करत असतांना, आपण महिलांना राजकीय प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. मताधिकारापासून ते आधुनिक स्त्रीवादापर्यंत, महिला आणि पुरुषांनी महिलांच्या मतदानाकरिता आणि पदावर राहण्याच्या अधिकारासाठी दीर्घ आणि कठोर संघर्ष केला आहे. २०१५ पर्यंत जगातील प्रत्येक देशातील महिलांना मतदानाचा अधिकार आहे. महिलांना मताधिकार देणारे पहिले राष्ट्र १८९३ मध्ये 'न्यूझीलंड' होते आणि शेवटचा देश २०१५ मध्ये 'सौदी अरेबिया' होता. आज, अनेक देशांचे नेतृत्व स्त्रिया करतात आणि 'फिनलंड' सारख्या काही देशांमध्येही महिलांचे वर्चस्व असलेले मंत्रिमंडळ दिसून येत आहे. लिंग समानता या उपायांमुळे हे यश मोठ्या प्रमाणात शक्य झाले आहे.

**भारतीय राजकारणात महिलांची स्थिती काय आहे?**

• 'आंतर-संसदीय संघ' (IPU) द्वारे संकलित केलेल्या आकडेवारीनुसार, भारतात १७ व्या लोकसभेत महिलांची संख्या १४.४४ % आहे.

• भारतीय निवडणूक आयोगाच्या (ECI) नवीनतम उपलब्ध अहवालानुसार,ऑक्टोबर २०२१ पर्यंत सर्व संसद सदस्यांपैकी १०.५ % महिला प्रतिनिधित्व करतात.

• सर्व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिला आमदारांचे प्रतिनिधित्व सरासरी ९% इतके आहे.

• राजकारणातील महिलांच्या सहभागाबाबत भारताची क्रमवारी गेल्या काही वर्षांत घसरली आहे. तो सध्या पाकिस्तान, बांगलादेश आणि नेपाळच्या मागे आहे.

भारताने प्रजासत्ताक होऊन ७३ वर्षे पूर्ण केली आहेत, पण तरीही समान प्रतिनिधित्व आणि राजकारणाला तरुण मुलींसाठी करिअरची महत्वाकांक्षी निवड करण्यापासून आपण खूप दूर आहोत. आपल्याकडे सध्या (2019 Election) ७८ (५४३ पैकी) महिला खासदार आहेत. १४.३ टक्के हे १९४७ पासून आपण पाहिलेले महिलांचे सर्वाधिक प्रतिनिधित्व आहे. राज्य पातळीवर हा आकडा खूपच कमी आहे आपल्या राज्यांच्या विधानसभांमध्ये सरासरी नऊ टक्के महिला आहेत. भारताच्या सहा राज्यांमध्ये एकही महिला मंत्री नाही.

**महिला मतदार**

स्वातंत्र्यानंतर मतदार म्हणून महिलांचा सहभाग फारसा उत्साही नव्हता. त्यात हळूहळू वाढ होत गेली; २०१९ च्या शेवटच्या लोकसभा निवडणुकीत, राजकारणातील स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने भारताच्या प्रगतीवर प्रकाश टाकत पुरुषांइतकेच महिलांनी मतदान केले. प्रथम, महिलांमधील साक्षरतेची उच्च पातळी आणि त्यांच्या कार्यबलातील अधिक सहभागामुळे त्यांची राजकीय जागरूकता आणि मतदान करण्याचा आत्मविश्वास वाढण्यास हातभार लागला आहे. एक देश म्हणून आपण लक्षणीय प्रगती केली आहे. भारतातील पुरुष आणि स्त्रिया दोघेही आता समान संख्येने मतदान करतात, परंतु मतदानापलीकडे महिलांच्या राजकीय सहभागाचा प्रश्न येतो; तेव्हा आपल्या सर्वांना खूप मोठा पल्ला गाठायचा आहे. यामध्ये उमेदवारांचा प्रचार, पदासाठी धावणे आणि राजकीय पद धारण करणे यांचा समावेश आहे. जरा खोलात जाऊन पाहिल्यावर, २०१९ च्या निवडणुकीत १० टक्क्यांहून कमी उमेदवार महिला होत्या. राज्य स्तरावर आम्ही समान डेटा पाहतो, जेथे १९८० ते २००७ दरम्यान राज्याच्या आमदारांमध्ये ५.५ टक्के महिलांचा समावेश होता; परंतु केवळ ४.४ टक्के उमेदवार महिला होत्या.

२०१९ मध्ये उत्तर प्रदेशमधील एका अभ्यासात असे दिसून आले आहे की महिला राजकीय सहभागाच्या अनेक निर्धारकांमध्ये मागे आहेत, जसे की राजकीय संस्था कशा काम करतात याचे ज्ञान आणि त्यांच्या स्वतःच्या नेतृत्व क्षमतेवर विश्वास, महिलांचे ज्ञान, आत्मविश्वास, आवाज आणि गतिशीलता निर्माण करणे याचा महिलांच्या राजकारणातील सहभागावर

सकारात्मक परिणाम होऊ शकतो. तरुण मुलींसाठी हे लवकर होणे आवश्यक आहे; जेणेकरून ते गंभीरपणे विचार करण्याची क्षमता निर्माण करू शकतील आणि भारताचे भविष्य घडवण्यात भूमिका बजावू शकतील.

**राष्ट्रीय आणि राज्य विधानमंडळांमध्ये महिला प्रतिनिधीत्वातील आव्हाने:**

**१. पुरुषप्रधान मानसिकता:**

भारत हा पुरूषप्रधान समाज आहे आणि स्त्रियांना पुरुषांपेक्षा कमी दर्जाचे मानले जाते. ही मानसिकता समाजात खोलवर रुजलेली आहे. राजकारणात नेतृत्व करण्यासाठी आणि सहभागी होण्याच्या स्त्रियांच्या क्षमतेचा लोकांच्या आकलनावर परिणाम होतो.

**२. संस्थांची दुर्गमता:**

भारतात, राजकीय पक्ष हे मूलभूत राजकीय वाहन आहेत ज्याद्वारे भारतातील संसदीय आणि राज्य विधानसभेच्या निवडणुका लढल्या जातात आणि जिंकल्या जातात. अपक्ष उमेदवारांना निवडणूक जिंकणे अवघड आहे. योग्य संसदीय जागा लढवण्यासाठी पक्षाचे तिकीट मिळणे हे सर्व इच्छुक उमेदवारांसाठी सर्वात महत्त्वाचे असते. भारतातील राजकीय पक्षांमध्ये तिकीट वितरण ही मुख्यतः केंद्रीकृत प्रक्रिया आहे. निवडणुकीच्या नोंदीवरून असे दिसून येते की, बहुतांश राजकीय पक्षांनी त्यांच्या घटनेत महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व देण्याचे वचन दिले असले तरी; प्रत्यक्षात महिला उमेदवारांना पक्षाची फारच कमी तिकिटे दिली जातात.

राजकीय विश्लेषक 'कांचन चंद्र' यांनी केलेल्या अभ्यासात असे दिसून आले आहे की, ज्या महिला पक्षाचे तिकीट मिळवतात आणि संसदेच्या जागा जिंकतात त्या बहुतेक महिलांचे कौटुंबिक राजकीय संबंध असतात किंवा ते 'वंशवादी' राजकारणी असतात. प्रवेशयोग्यतेचे सामान्य मार्ग मर्यादित असल्याने, महिला उमेदवारांना राजकारणात प्रवेश करायचा असेल तर त्यांचे लागेबांधे असणे महत्वाचे आहे. एका विश्लेषणात असे दिसून आले आहे की, २०१९ च्या लोकसभा निवडणुकीतील सर्व महिला उमेदवारांपैकी ४१ टक्के वंशवादी राजकारणी होत्या.

**३. सामाजिक नियम आणि रूढिबद्ध धारणा:**

भारतातील महिलांकडून अनेकदा पारंपारिक लिंगविशिष्ट भूमिकांचे पालन करणे अपेक्षित असते आणि त्यांना राजकारणात करिअर करण्यापासून परावृत्त केले जाते. सामाजिक नियम आणि रूढिबद्ध धारणा असे ठरवतात की, स्त्रियांनी त्यांच्या' 'चूल आणि मूल' म्हणून त्यांच्या भूमिकांना प्राधान्य दिले जाते आणि राजकारण हे सहसा पुरुषाचे क्षेत्र मानले जाते.

**४. लैंगिक असमानता (Gender Inequality):**

भारतीय राज्यघटनेने 'जात' आणि 'लिंग' यांच्यातील लैंगिक असमानता दूर केली असली तरी, भेदभाव हा महिलांच्या राजकीय सहभागातील एक व्यापक अडथळा आहे.

**राजकारणात महिलांचा सहभाग कसा वाढवता येईल?**

- **सामाजिक प्रबोधन**

महिलांनी राजकारणात सहभागी होण्यासाठी समाजातील सर्व स्तरांमध्ये जनजागृती होणे गरजेचे आहे. त्याचप्रमाणे राजकारणात येण्यापूर्वी स्त्रियांना शिक्षण आणि आर्थिक व सामाजिक प्रतिष्ठान मिळणे गरजेचे आहे.

- **जागांचे आरक्षण:**

राजकारणात महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्याचा सर्वात प्रभावी मार्ग म्हणजे महिलांसाठी विधानमंडळातील जागा राखीव ठेवणे हे काही राज्यांमध्ये लागू केले गेले आहे. जेथे स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी काही टक्के जागा राखीव आहेत.

- **राजकीय पक्षांनी महिलांचे प्रतिनिधित्व सुनिश्चित केले पाहिजे:**

निवडणुकीसाठी उमेदवार निवडीत महिलांना पुरेसे प्रतिनिधित्व दिले जाईल याची खात्री राजकीय पक्षांनी केली पाहिजे. त्यांनी महिला उमेदवारांची भरती करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत आणि त्यांना जिंकण्यायोग्य जागांवर प्राधान्य द्यावे.

- **शिक्षण आणि प्रशिक्षण:**

महिलांना राजकारणात सहभागी करून घेण्यासाठी शिक्षण आणि प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित केले जाऊ शकतात. यामुळे महिलांना त्यांचा आत्मविश्वास आणि कौशल्य निर्माण करण्यास आणि राजकारणातील गुंतागुंत समजण्यास मदत होईल.

**सारांश:**

सर्वसमावेशक समाज घडवण्यासाठी महिलांचा आवाज आणि दृष्टीकोन अपरिहार्य आहे. जगाच्या

अनेक भागांमध्ये प्रगती झाली असली तरी राजकीय प्रतिनिधित्वातील लिंगभेद कमी करण्यासाठी अजून बरेच अंतर कापायचे आहे. महिलांचा राजकीय सहभाग वाढवण्याच्या दृष्टीकोणातून सध्याच्या राजकीय धोरणांची तपासणी करणेही गरजेचे आहे असे वाटते. त्यादृष्टीने खालील मुद्दे अधोरेखित करता येतील.

• लिंग, कोटा आणि राखीव जागा यासारख्या सकारात्मक कृती राजकीय संस्थांमध्ये महिलांचे प्रतिनिधित्व वाढवण्यासाठी प्रभावी ठरल्या आहेत. ही धोरणे खोलवर रुजलेल्या पूर्वाग्रहांचा प्रतिकार करतात आणि महिलांना राजकीय क्षेत्रात प्रवेश आणि उत्कृष्ट कामगिरी करण्याच्या संधी सुलभ करतात.

• लिंग-संवेदनशील निवडणूक प्रणाली, प्रचारासाठी आर्थिक सुधारणा आणि महिलांच्या नेतृत्व कौशल्यांना प्रोत्साहन देणारे उपक्रम महिला उमेदवारांसाठी आश्वासक वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक आहेत. राजकीय पक्ष आणि संस्थांनी सर्वसमावेशक पद्धती स्वीकारल्या पाहिजेत आणि राजकारणात महिलांच्या सहभागास अडथळा आणणाऱ्या पारंपारिक नियमांना आव्हान दिले पाहिजे.

• शिक्षण आणि जागृती मोहिमा लैंगिक रूढी मोडून काढण्यात आणि महिलांना राजकारणात सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

२०२३ मधील पाच राज्यांच्या निवडणुका आणि २०२४ मधील सार्वत्रिक निवडणुकीसाठी आपण तयारी करत असतांना, तरुण युवतींना राजकीय प्रक्रियेत सहभागी होण्यासाठी सक्षम वातावरण निर्माण करण्यासाठी शिक्षक आणि नागरी समाज यांनी एकत्र येणे आवश्यक आहे कारण त्याशिवाय आपल्याकडे समानतेशिवाय खरोखर कार्यशील लोकशाही कार्यान्वित होऊ शकत नाही.

**संदर्भ यादी**


1. The struggle for women in politics continues by Razan Masad (United Nations Development Programme) - https://www.undp.org/blog/struggle-women-politics-continues
2. Radha Kumar, The History of Doing: An Illustrated Account of Movements for Women's Rights and Feminism in India 1800-1990. New Delhi: Kali for Women, 1997; Vina Mazumdar (Ed.) (1979) Symbols of Power: Studies on the Political Status of Women.
3. Kanchan Chandra (ed). Democratic Dynasties: State, Party and Family in Contemporary Indian Politics, Cambridge University Press, 2016
4. *Namita Bhandare, "Most Women MPs Ever, Yet Only 14.6 of Lok Sabha," IndiaSpend, May 27, 2019.*
5. Shirin M Rai and Carole Spray, Performing Representation: Women Members in the Indian Parliament, pp 93-95

# अक्कमहादेवी

**कु.हर्षाराणी रुद्राप्पा अजबे**

प्राचार्य, विठाबाई पसारकर विद्यामंदिर, केकतउमरा ता.जि. वाशीम

harshaajabe@gmail.com

**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता**

अर्थात जिथे स्त्रीचा सन्मान केला जातो, तिथे देवता वास करतात. वेदकाळा पासून हे सुभाषित स्त्रियांच्या बाबतीत वापरतात, पण वास्तव मात्र वेगळेच आहे. शतकानुशतके स्त्रियांची स्थिती ही अतिशय हीन आहे . कोणत्याही प्रकारचे धार्मिक, आर्थिक राजकीय, सामाजिक शैक्षणिक, क्षेत्रात तिला स्थान नव्हते. समाजातच नव्हे तर कुटुंबात सुद्धा तिला सन्मानाची वागणूक नव्हती. स्त्री ही भोगवस्तू समजली जायची स्त्री ही चंचल, अविचारी,अविश्वासू,दृष्ट असते असा समज तिच्या विषयी केला गेला. तिला विद्यार्जन करण्याचा, व्यवसाय करण्याचा किंवा कुटुंबातील कोणताही निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. त्याचबरोबर वेदोक्त यज्ञांचे आचरण केल्यास ती नरकात जाते असा समज पसरवला होता. स्त्रीला निरर्थक व्रतवैकल्य, कर्मकांड, उपासतापास असल्या गोष्टीत अडकवून ठेवले जायचे. तरीही प्रत्येक संकटांचा सामना करत येणाऱ्या परिस्थितीला सामोरे जात अनेक स्त्रिया इतिहासात आपला ठसा उमटवतांना दिसतात . अशाच एका दैदिप्यमान नारीच्या धीरोदात्त कर्तृत्वाचा आढावा आपण घेणार आहोत..

बाराव्या शतकातही स्त्रियांची हीच परिस्थिती होती. पण आपल्या वर्तनातून समाजासमोर एक आदर्श प्रस्थापित करणारी, पिढ्यानपिढ्याच्या बंधनांना झुगारून एक स्त्री उभी राहिली ती म्हणजे 'अक्कमहादेवी' कन्नड कवयित्री, थोर शिवभक्त. चेन्नमल्लिकार्जुनलाच आपले सर्वस्व अर्पण करणारी. कर्नाटकातील शिवमोग्गा जिल्ह्यातील उडुतडी हे गाव. हे तत्कालीन कौशिक राज्याच्या राजधानीचे शहर होते. या शहरात सुमती व निर्मलशेट्टी या दांपत्याच्या पोटी महादेवी चा जन्म झाला. महादेवीला बालपणापासूनच अध्यात्माची आवड होती. गुरुलिंगदेवाकडे विद्यार्जन करून तिने कन्नड भाषा चांगल्या प्रकारे अवगत केली. कल्याणच्या जंगमा कडून येणाऱ्या वचनांची अध्ययन करण्याची आवड तिला निर्माण झाली. यातूनच पुढे महादेवी वचन रचना करू लागली.

एकदा महादेवी बालपणी मैत्रिणीसोबत खेळत असताना तिने आईला प्रश्न विचारला "आई माझा पती कोण गं?"यावर आईने हसून उत्तर दिले चेन्नमल्लिकार्जुन; अन त्या क्षणापासून महादेवी चेन्नमल्लिकार्जुनालाच आपला पती मानत होती. महादेवी लहानाची मोठी होत असताना इतर मुली प्रमाणेच सामान्यपणे तिची वाढ होत होती. वयात येताना सामान्य मुलींच्या जीवनात होणारे बदल तसेच महादेवीच्या जीवनातही होत होते. पण हे वय वाढत असताना महादेवी चेन्नमल्लिकार्जुनलाच आपल्या पतीच्या रूपात पाहत होती . वयात येताना मुली जसे स्वप्न पाहतात तसे महादेवी सुद्धा स्वप्न पाहते आणि आपल्या स्वप्नातील भावावस्था ती वचनात लिहून ठेवते.

**अक्का, ऐक गे मी एक स्वप्न पाहिले**
**अक्षता,पान-सुपारी नि श्रीफळ पाहिले,**
**शुभ्र दंतपंक्ती आणिक इवल्या इवल्या जटा,**
**ऐसा जोगी मी पाहिला दारी भिक्षेसाठी येता**
**दुर्लक्षुनी तो जाई पुढे,तेंव्हा पाठमोरा होता**
**पाठी लागून मी धरीयेले त्याच्या हाता.**
**देखीता सामोरा चेन्नमल्लिकार्जुन**
**पाहुनी तयासी उघडले माझे नयन.**

अशाप्रकारे चेन्नमल्लिकार्जुनालाच आपला पती मानून आनंदात जीवन जगत असताना ,एके दिवशी कौशिक राज्याची विजयी मिरवणूक रस्त्याने जात होती. रस्त्यातील एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर मिरवणूक पाहणाऱ्या मुलींचा घोळका होता. त्यामध्ये काळ्याशार लांब सडक केसाची सुंदर रूपवती, गुलाब पाकळ्यां सम ओठ, चाफेकळी नाक आणि सुवर्णासम कांती असणारी महादेवी हसत खेळत मिरवणूक पहात होती. अचानक कौशिक राजाचे वर लक्ष गेले आणि तो तिच्या अनुपम सौंदर्याने लुब्ध झाला. मिरवणूक संपवून राजा राजमहालात जातो पण त्याच्या डोळ्यासमोर सतत महादेवीचा आखीव-रेखीव लोभसवाणा चेहरा येत राहतो. तो महादेवीच्या सौंदर्याला थोडाही विसरू शकत नाही. ती आता सतत आपल्या जवळ असावी असे त्याला वाटते. त्याची नजर इच्छेत रूपांतरित होते. तसा निरोप महादेवीच्या घरी दिला जातो; पण महादेवी मात्र या लग्नाला विरोध करते. पण कौशिक राजा आपल्या पदाचा, बळाचा उपयोग करून तिच्या आई-वडिलांच्या प्राणाची भिती तिला घालतो आणि मग नाईलाजास्तव आई-वडिलांच्या प्राणरक्षणासाठी ती लग्नाला तयार होते. पण तिच्या काही अटी असतात कौशिक राजाला वाटले एका स्त्रीच्या अटी असून असून काय असतील, मी तर राजा आहे आणि मी तिच्या कोणत्याही अटी पूर्ण करू शकतो म्हणून त्यांनी तिच्या सर्व अटी मान्य केल्या. त्यातली मुख्य अट म्हणजे माझ्या अनुमतीशिवाय मला स्पर्श करू नये. . कौशिक राजा महादेवीची ही अटही मान्य करतो. विवाह संपन्न होतो. वैभव संपन्न अशा राजवाड्यात महादेवी महाराणी बनून येते. अनेक दास दासी तिच्या सेवला हजर असतात. पण महादेवीचे मात्र कशातही मन रमत नाही. ती सदैव चेन्नमलिकार्जुनाच्या भक्तीत लीन असते.

विवाहानंतर काही दिवसांनी महादेवी राजमहालात एकांतात विचार मग्न असल्याचे पाहून कौशिक तिला आलिंगन देण्याचा प्रयत्न करतो पण महादेवी मात्र त्याच्यापासून दूर जाते. महादेवीची घातलेली अट कौशिक राजाने मोडलेली असते. म्हणून महादेवीला खूप राग येतो कौशिक तिचे वस्त्र ओढण्याचा प्रयत्न करतो तेव्हा, महादेवी म्हणते हाताने "अंगावरील वस्त्र धरू शकतोस पण निर्वाण बळकावता येणे साध्य आहे का?" चेन्नमल्लीकर्जूनाचे वस्त्र अंगावर असता मला या लौकिक वस्त्रांची काय परवा रे वेड्या" असे म्हणून ती अंगावरचे वस्त्र काढून फेकून देते आणि दिगंबर होऊन राज महालातून बाहेर पडते आणि सरळ कल्याणच्या दिशेने प्रवास करायला सुरुवात करते. महात्मा बसवेश्वरांच्या कार्याविषयी महादेवीने ऐकलेले होते. बळीगावी येथील सुद्धा कल्याणच्या अनुभव मंटपामध्ये धार्मिक कार्य करतात हेही तिला माहिती होते.

उडूतडी ते कल्याण पर्यंतचा प्रवास हा एकट्या स्त्रीने आणि तोही दिगंबर अवस्थेत पूर्ण करणे म्हणजे सोपी गोष्ट नव्हती. एकटी सुंदर तरुणी आपले सौंदर्य आपल्या केशसंभारात झाकून ऊन, वारा, पाऊस यांचा सामना करत जाते. तहान लागली तर रस्त्यात कुठे नदी दिसली तर तिथलं पाणी प्यावं. भूक लागली तर रस्त्यात दिसणाऱ्या एखाद्या गावांमध्ये भिक्षा मागावी आणि झोप आली की गावाच्या बाहेर आसपास असणाऱ्या एखाद्या पडक्या मंदिराचा आश्रय घ्यावा. असे करत करत रात्रंदिवस प्रवास करत लोक निंदा, लोकांच्या वखवखलेल्या नजरा यांच्याशी संघर्ष करत ती कल्याणची वाट चालत होती. ज्याप्रमाणे महादेवी दिगंबर अवस्थेत निघाली आपल्या एका वचनात ही विररागिनि म्हणते

**देहावरचे वस्त्र सरकता**
**स्त्री-पुरुष सारे लज्जित होती.**
**त्रिभुवन व्याप्त माझे प्राणपती**
**त्यांच्यापुढे लज्जा कोठून**
**मम प्रभू चेन्नमल्लिकार्जुन**
**पाहतो दिव्य चक्षूनीं त्रिभुवन**
**काय लपवावे मना त्याच्यापासून**

दिगंबरावस्था ही अशी वैराग्यावस्था की त्याच्या दर्शनाने मन मोहित होण्याऐवजी भक्तीने नतमस्तक होते पण हे समजण्यासाठी मानवाला खूप मोठी साधना लागते. सामान्य व्यक्ती या दृष्टीने कधीही विचार करू शकत नाही. महादेवी ही सर्वसामान्य स्त्री नव्हती श्रीशैलच्या चेन्नमल्लिकार्जुनलाच आपले सर्वस्व अर्पण करून सर्व त्याग करून निघाली होती.महात्मा बसवेश्वर यांनी कल्याण येथे अनुभव मंटपाची स्थापना केली होती. त्यामध्ये वीरशैव लिंगायत व इतरही जाती-धर्माचे लोक लिंगदीक्षा घेऊन अनुभव मंटपात येत. इथे प्रत्येकालाच आपले विचार व्यक्त करण्याची संधी मिळत होती. अनुभव मंटप हे जातीभेद नष्ट करणारे एक व्यासपीठ होते. स्वातंत्र्याची हमी देणारे केंद्र होते. स्वावलंबन महत्त्वाचे मानून स्थैर्य आणि शक्ती पुरवणारे प्रेरणास्थान होते. चर्चा, परिसंवाद, वादविवाद तर येथे चालतच पण शिवोपासनेचा प्रचार करण्याचा प्रयत्न केल्या जाई. धर्मावर चर्चा तिथे घडत होत्या. जाती भेद नष्ट करण्यासाठी प्रयत्न केले जात होते. त्यामध्ये अनेक महिला ही होत्या. श्री बसवेश्वरांच्या संयमी नेतृत्वामुळे अनुभव मंटप समाज उन्नतीचे केंद्र बनला होता.

महादेवी कल्याणच्या जवळ आल्याचे वृत्त अनुभव मंटपात समजते तेव्हा तेथील शरणांना खूप आनंद होतो पण अल्लमप्रभू तिची परीक्षा घेण्याचे ठरवतात. तिची भक्ती किती खरी आहे. ती आपल्या ध्येयाप्रती किती एकनिष्ठ आहे. हे पाहण्यासाठी ते किन्नर बोमय्यला पाठवतात. बोमय्या वेषांतर करून महादेवीची अनेक प्रकारे परीक्षा घेतात महादेवी चे ज्ञान आणि आपल्या देवावरील श्रद्धा पाहून बोमय्या देखील तिला शरण जातात व तिला कल्याण नगरीतील अनुभव मंटपात घेऊन येतात. तिथे आल्यावर मात्र अल्लमप्रभू तिची पुन्हा कठोर परीक्षा घेतात सर्व शरणांच्या समोर तिला विविध प्रश्न विचारतात. महादेवी त्या सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे देते. "तू वस्त्र का नेसली नाहीस?" तिने आपल्या केसाने आपले शरीर झाकलेले होते. यावर ते म्हणतात तुझा भाव शुद्ध असेल तर तू केसाने शरीर का झाकलेले आहे, असे केल्याने तुझ्या मनात अजूनही लाज आहे हे सिद्ध होते. असे केलेले गुहेश्वर लिंगाला आवडणार नाही. असे अल्लमप्रभु म्हणतात. कारण त्यांना तिच्या भावना जाणून घ्यायच्या होत्या. यावर अक्का म्हणते "जोपर्यंत फळ आतून पिकत नाही, तोपर्यंत त्याच्या वरची साल गळून पडत नाही. माझं मन पक्कं आहे त्यामुळे वस्त्रे असली काय नसली काय. काम मुद्रा पाहून तुम्हाला दुःख होते म्हणून ते झाकले आहे असे केले म्हणून वाईट का वाटावे मी मल्लिकार्जुनाशी एकरूप झाले आहे. मला आणखी प्रश्न विचारून त्रास देऊ नका दादा" पुढे ती म्हणते.

**ना मरण, ना नाश, ना रूप, ना आकार**
**ऐशा सुंदर सजना वर**
**मी भाळले गे आयांनो**
**ना समीप ना दूर ना भिन्न**
**ना ओळखण्याचे चिन्ह**
**ऐशा सुंदर सजना वर**
**मी भाळले घे आयानो**
**नाही भव नाही भय, नाही सीमेचे बंधन जया**
**ऐशा निर्भय, निस्सीमावर भाळले गे आयानो**
**चेन्नमल्लिकार्जुन नामे अतिसुंदर पतीवर**
**मी अति अति भाळले गे आयानो**

यावर तिला पुन्हा प्रश्न विचारतात "तू तर सुंदर आहेस, रूपवती आहेस आणि अशा अरूपाशी समरस झाली

म्हणजे नेमकं काय?" महादेवी उत्तर देते "घट्ट तूप आणि पातळ तूप यात काही फरक आहे का? "आत्मा आणि लिंग यात काही फरक आहे का?" "माझ्या शरीराला श्रीगुरुने मंत्रमय करून टाकले आहे. सावयव, निरवयव यात काही फरक आहे का ?" मी माझे सर्वस्व चेन्नमल्लिकार्जुनाला अर्पण केले आहे. अशाप्रकारे सर्व प्रश्नांची समर्पक उत्तरे ऐकून अल्लमप्रभू महादेवी चे ज्ञान भक्ती त्यागाची निश्चय वृत्ती पाहून समाधानी होतात. तेव्हापासून महादेवी अनुभव मंटपात सर्वांशी चर्चा करत अनेक वचनरचना करत तिथेच राहते.

वीरशैव याच धर्मात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समानतेचा अधिकार होता म्हणून बसवण्णा यांनी वीरशैव धर्म स्वीकारला स्त्रियांना समानतेचा अधिकार देऊन अशुद्धतेच्या कल्पनेपासून मुक्त केले.सर्व धार्मिक कार्यात स्त्रियांना बरोबरीचे स्थान दिले. अशा प्रकारे अनेक शिवशरणी आपल्या वचनातून भावानुभाव व्यक्त करू लागल्या. बसव पत्नी नीलांबिका व गंगांबिका यांनी अनुभव मंटपात आलेल्या स्त्रियांना साक्षरतेचे पाठ दिले. न्हावी लिंगम्मा, साळ कांडणारी सोमव्वा, कुंभार केतला, तेली शिवंम्मा, महार कल्याणम्मा, गायिका सिद्धवेवम्मा, सूत कातणारी रोमव्वा, शिंपी पीटव्वा, तांदूळ वेचणारी लक्ष्म्मा, झाडूवाली सत्यक्का, भगिनी नागलंबिका, अक्कबोतादेवी, मुक्तायक्का आदी स्त्रियांनी पुरुषांप्रमाणेच स्वतःचे वचन साहित्य निर्माण केले. जवळपास 34 शिवशरणी यांनी वचन रचना केल्या आहेत. यात वयाने सर्वात लहान तरीही सर्वात जास्त वचनरचना करणारी महादेवी. प्रेमरस व भक्तीरसाने युक्त सुंदर अलंकारिक वचनरचना तिने केल्या आहेत. तिचा अध्यात्मिक अधिकार मोठा असल्यामुळे सर्वजण तिला अक्का म्हणत असत. कन्नड भाषेत 'अक्का' म्हणजे मोठी बहीण. इष्टलिंग दीक्षा घेऊन ती शरण सिद्धांताप्रमाणे आपले जीवन व्यतीत करु लागली. शरणांच्या वचनात तिला स्त्री - स्वातंत्र्याचा हुंकार जाणवला. अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा विरुद्ध लढण्याचे बळ तिला मिळाले. वचनातील उदात्त विचारांमुळे त्याग, प्रतिष्ठा, भक्ती, प्रीती वैराग्य इत्यादी गुणांचा समुच्चय तिच्यामध्ये जाणवला तिची 434 वचने उपलब्ध आहेत. तिची वचने तिच्या व्यक्तिमत्त्वाची जिवंत आणि ज्वलंत अभिव्यक्ती आहे. येणाऱ्या प्रत्येक संकटातून तावून सुलाखून निघालेल्या वचनरचनेला मधुराभक्तीचे कोंदण लाभलेले आहे. महादेवी अनुभव मंटपातील सर्वांची अक्का होऊन आपल्या वैराग्य व प्रेमळ भक्तीने सर्वांच्या प्रेमास व आदरास पात्र झाली. वीरशैव शरणीमध्ये अक्कमहादेवी चे स्थान महत्त्वपूर्ण आहे .

अध्यात्मिक साधनेच्या दृष्टीने ती अनन्यसाधारण वीररागिनी, स्वानुभवी योगिनी होती. कन्नड सारस्वतातील स्वानुभवी कवयित्री म्हणून सर्व शरणी मध्ये ती सर्वश्रेष्ठ वचनकर्ती म्हणून प्रसिद्ध आहे.

महात्मा बसवेश्वर आपल्या वचनात महादेवीचा उल्लेख करताना 'अक्कमहादेवी जननी माझी असा करतात. ' अल्लमप्रभू म्हणतात "महेश्वर लिंगा ठाई जाहली भेद विरहित हो. त्या अक्कमहादेवी च्या श्रीचरणी नमो नमः' शिवयोगी श्रीसिद्धरामेश्वर म्हणतात. "कपिलसिद्ध मल्लिकार्जुनातील अक्कमहादेवीला शरण गेल्याने मी शुद्ध झालो पहा" महादेवी संसारातील मोहपाश सर्व बंधने सोडून विरक्त होऊन निघाली होती. ती एका राजाची पत्नी होती. सर्व सुखं तिच्या पायाशी लोळण घ्यायला तयार असताना महादेवी मात्र आपल्या शिवाच्या स्मरणातच वेडी झाली होती. ती भ्रमरांना आम्रतरूंना, चंद्रिकेला अन् कोकिळेला एकच मागणे मागते, माझा राया चेन्नमल्लिकार्जुन दिसला तर मला दाखवा. आपल्या वचनात ती म्हणते मोहर विरहित वृक्षावर कोकीळ कूजन करेल का? सुगंध विरहित पुष्पावर भ्रमर मोहित होईल का? त्याचप्रमाणे चेन्नमल्लिकार्जुन विना माझे मन कोणावर भाळेल का? रोज अनुभव मंटप सुशोभित करून मंटपात पाटावर आसन घालून ती आपल्या शिवाची वाट पाहत बसते. विभूती लावून आणि रुद्राक्ष माला परिधान करून शृंगार करून ती शिवाचे नामस्मरण करीत बसलेली असते. चंदनाला तुम्ही तोडले कापले किंवा उगाळले कितीही यातना दिल्या तरी तो आपला सुगंध सोडत नाही. सुवर्णाला कस लावून अग्नीत तापवले तरी तो शुद्ध होऊन आपला रंग व गुण दाखवतो उसाचे तुकडे करून त्याला चरख्यातून काढले तरी त्यातून गुळ साखर तयार होते, म्हणजे गोडी हा आपला गुणधर्म सोडत नाही. त्याचप्रमाणे मल्लिकार्जुना तू माझे पूर्वकृत पाप दाखवलेस माझ्या कर्माची रास माझ्यापुढे मांडली तरी मी प्राण देईन पण निरंतर तुझेच नामस्मरण करेल. माझं मन, प्राण नी भाव हा शिवाच्या ठायी स्थिर झाला आहे. मला कोणी स्पर्श केला तरी त्याची जाणीव होत नाही. शरिराचे सुखोपभोग काय आहे हे मी मानत नाही चेन्नमल्लिकार्जुनाशी समरसून गेल्यावर बाहेर काय घडते याची मला काही जाणीव होत नाही. मोती जलापासून उपजतो, गारा जलापासून उपजतात व लवण ही जलापासून उपजते. गारा विरतात, लवण विरते, मोती विरघळतांना कोणीच पाहिले नाही. प्रभू चेन्नमलिकार्जुना तुम्हा ठाई समरसुनी मी तुम्हातच घनवटून गेले. असे ती आपल्या वचनात लिहते. यावरून तिचा निसर्गात घडणाऱ्या घटनांचे किती निरिक्षण व अभ्यास आहे हे आपल्या लक्षात येईल. अक्कंमाहादेवीच्या वचनात विविध उपमा व अलंकारांनी युक्त अशा रचना आहेत. शृंगाररस, प्रेमरस, वीररस यांचाही वापर आपल्या वचनात केलेला आहे मुक्तछंदा बरोबरच लयबद्ध अशाही काही रचना आहेत. या सर्व रचना करून कन्नड वांङ्मयाध्ये खूप मौलिक भर अक्कमहादेवीने घातलेली आहे. स्त्रियांसाठी असणाऱ्या सर्व रुढी- परंपरा व बंधनांना झुगारून बंड करून उठलेली ती एक वीररागिनी आहे. पुरुषी

वर्चस्वाला न जुमानता लढणारी ती स्त्री स्वातंत्र्याचे एक मूर्तिमंत उदाहरण आहे.

पूढे अक्कमहादेवीने अल्लमप्रभू च्या सांगण्यावरून बसवेश्वरांच्या समता विचाराचा प्रचार आणि प्रसार गावोगावी केला आणि आपले आराध्य चेन्नमलिकार्जुनाची भक्ती करत करत ती श्रीशैल पर्वताकडे गेली व कर्दळीवनात लिंगैक्य झाली. अक्कमहादेवीच्या वचनरचना कर्नाटकात घरोघरी अजुनही भक्तीभावाने गातात.

## निष्कर्ष

१) १२ व्या शतकात सर्व ऐश्वर्य संपत्तीचा परित्याग करून चेन्नमल्लिकार्जुनाच्या भक्तीत रममान झालेली स्त्री म्हणजे 'अक्कमहादेवी'

२) स्त्रियांसाठी असणाऱ्या सर्व रुढीपरंपरा व बंधनांना झुगारून बंड करून उठलेली ती एक वीररागिणी आहे.

३) अक्कमहादेवीच्या वचनरचना कर्नाटकात घरोघरी अजूनही भक्तिभावाने गातात.

४) बसवेश्वरांच्या अनुभव मंटपात सक्षमपणे वचनरचना करणारी व सर्व कार्यात सहभाग घेणारी एक निसिम भक्त होय.

५) वीरशैव संप्रदायात स्त्रियांना समानतेचा अधिकार देऊन अशुद्धतेच्या कल्पनेपासून मुक्त केले आहे.

## संदर्भ

1. चेन्नमल्लिकार्जुनराया : शिवानंद
2. मलेनाडूचा मोगरा आणि मऱ्हाटभूमीची जाईची वेल ! : डॉ. सौ. मीनाक्षी हिरेमठ
3. अक्कमहादेवी : जीवन व साहित्य दर्शन : श्री राजु जुबरे